विनायक त्रिंबक मोडककृत

प्रणयविवाह नाटक.

प्रसिद्ध करणार

किंमत ८ आणे.

(प्रख्यात आंग्लकवि शेरिडन यांच्या "ड्युएना" नांवाच्या प्रहसनाच्या आधारानें लिहिलें)

प्रणयविवाह नाटक.

हें

रा. रा. विनायक त्रिंबक मोडक

' मौनयौवना ' ' श्रीविक्रमादित्य भाग १ ला व २ रा ' ' राणा भीमदेव ' इत्यादि पुस्तकांच्या कर्त्यांपैकीं एक

यांनीं लिहिलें

तें

बाळकृष्ण लक्ष्मण पाठक

यांनीं मालकाकरितां

मुंबई येथें

"**गणपत कृष्णाजी**" छापखान्यांत छापून

प्रसिद्ध केलें.

सन १९०२.

प्रसिद्ध नाट्यकलाभिज्ञ शाहूनगरवासी नाटक मंडळीनें या नाटकाचे येथें जे प्रयोग केले त्या संबंधानें

Maratha Says:—This is a comedy containing the humour of the ridiculous to the brim in the true Sheridanian fashion, and its performance was pretty well successful in occasionally bringing down the house with peals of rollicking laughter so natural to light sentiment expressed in wit.

सुधारककर्ते ह्मणतातः—प्रयोग फारच चांगला वठला. मूळ इंग्रजी नाटकांतील हास्यरस या प्रतिकृतींत ग्रंथकर्त्याकडून उत्तम उतरला आहे.

ज्ञानप्रकाशकार ह्मणतातः—नाटकांत मुळांतील रस पुष्कळ उतरला असून अभिनयही बराच चांगला वठला.

काळकर्ते ह्मणतातः—प्रयोग चांगला वठला. हें नाटक हास्यरस प्रधान आहे.

जगद्धितेच्छुकार ह्मणतातः—सदर नाटकाचा गेले शनिवारीं शाहूनगरवासी नाटकमंडळीनें केलेला प्रयोग फारच प्रेक्षणीय झाला. कविश्रेष्ठ शेरिडनच्या मूळ इंग्रजी नाटकांतील मौजदार प्रसंगाची गुंतागुंत आणि

त्या प्रसंगास अनुरूप अशीं विनोदी आणि थट्टेचीं भाषणें या नाटकांत ग्रंथकर्त्यानें मोठ्या मार्मिकतेनें उतरलीं असल्यामुळें ही प्रतिकृति अत्यंत मनोहर झाली आहे. सदर नाटकांत ग्रंथकर्त्यानें क्वचित् प्रसंगीं प्रेमळ प्रसंगाची भर टाकली आहे ती मूळ कृतीच्या सौरस्यास साजेशीच असल्यामुळें हास्यरसोत्पादक नाटकांत सदर नाटक उच्च स्थानीं विराजमान होण्यास पात्र झालें आहे. या नाटकांतील मुख्य सूत्रधार चिमणी ही प्रेक्षकांची चित्तवृत्ति हरण करणारी कविनिर्मित एक अजब चीज आहे. वधुवरांच्या एकनिष्ठ आणि अढळ प्रेमाची अप्रतिम साक्ष पटविणारीं तारा आणि दौलतराव व गजरा आणि सर्जेराव हीं पात्रें अत्यंत रमणीय असून परस्परांच्या समागमासाठीं त्यांची उत्सुकता आणि तत्प्रीत्यर्थ त्यांचे प्रयत्न हीं कोणाही सहृदय प्रेक्षकांस कौतुक वाटण्यासारखीं आहेत. आणि शेवटल्या अंकांतील अचरट मानाजीच्या आणि धनलोभी धनाजीच्या उपहासाचा प्रसंग तर इतका चटकदार आहे कीं तो पाहून प्रेक्षकवृंदाची हांसतां हांसतां मुरकुंडीच वळते. तात्पर्य, हास्यरसानें ओथंबलेलें हें नाटक सदर नाटकमंडळीच्या सर्वोत्कृष्ट नाटकांपैकीं एक आहे असें आमचें मत आहे.

वाचकांस विनंती.

आंग्लकविमालिकेंत अधिष्ठानीं विराजमान झालेल्या श्रेष्ठ कवि **शेरिडन**चें सर्वांग सुंदर आणि रमणीय असें 'डयुएना' नांवाचें प्रहसन वाचीत असतां, सदर्हू प्रहसनाच्या आधारानें मराठीभाषेंत नाटक लिहिलें असतां तें महाराष्ट्रजनांच्या रुचीस अभिमत होऊन संसारांतील व्यवहारासही त्याचा उपयोग होईल, असें वाटल्यावरून मीं हा प्रस्तुतचा प्रयत्न केला आहे. ह्यांत हास्यरस प्रधान असून तो कवीच्या मूळकृतींत फारच कोमल, मधुर आणि रमणीय उठला आहे. हृदयंगम शब्दश्लेष, उत्कृष्ट रसपरिपाक आणि चित्तवेधक संविधानक हीं साधण्यांत कवीनें आपलें बुद्धिसर्वस्व खर्च केलें असल्यामुळें, मूळकृतीचें एकंदर स्वरूप फारच चित्ताकर्षक व उज्वळ झालें आहे. अशा या अनुपम कृतीस साधा पण नीटनेटका मराठी पोषाक चढवितांना मुळांतील आचार विचार, भाषणपद्धति, व प्रवेश रचना इत्यादि गोष्टींत यथामति फेरफार करून कवीचें हृद्गत ह्या माझ्या प्रतिकृतींत आणवेल तितकें आणण्याचा मीं प्रयत्न केला आहे. प्रसिद्ध नाट्यकलाभिज्ञ **शाहूनगरवासी नाटकमंडळीनें** ह्या नाटकाचे येथें करून दाखविलेले प्रयोग लोकमान्य झाल्यामुळेंच ही प्रतिकृती आपणापुढें पुस्तकरूपानें ठेवण्याचें मीं धारिष्ट केलें आहे. तरी या माझ्या प्रतिकृतींत कांहीं न्यूनता, दोष किंवा नीरसपणा दिसल्यास आपण मोठें मन करून त्याबद्दल मला क्षमा करावी अशी आपणांस माझी सविनय प्रार्थना आहे.

पुणें ता. २० जून
सन १९०२.

विनायक त्रिंबक मोडक.

नाटकांतील पात्रें.

धनाजीराव—एक धनलोभी श्रीमान मराठा गृहस्थ.

सर्जेराव—त्याचा मुलगा व गजरेवर प्रेम करणारा एक तरुण गृहस्थ.

दौलतराव—सर्जेरावाचा मित्र व धनाजीरावाची मुलगी तारा हिच्यावर प्रेम करणारा एक तरुण पुरुष.

मानाजीराव—धनाजीरावानें आपली मुलगी तारा हिच्याकरितां पसंत केलेला नवरदेव.

गोंडाजी—त्याचा चाकर.

सटव्या—सर्जेरावाचा चाकर.

चिमणी—धनाजीरावाच्या घरची कुळंबीण.

तारा—धनाजीरावाची कन्या.

गजरा—उदाजीराव पवार नांवाच्या एका सुखवस्तु सरदाराची कन्या.

बचंभट—लग्न लावणारा उपाध्याय.

दगड्या, झशा, नरशा, एसबा } —धनाजीरावाचे चाकर.

याशिवाय कर्णेवाला, शिंगवाला, वाजंत्री, कुळंबिणी, गडी वगैरे.

स्थळ—विचित्रपुरी.

नामदार

रावबहादुर

रामचंद्रराव विठोबा धामणसकर

दिवाण, संस्थान बडोदें,

यांस

त्यांची विद्वत्ता, राजनिष्ठा, विद्यावृद्धी-
विषयीं उत्कंठा, परोपकारबुद्धि, म-
नाचा थोरपणा, सौजन्य, शुद्ध
व पवित्र आचरण इत्यादि
अनेक अनुकरणीय गु-
णांस लुब्ध होऊन

हें पुस्तक

त्यांच्या परवानगीनें

प्रेमपूर्वक अत्यादरानें अर्पण

केलें आहे.

ग्रंथकर्ता.

प्रणयविवाह नाटक.

अंक १ ला.

प्रवेश १ ला.

स्थळ—धनाजीरावाच्या वाड्यापुढचें पटांगण.

वेळ—पहांट.

(सटव्या हातांत एकतारी घेऊन भजन करीत बसला आहे असा पडदा उघडतो.)

सटव्या—

धांव पाव सांवळे इठाबाई, कां मनीं धरली अढी ॥ अनाथ मी अपराधी स्मरतों । उतरा पैल थडी ॥ धृ० ॥ एकनाथ घरीं पानी वाहिलें गंगेच्या कावडी । कबीराचे शेले ईनुनी त्याची वालिसी घडी ॥ सावता माळी याची खुडुनिया भाजी बांधिसी जुडी । नरसी मेहत्याची हुंडी पटवुनी त्याचा झालासी गडी॥ जना बाईचीं धुनी धूतलीं चंदरभागेच्या थडी। सजन कसाई मांस ईकीतो त्याची लावीसी धडी ॥ दामाजीपंताचे येळीं महार झाला तांतडी। पाई वाहाना हातीं काठी खांद्यावर घोंगडी ॥ चोखामेळ्याचे घरीं येवुन ढोरें ओढी तातडी । त्येची अस्तुरी हाका मारी कोठें दीधली दडी॥ गजंदराचा धांवा ऐकुनी वेगें

घालिसी उडी । आरजून रथीं सारथ्य करूनी फेडी त्याची सांकडी ॥ कां मनीं धरली अढी । इठोबा उतरा पैल थडी ॥ (पांच वाजलेसे ऐकून) चीभन्–पांच वाजले ! आन् इकुत्यात साबी व्हत्याल ! पन धनीसाबाचा है कुठं ठिकान् !! नग–नग–नग–समद्या चाकऱ्या पतकुरल्या, पन् चीभन्–जो धनी सुधित न्हाई त्येची चाकरी नग !!! कटाळलों–कटाळलों–पगा या चाकरीसनी ! अक्शी वकारी आलिया !! आमचंबी एकाद्या अस्तुरीवर मन बसतं न्व्हकां, पन् आमच्या धनीसाबाचा परकार संमद्या जगापून बी न्येराच ! त्येसनी आन बी ग्वाड लागना, पानी बी ग्वाड लागना, आन् झ्वाप बी येइना !! रातदीन गजरा–गजरा–गजरा–अक्शी येड लागल्यावानी करत्यात ! आन् समद्यांच्या आंगावर कुऱ्यावानी वस्-वस्-वस्-करत्यात !! सर्जेराव लै लै भकले! (थंडीनें कुडकुडत) हु-हु-हु-हु-ही-ही-ही-ही-लै थंड वाजतीया-आन् ह्ये पाय-आन् ह्ये हात-काल्यावानी थंडगार झाल्यात ! आन् समदं आंग काकडूनशान् अक्शी ताठल्यावानी झालया!! (जांभई देऊन)हकड झ्वाप तर अक्शी आंगावर उड्या टाकतीया! अया-या-या-या-ही-ही-ही-ही-हु-हु-हु-हु.(लांबून कांहीं आवाज ऐकूं येत आहे असें दाखवून) आं ! ह्यो कोन मुरदाड आलाया ह्या वक्तीं भीक मागाया !! आतां ह्येसनी तुझी किटाकिट बंद कर ह्मनून ह्मतलं तर माझ्या बाचं तरी त्यो ऐकल व्हय ! ! असं

आरडूनशान् टाळकं उठवील समद्यांचं ! आन् मंग धनीसाब जाग व्हत्याल-त्ये ह्यच्या आंगावर वाघावानी तुटून पडत्याल-ह्यो मर्द चेकाळल्यावानी जाफा बकल— आन् मंग असा गोंधुळ उडल, कीं तो दाबतां दाबतां माझी हाडं घुसळत्याल!! (वासुदेवाचें सोंग घेतलेला दौलतराव पुढें येतो त्यास उद्देशून) अरे-ए-हथं तुझ्या बाचं कुनी देन लागतुया व्हय ? आं ! धरतुयास गपचीप आपली वाट, कां व्हावी तुसनी खरपूस बक्सीसी ? हथ तूं मायंदळ वरडलास तरी मिळनार है व्हय तुसनी बोटभर फाटकी चिंधी ! तुझीच कांबरुण घेत्याल लेका हिसकूनशान् !! ह्मनून ह्मनतों, शेन्या मानसा, धर आपला रस्ता ! (तो ऐकत नाहींसें पाहून) न्हाई तर बस लेका हथ फोड येइस्तुवर वरडत! तुझ्या संग हुजत घालाया हथ है कुनासनी येळ ! जवां कां आमच धनीसाब घ्येत्याल लेका पाठीवर टोल ठिवूनशान् तवां आपसूक जाशील लेका आपल्या आपून !! (निघून जातो.)

दौलत०—

वार्शीच्या भगवंताला-तुळजापूरच्या भवानी आईला—माढ्याच्या देवीला—मोहोळच्या नागनाथाला—पंढरपूरच्या विठोबाला—वडवळच्या नागोबाला—पालीच्या खंडोबाला—सोलापूरच्या सिद्धेश्वराला—काशीच्या विश्वेश्वराला—गोकर्णाच्या लिंगेश्वराला—प्रयागच्या विश्वेश्वराला—

डाकुरच्या श्रीकृष्णाला–नाशिकच्या महेश्वराला–ओढ्याच्या जगन्नाथाला–थेऊरच्या गणपतीला–द्वारकेच्या श्रीकृष्णाला–सोरटी सोमनाथाच्या जोगेश्वरीला-यैतेश्वराच्या शंकराला-कनकेश्वरच्या सांबाला–पुळ्याच्या गणपतीला-चौलवाडीच्या रोकडोबाला–रामेश्वरच्या भद्रेश्वराला–बनेश्वरच्या गुरुम्हाराजाला–खानापूरच्या म्हसोबाला–जरांड्याच्या मारुतीला-परळीच्या रामदासस्वामीला–देहूच्या तुकारामाला–मंगळयेढ्याच्या दामाजीपंताला–गिरीच्या व्यंकोबाला-कोल्हापूरच्या महादेवीला-धौमाच्या नरसोबाला–आन् पुन्याच्या भवानी आईला–

तारा–(खिडकींतून डोकावून पाहून) चिमणे, अग उजाडायला झालं, जागी झालीस का? खालीं वासुदेव आला आहे! ऐकलंसका देवांचीं नावं कशीं गोड ह्मणतो आहे तो!!

दौलत०–

जेजुरी मंदी हो–खंडोबा देवाला हो–उद्धार करुन संसारिक हो–धरम संगती जिवाचा सोबती–खंडोबा देवाला हो–जेजुरी मंदी हो–पाउल दावलं हो–(आलगुज वाजवितो.)

धनाजी०—(खडबडून जागा होऊन आणि खिडकींतून डोकावून पाहून) कोण हा रांडलेक! इतक्या पहांटेस आमच्या दारापुढं किटकिट करून आमची

झोंपमोड करायला आला आहे !! गाढवाच्या खराऱ्या, ही का लेका भीक मागायची वेळ होय ? निघतो आहेस कीं नाहीं येथून ? बेशरम नाहीं तर !

तारा—(वासुदेवाचें सोंग घेतलेल्या दौलतरावाकडे प्रेमानें पहात.) हें काय बाबा ! पोटाच्या आशेनं माणूस आपल्या दारापुढं येतं! त्याच्या आंगावर असं तुटून पडणं चांगलं नाहीं! चिमणे, टाक ग ती माझी खुंटीवरची जुनी चोळी त्याच्या अंगावर—आणि ती पलीकडे दांडीवर माझी जुनी पडदणी वाळते आहेना, ती देखील टाक त्या गरीबाला देऊन !! (चिमणी चोळी व पडदणी खालीं टाकते.)

दौलत०—धरम पावला—पीरीताबाईनें केलेला—
उद्धार मांडिला—पुन्यवान देतो धरमाला.

धनाजी०—(तारेकडे पाहून.) अग ए गाढवी ! तूं काय माझें घर बुडविणार कीं काय ? तुला त्याची फारच दया आली होती तर टाकायचे होतेस चिमूटभर दाणे त्याच्या पदरांत—नाहीं तर वाढायची होतीस त्याला रात्रीची शिळी नितकोर भाकरी ! !

दौलत०—पुण्य रावसाबाचं फळाला आलं—पुण्य बाईसाबाचं उभं राहिलं—पुण्य रावसाबाचं चांगलं करील—देव देइल—धरमाचें माहेर—सुखाचें आगर—(टाळ वाजवून.) पावलं रावसाब महादेवाला—भिमाशंकरच्या महादेवाला—अयोध्येच्या श्रीरामचंद्राला—ह्मसवडच्या जोतीबाला—

वाडीच्या दत्तात्रयाला-पैठणच्या एकनाथाला-मुंबईच्या मम्मादेवीला-आणि पुन्याच्या भांग्या मारुतीला—

तारा०—हें काय बाबा ! देवानं आपल्याला अनुकूळ केलं आहे, ह्मणूनच येतातना हे लोक आपल्या दाराशीं भीक मागायला !! चिमणे, त्या कोनाडच्यांतली पावली टाक बरं त्या गरीबाला देऊन ! (वासुदेवाकडे पाहून) माझ्या बाबांच्या बोलण्याचा राग मानायचा नाहीं हो ! त्यांची प्रकृती अंमळ आहे तापट, ह्मणून ह्मणतें, माझ्याकडे पहा ह्मणजे झालं !! (चिमणी त्याच्या अंगावर पावली टाकून देते.)

दौलत०—पोटीं पुत्र होईल-पांडुरंग कोड पुरवील-पांडुरंगाच्या कृपेनें संपदा मिळेल रावसाबाला-अंबाबाई तुळजा देवी सुखी ठेवील रावसाबाला—

धनाजी०—कारटे ! हें काय आरंभिलें आहेस तूं ? अरे नरशा, अरे ह्मशा, कोण आहे रे तिकडे ? अरे खालीं होऊन ह्या चोरापासून, ती चोळी आणि ती पडदणी हिसकून घेऊन, द्या त्याला येथून लाथ मारुन हांकून !! मोठी आली आहे कारटी धर्म करायला ! ए हलकटा, ए चोरा, निघालास कीं नाहीं अजून येथून ?

दौलत०—धर्मा आड धनीसाब येत्यात, तवा पाया दिसतुया करम फुटायचा ! धनीसाब झाल्यात विरिद्ध

पिकल्या पानावानी, पन् परपंची विच्छा है लै मस्त तरन्या गड्या वानी ! ! नांव काय धनी साबाचं ?

चिमणी–धनाजीराव.

दौलत०—

धरम पावला धनाजीरावाच्या नांवानें–धरम पावला रावसाबाच्या नावानें–दान पावलें राव-साबाकडून–दान पावलें बाईसाबाकडून. (तीन वेळा टाळ वाजवितो.)

तारा––बाबा ! हें काय ? रस्त्यांतल्या भिक्षेकऱ्यावर देखील का तुह्मी आपला अंमल गाजविणार ? आतां मेली शर्थ झाली बाई ! मेलं हे लोक बांधले कां आहेत तुमचे? तुमच्या घरीं कांहीं मिळालं नाहीं तर दहा घरं मोकळीं आहेत समजलं कां बाबा त्यानां !

धनाजी०–कारटे! खिडकी लावून घेऊन आंत जाऊन पडते आहेस कीं नाहीं अंथरुणावर? चिमणे, लाव ग ती खिडकी, आणि ए भिकारड्या, तुझें नशीब आज मोठें फळफळलें असें समजून, तुझ्या पदरांत पडलें आहे त्यांतच संतोष मानून हो येथून चालता !

तारा–बाबा, हे लोक किनई अशा कृतीनं शिव्या श्राप देतात ! आणि अंबाबाई त्यांचे ते श्राप कसे अगदीं बिनचूक वठवते !! ह्मणून ह्मणतें असं तोंड सोडणं चांगलं नाहीं ! वाटलं तर आपल्याला अनुकूल होईल तें यांच्या पदरांत टाकावं, नाहींतर गोड शब्दांनीं यांना

पुढच्या घरीं व्हा ह्मणून सांगावं! कुठला धर्म करायला गेलें असं झालं आहे बाई मला आतां! नको–नको–नको–नको–बाबांच्या पुढें बाई कुणाचें कांहीं चालायचं नाहीं!!

धनाजी०–कारटे, तोंड बंद करते आहेस कीं नाहीं अजून? कां हावें आहे मुस्कट फोडून हातावर! आणि हरामखोरा, काढतो आहेस कीं नाहीं अजून तूं आपला पाय येथून? लुच्चे लोक नाना तऱ्हेचीं सोंगें घेऊन, रात्रींबेरात्रीं चोऱ्या करायला आणि दरवडे घालायला येतात, त्यांतलाच हलकट पाजी चोर दिसतो आहेस तूं मला! धनाजीराव शिव्या देत असतां वासुदेवाचें सोंग घेतलेला दौलतराव धनाजीरावाच्या भाषणाचा आपल्या हातांतील टाळचिपळ्यावर ताल धरतो.) अरे बेरडा, मी तुला शिव्या देत आहे, त्याचा ताल धरून मला जास्त चिडवितोस काय? नरशा, अरे ह्मशा, पुढें होऊन बांधा त्या चोराच्या मुस्क्या–मीही आलोंच त्याचा चांगला खरपूस समाचार घ्यायला!! (दौलतराव व तारा एकमेकांस प्रेमाच्या खुणा करीत असतां पडदा पडतो.)

प्रवेश २ रा.

स्थळ—धनाजीरावाच्या वाड्याच्या आसपासची आडगल्ली.

वेळ—प्रातःकाळ.

(सर्जेराव व सटव्या बोलत प्रवेश करतात.)

सटव्या—धनीसाब, तुमी तर अक्शी वढल्यावानी

दिसता पगा! आज सा रोज झाल न्हका-पन् चीभन् धनीसाबाचा डोळ्यासनी डोळा न्हाई खिनभर!! मी म्हनतो अक्शी हेल्यावानी ढरा-ढरा-ढरा-झ्वाप घेन राहिलं! पन वाइच पलंगावर सवस्थ पडूनशान् गोडसा झुरका तर खरा!!

सर्जेराव—सटव्या, अगदीं खुळा आहेस तूं! अरे, नुसती हेल्यासारखीच काय, पण कुंभकर्णासारखी वर्षानुवर्ष टिकणारी गाढ झोंप मला लागावी, म्हणून मी नवस करतों आहें! पण देवाला माझी अजून करुणा येईना रे!! गजरे! खरोखर तूं फार निर्दय आहेस!! माझी तहान, माझी भूक आणि माझी झोंप तूं–तूं–तूं नाहींशी केलीस!!!

सटव्या—व्हय–व्हय-व्हय–सरकार माजी बी तिनं तीच गत केलीया पगा!! तवां मी म्हनतो, असली खूळ लावनारी आवा धनीसाबासनी व्हावी कशापाई? आं? आन् असा कोन्चा मध चिकटला है तिसनी?

सर्जेराव—सटव्या, ती तशीच गोड आहे रे!

सटव्या—ग्वाड हाये तर चाटा तिसनी साऱ्या इळभर! पन् धनीसाब ह्येच कां ईख तुमच्या आंगामंदीं एकदां भिनलं, तर असा भडका उडल आन् अशी ल्हाई ल्हाई व्हईल, कीं म्हसोबाच्यान् धनीसाब ह्यो परान नग अस व्हइल तुमासनी!!

सर्जेराव—सटव्या, तूं म्हणतोस तें अगदीं खरें आहे! आणि गेल्या रात्रीं माझ्या निर्मळ आणि शुद्ध प्रेमाची तिनें जी थट्टा केली, त्यावरून तिची माझ्यावर

खरोखर प्रीती आहे कीं नाहीं, याचीच मला आतां शंका वाटायला लागली आहे ! !

सटव्या—आन् मी तरी त्येंच ह्मनतुया नव्हका ! धनीसाब, खरं पेरेम न्येरच व्हातया ! त्येसनी इक्ता शीन कराया नग ! थत काम कसं तवांच चटकन् होतया !!

सर्जेराव—तर मग तिचें माझ्यावर खरें प्रेम नाहीं, असें तुझें ह्मणणें काय ?

सटव्या—धनीसाब, हा सटव्याच नग तसं ह्मनाया ! समद् लोक बी असंच ह्मनत्यात ! आन् ह्येच्या पाई तुमासनी नांव बी ठेवत्यात ! !

सर्जेराव—चोरा, मला कांहीं तरी खोटेंच सांगून माझी थट्टा करतोस काय ? ती अजून हूड आहे रे! आणि त्यामुळेंच माझ्या अंतःकरणांत जो कल्होळ उडतो आहे, त्याची तिला अजून कल्पना होत नाहीं रे ! किंवा माझी-स्थिती तिच्या लक्षांत येऊनही लज्जेमुळें तिला आपले विचार मला स्पष्टपणें सांगवत नाहींत असेंही होऊं शकेल ! !

सटव्या—धनीसाब, तुमी काईबी ह्मना—पन् तुमासनी खूळ लागलया ह्ये खास! आन् त्येच्यापायीं आमच्या सारख्या चाकराच बी लै लै हाल व्हत्यात पगा ! चीभन् हा सटव्या साऱ्या रात लोहाराच्या भात्यावानी सवस्थ घोरत झोपायचा ! पन् ह्या कहारापायीं माझं असं करम फुटलया, कीं खिनभर सवस्थ लवंडायाबी गवसना ! !

सर्जेराव—सटव्या, ती मोठी लहरी—हट्टी—कपटी—आणि कावेबाज पोर आहे रे ! हे दुर्गुण जर तिच्या आंगीं

नसते, तर ती एक अमोल स्त्रीरत्न झाली असती !! तुला काय सांगूं! तिचें गालांतल्या गालांत हासणें–आणि प्रेमभरित लज्जायुक्त चोरून पाहणें–फारच मौजदार !! खरोखर सांगतों, गजरा जर मला मिळाली नाहीं तर मी खचित वेडा होईन !

सटव्या–ह्या आवाच्या हसन्यानच लै घान झालीया पगा ! आन् समद्या प्रिथ्मीमंदीं येच्या पाईच उडतुया घोंटाळा ! ह्मनं हसनं लै मौजदार ! आन् पहानं बी लै झोंकदार ! (दूर पाहिलेंसें करून) आं ! कोन दौलतराव ! धनीसाब, तुमचे दोस्त हकडच येत्यात, पगितल का ?

सर्जेराव–हो, दौलतरावच तो ! सटव्या, तूं घराकडे हो. मी हा आलोंच तुझ्या मागून समजलास.

सटव्या–(जांभई देत) अया–या–या–या. झ्वाप तर अक्शी दाट लोटलीया ! धनीसाब, आतां तुमी हतं उभं ऱ्हा ह्मतलं, तरी माझ्या बाच्यान बी उभं ऱ्हानं व्हनार न्हाई ! झ्वाप-झ्वाप-दिसरं कांहीं नग पगा या सटव्यासनी ! (जातां जातां) नग-नग-नग-नग ! त्ये खुदकन् हासंनं बी नग-आन् त्ये पेरेमानं पघनं बी नग ! त्येनंच संमदी घान होतीया ! तरी पन् चीभन्-समदी दुनिया त्येचावरच झुकतीया!! (निघून जातो व दौलतराव प्रवेश करतो.)

सर्जेराव—रामराम दौलतराव ! भले वस्ताद आहांत बोवा तुह्मी !

दौलत०—रामराम ! आह्मी काय वस्तादगिरी केली बोवा ?

सर्जेराव—हं ! आज पहांटे आमच्या दारापुढें कोणी दंगा माजविला होता ? सटव्या सांगत होता, कीं तुह्मी आज अगदीं कमाल करून सोडलीत ह्मणून ! पण या तुमच्या दंग्यांत आमच्या बाबांनीं तुह्माला ओळखलें तर नाहींना ?

दौलत०—ओळखलें नाहीं ह्मणून त्यांनीं आमची नुसती शिव्यांची लाखोली वाहूनच पूजा केली ! नाहीं तर आमच्या टाळक्यांत बडगा घालून, आणि आह्मांला चतुर्भुज करून त्यांनीं आमची आज षोडशोपचारेंच पूजा केली असती समजलास!! बरें झालें आह्मीं लौकर शुद्धी-वर येऊन आवरतें घेतलें ह्मणून! नाहीं तर प्राणावरच येऊन बेतली असती ! बरें पण आतां या वेळेस आ-पली स्वारी घराबाहेरशी ?

सर्जेराव—कांहीं विशेष नाहीं. आपला सहज बाहेर पडलों होतों झालें.

दौलत०—सर्जेराव, माझ्याशीं चोरी काय ?

सर्जेराव—तसं नाहींरे—दौलतराव, खरेंच सांगूं कां तुला ? माझ्या अंतःकरणाला खेंचणारा तो लोहचुं-बक! तिकडे गेलों होतों, तो आतांच परत येतों आहें. दौ-लतराव, तुला काय सांगूं ? गजरेचे हाल या डोळ्यांनीं पाहवत नाहींत! काल रात्रीपासून तिच्या बापानें आणि तिच्या सावत्र आईनें तिला कोंडून ठेविली आहे ! आणि

येत्या अष्टमीच्या मुहूर्तावर त्या बावळ्या भवानरावाबरोबर लग्नाला उभें राहण्याचें जर तिनें नाकारिलें, तर निर्दयपणानें ते तिला मुरळी करणार आहेत ! ही बातमी मला समजली! तेव्हां अशा बिकट प्रसंगीं तिला धीर देऊन तिचें शांतवन करावें असें मनांत आलें, आणि तिची समजूत करण्याकरितां काल मध्य रात्रीं, ज्या माडीवर तिला कोंडून ठेविली होती तेथें मी चोरून गेलों ! तों तुला काय सांगूं ! ती खालीं मान घालून एकसारखी ओक्साबोक्शीं रडत बसली होती ! तिची ती अवस्था पाहून दौलतराव, माझ्या पोटांत अगदीं भडभडून आलें! इतक्यांत ती एकाएकीं धाडकन् भुईवर निश्चेष्ट पडली ! तेव्हां मी चटकन् पुढें होऊन तिचा हात धरला–आणि तूं भिऊं नकोस असें तिला सांगितलें !

दौलत०–सर्जेराव, प्रसंग तर वाईट खराच–पण त्या वेळीं तूं खूप बहार मारली असशील यांत शंका नाहीं !

सर्जेराव—दौलतराव, कसली घेऊन बसला आहेस बहार ! अशा अपरात्रीं मी तेथें आकस्मिक् गेलेला पाहून ती मला–मी चोर आहे–दरवडेखोर आहे–असें ह्मणूं लागली ! तेव्हां तिच्या तोंडावर हात देतां देतां मला पुरे पुरेसें झालें ! !

दौलत०–सर्जेराव, तूं तिचें मन चोरलेंस ! आणि तिचें सौंदर्यभांडारही लुटण्यास प्रवृत्त झालास !! तेव्हां तिनें तुला चोर आणि दरवडेखोर ह्मटलें यांत कांहीं मोठें आश्चर्य नाहीं !!!

सर्जेराव—दौलतराव, राम–राम–राम!!! काय ह्मणतो आहेस हें? अरे प्रसंग कोणता आणि त्या वेळेस हे असले विचार! दौलतराव, मोठें वाईट वाटतें कीं त्या वेळीं ती मलाही कांहीं बोलूं देईना आणि आपणही मन मोकळें करून आपलें हृद्गत मला सांगेना!! उलट मला ती 'येथून चला' असें ह्मणूं लागली!!

दौलत०—मग?

सर्जेराव—मग काय? मी ऐकत नाहीं असें पाहून ती आपल्या बापाला हांक मारून माझी फजीती करण्यासही तयार झाली! तेव्हां दौलतराव, निरुपायानें मला त्याच पाउलीं परतावें लागलें!!

दौलत०—मग काय सर्जेराव, तूं जसा गेलास तसाच परत आलास! तिला चीड येण्यासारखें तूं कांहीं केलें नाहींस!! ठेव माझ्या गळ्यावर हात!

सर्जेराव—तिला प्रेमानें जवळ घेऊन दोन धीराच्या गोष्टी सांगण्यापलीकडे, दौलतराव, तुझ्याच गळ्याशपथ शिष्टाचाराचें उल्लंघन मीं बिलकूल केलें नाहीं!

दौलत०—सर्जेराव, तूं ह्मणतोस इतकीच गोष्ट जरी घटकाभर खरी धरली तरी देखील तूं मोठा भाग्यवान आहेस असेंच मला ह्मटलें पाहिजे! आणि तुलाही पण हें कबूल केलें पाहिजे! परंतु माझी गोष्ट विचारशील तर निराशेशिवाय मला दुसरें कांहींच दिसत नाहीं!!

सर्जेराव—आणि दौलतराव, काल रात्रीच्या

तिच्या वर्तनावरून मला देखील तिची आशा धरायला जागा उरली आहे असें वाटत नाहीं ! तिचें प्रेम माझ्यावर आहे कीं दुसरे कोणावर आहे याचीच मला आतां शंका वाटूं लागली आहे ! ! दौलतराव, हीच गजरा तुला मोठी प्यार होती असें तूं मला मागें सांगत होतास, ह्मणून विचारतों, तोच प्रकार अजून कायम नाहीं ना ?

दौलत॰—सर्जेराव, काय ही भलतीच कल्पना ! मला ती प्यार होती ही गोष्ट खरी; पण तिचा लाभ माझ्या वांट्यास येत नाहीं अशी जेव्हां माझी खातरी झाली तेव्हां तिचा नाद मीं तेव्हांच चटकन् सोडून दिला! आणि सर्जेराव, तुला खरेंच सांगतों–ज्या तरुणीचें मन आपल्यावर नाहीं, तिचें सौंदर्य आपल्या काय कामाचें ! जी आपल्याकडे प्रेमभरित नेत्रांनीं पहात नाहीं, तिचे मोहक नेत्रकटाक्ष आपल्याला काय होत ! जिचें अधरामृत आपल्याला प्राशन करायाला मिळत नाहीं, तिच्या लुसलुशीत, कोमल आणि आरक्त ओष्ठांची आपल्याला काय गोडी ! ज्या गोंडस आाणि नाजूक बाहूंचा विळखा आपल्या मानेभोंवती पडण्याची आशा नाहीं, त्या बाहूंचें वर्णन करीत बसण्यांत आपल्याला काय फायदा ! आणि ज्या स्त्रीच्या हृदयांतील प्रेमसागर आपल्या दर्शनानें उचंबळत नाहीं, तिच्या लोकोत्तर सौंदर्याची आणि गुणांची आपल्याला काय किंमत ! सर्जेराव, गजरे संबंधानें माझी हीच अवस्था झाली ! आणि तेव्हां पासून तुझ्या बहिणीला मी आपली आराध्य देवता समजून

तिच्याच भजनीं लागलों आहें!! आणि खरोखर सांगतों या कामीं मला तुझ्याकडून जर वेळींच मदत झाली, तरच आह्मां उभयतांचें एकमेकांवरील प्रेम विवाहबंधनानें दृढ होऊन आह्मीं अक्षय सुखांत नांदणार आहों !! पण या कामीं जर तूं दुर्लक्ष केलेंस तर येत्या अष्टमीस तुझे बाबा तुझ्या बहिणीचें त्या नेभळ्या मानाजीबरोबर लग्न लावून देऊन तिचें जन्माचें मातेरें करण्यास कधींही चुकणार नाहींत! आणि खचित सांगतों कीं अशा रीतीनें जर माझी निराशा झाली तर हे प्राण मला नकोसे होऊन या जगाला मला शेवटचा रामराम ठोकावा लागेल !!!

सर्जेराव—दौलतराव, शिष्टाचार आणि लौकिक संभाळून, माझ्या हांतून जी मदत तुला आणि माझ्या लाडक्या ताईला होण्यासारखी असेल, ती केल्याशिवाय मी कधींही राहणार नाहीं. पण दौलतराव, अशा गोष्टी अंमळ धीरानेंच घ्याव्या लागतात. ह्मणून सांगतों, कीं तूं मात्र उतावीळपणानें एखादी भलतीच गोष्ट करण्याचा विचार मनांत आणूं नकोस! ताईच्या लग्नासंबंधानें बाबांच्यापाशीं मी आज पुन्हां गोष्ट काढतों, आणि त्यांचें मन वळविण्याचा प्रयत्न करतों. आणि इतकेंही करून जर त्यांनीं आपला हट्ट सोडला नाहीं तर तूं परवां ह्मणत होतास तशी युक्ती लढवून या ह्मातान्याची पुरी खोडमोडण्यास मी कधींही कमी करणार नाहीं!

दौलत०—सर्जेराव, पहा बोवा—माझें तुला एवढेंच सांगणें आहे कीं, जें कांहीं करणें असेल तें त्या फा-

कडच्या बरोबर तुझ्या बहिणीच्या लग्नाची सुपारी होण्यापूर्वी झालें ह्मणजे बरें! नाहीं तर वराती पाठीमागून–

सर्जेराव—दौलतराव, त्याची नको तुला काळजी. पण माझी गजरा मात्र मला–

दौलत०—सर्जेराव, तें काम माझ्याकडे लागलें. खरेंच सांगतों तुझ्या उपकाराचें ऋण गजरेला मी तुझ्या हातीं आणून देऊन फेडीन! मग झालें कीं नाहीं?

सर्जेराव—पहातों आतां तूं माझ्या किती उपयोगी पडतो आहेस तें!

दौलत०—मी त्या उद्योगाला आतांच लागतों, मग झालें कीं नाहीं? पण तूं मला विसरून माझी निराशा करूं नकोस एवढीच माझी तुला विनंती आहे. येतों तर मी आतां–संध्याकाळीं पुन्हां भेट होईलच. (निघून जातो.)

सर्जेराव—या दौलत्याचें गजरेवर पूर्वी असलेलें प्रेम–कालरात्रीचें तिचें माझ्याशीं बेपर्वाईचें वर्तन–आणि आतां या दौलत्यानें मिशीवर पीळ देऊन गजरा तुला मिळवून देतों असें दिलेलें वचन–या गोष्टींच्या परस्पर संबंधाचा विचार करूं लागलों ह्मणजे डोक्यांत भयंकर तरंग उद्भवूं लागतात! आणि मत्सराग्नीनें हें हृदय कढूं लागतें!! पण छे–पण छे कसें–? तसें जर नसेल तर मग मौन कां? आणि दील खुला कां नाहीं? तें कांहीं नाहीं! निदान तिची अजून द्विधा वृत्ति आहे यांत बिलकूल शंका नाहीं, आणि मी कां तो, ह्याची निवड तिला अद्याप होत नाहीं हेंच खरें! मघाशीं तो ह्मणाला त्या प्र-

माणें तिची इच्छा नसतां हा दौलत्या तिचा नाद धरून बसला आहे ? कां तिलाच ह्याचें प्रेम माझ्या प्रेमाहून जास्त वाटत आहे ? काय ही माझी दुर्दशा ! तो कां मी ह्याचा कायमचा निर्णय ठरून या कष्टमय स्थितींतून मी पार पडेन तो सुदीन खरा ! ! (पडदा पडतो.)

प्रवेश ३ रा.

स्थळ—धनाजीरावाचें घर.

वेळ—सकाळ.

(तारा व तिची कुळंबीण चिमणी बोलत बसल्या आहेत असा पडदा उघडतो)

तारा—चिमणे, तूं ह्मणतेस त्याप्रमाणें आपले सारे बेत सिद्धीला जाऊन अखेर या कामांत आपल्याला यश येईल ना ? मला तर बाई मोठी धास्ती वाटते आहे ! बाबांचा राग पहावा तो दिवसेंदिवस आपला वाढत्याच प्रमाणावर ! कालच ते काय ह्मणाले तें ऐकलंसना तूं ?

चिमणी—तें सारं मीं ऐकलं आहे. तुह्माला ते आज या लग्नाच्या बाबतींत एकदां अखेरचं खडसून विचारणार आहेत आणि तुह्मीं त्या मानाजीराव फाकड्याबरोबर लग्न लावायला तयार नसलांत तर तुमचं तोंड पहायचं नाहीं, तुमच्याशीं भाषण वर्ज करायचं आणि तुह्मांला त्या सैतानी बंगल्यांत कोंडून ठेवायचं—हेंच ना ? हात्ति-च्या—यांत हो काय आहे ताईसाहेब इतकं भिण्या-

सारखं ? अशा धमकावणीला कोण्णी देखील भीक घा-
लायचं नाहीं !

तारा—चिमणे, अग ही धमकावणी कसली ? बाबांचा स्वभाव—तुला आहे ना ठाऊक ? तें बोलतील तस्सं केल्याशिवाय कध्धीं कध्धीं सोडायचे नाहींत ! माझ्या आईचे तिच्या अखेरच्या दिवसांत त्यांनीं कसे धिंडवडे मांडले होते, तें तूं विसरलीस वाटतं ? तिच्या एवढ्याशा चुकीबद्दल पाहिलं होतंस ना तिच्या अंतकाळीं देखील बाबांनीं तिच्याशीं कसा अबोला धरला होता तो ? ती सुटली बिचारी एकदां त्यांच्या जाचांतून, तेव्हां त्यांनीं आपलं आतां माझ्यावरच शस्त्र धरलं आहे !! चिमणे, हीं बाबांच्या सारखीं पैशाला चटावलेलीं माणसं, यांच्या अंतःकरणांत किनई दयेला आणि मायेला तिळभरसुद्धां जागा मिळायची नाहीं हो ! तुह्मीं यांच्यापुढं कित्ती रडा—यांच्यापुढं डोकं फोडून घेऊन आपला प्राण काढून ठेवा—यांचीं वाटेल तेवढी आर्जवं करा—यांच्यापुढं सहस्र वेळां नाक घांसा—यांना ह्मणून मायेचा पाझर कध्धीं फुटायचा नाहीं ! ! यांना अब्रूची, का लौकिकाची, का मोठेपणाची कश्शाची कश्शाची देखील चाड नसते ! ! ह्मणून ह्मणतें, कीं तुला सुचलेला हा उपाय जर परमेश्वरानं सिद्धीला नेला तरच लागणार आहे माझा निभाव ! नाहीं तर माझे बाबा पांचहजार रुपड्या घेऊन मला त्या मेल्या बोकडाच्या पदरीं बांधायला कध्धीं कमी करायचे नाहींत ! ! !

चिमणी—ताईसाहेब, तुमच्या डोळ्यांला असं पाणी

आलेलं पाहिलं ह्मणजे माझ्या पोटांत कसं तडतड तोडतं ! आणि असं वाटतं कीं देवानं तुह्मांला आमच्यासारख्या भिकारड्यांच्या पोटीं घातलं असतं तर फार बरं झालं असतं ! !

तारा—खरंच चिमणे, तुमच्यासारखीं माणसं फार सुखी बरं ! मेल्या या लक्ष्मीचं आणि मायेचं कुठ्ठं जुळलं आहे, असं कधीं ऐकायला येत आहे का ! ! आमच्या सारख्यांच्या कपाळीं मानाजीरावासारखेच घुंगुरमाळा घातलेले नवरदेव ब्रह्मदेवानं लिहिलेले असायचे बरं चिमणे ! ! या अशा झुली घालून शृंगारलेल्या बैलांच्या पदरीं पडलेल्या कैक मुलींची अखेर काय होते, ती मेली दररोज डोळ्यापुढं दिसत असून मुलींचे आईबाप जेव्हां डोळेझांक करतात तेव्हां काय ह्मणावं त्यांना ! ! ही असली कसाबाची करणी शोभते कां ग यांना !! आणि परमेश्वराला तरी हें कसं रुचतं कोण जाणे ! ! !

चिमणी—ताईसाहेब, हें उद्यांचं संकट टाळायला मी ह्मणतें आहें असाच कावा केला पाहिजे. आणि तुह्मी तुमची ही पडदपोशी घटकाभर बाजूला ठेवून अंगीं अंमळ धिटाईच धरली पाहिजे. जगाची लाज धरून आपल्या जन्माचं मातेरं करून घेण्यापेक्षां मी ह्मणतें निर्भिडपणानं घटकाभर जगाचं हसूं करून घेतलेलं पतकरलं ! मग होईल ना तुह्माला मी ह्मणतें आहे तसं करायला धीर ?

तारा—चिमणे, मी सारी लाज बाजूला ठेवून या एका लुगड्यावर घराच्या बाहेर पडेन; चार दिवस उन्हातान्हांत हिंडेन; उपास तापास काढीन; काय वाटेल तें करीन–पण खरंच सांगतें, तूं ह्मणतेस तशा रीतीनें इथल्या चाकरमाणसांच्या षट्कर्णीं गोष्ट करून आपली सुटका करून घेणं मला तर बाई मोठ्ठं कठीण दिसतं आहे ! बाबांच्या हातावर तुरी देणं मोठ्ठं कठीण आहे बाई !! आणि हें सारं सुरळीतपणानं निभावलं तर बरं–नाहीं तर जर कां हा डाव हुकला तर चिमणे, साऱ्या जन्मभर मला झिजत मरण्याची पाळी येईल !!! ह्मणून विचारतें, साधेल ना तुला ही बतावणी ?

चिमणी—चाकर माणसं तीं मेलीं आज कोण आहेत घरांत? ह्मशा–नरशा-हे तर आज रेडकाईच्या जत्रेला गेले आहेत. येऊन जाऊन दगड्या आणि येसबा–हे दोघेच काय ते घरांत. त्यांची मूठ आपण खच्चून भरून त्यांचीं तोंडं अगोदरच टाकलीं आहेत पक्कीं शिवून! तशांतून तुह्मीं घरांतून एकदां सुखरूप बाहेर पडल्यावर मग तुह्माला कशाला हवी आहे मागची काळजी ? मी आणि तुमचे बाबा–माजेना आह्मां दोघांत वाटेल तेवढं रण-तुह्मीं मात्र धिटाईनं चटकर व्हा बाबांच्या दृष्टीआड ह्मणजे झालं ! मग मी आहें आणि तो फाकडा आहे ! बघतें त्याचा तमाशा कसा काय आहे तो ! मेल्याला सळोकापळो करून सोडतें !! मी अट्टल सोदा आहें, ह्मणून तो जी एवढी घमेंड मारतो आहे, ती त्याची घमेंड पहा तर खरी

कशी मी तेव्हांच उतरून टाकतें ती!! ताईसाहेब, मी नांवाची चिमणी आहे बरं का! वेळ पडली तर केरसुणीच्या बुंध्यानं—नाहीं तर जात्याच्या खुंटयानं त्याचं टाळकं चांगलं सडकून टाकीन! आणि सारी लाज सोडून मेल्याची भरबाजारांत अब्रू घेईन!! आणि मेला जर फार गमजा करायला लागला तर त्याला चावेन, डसेन, लचकाच काढीन मेल्याचा आंगाचा!!! आणि एकदां कां तो माझ्या मुठींत आला कीं मेल्याच्या टाळूवरून सफै हात फिरवून त्याला उघडानाघडा देईन देशाला धाडून!! काय समजला आहे तो?

तारा—तूं जर त्या मेल्याची अशी फजीती उडवलीस आणि जर तिकडचे पाय मला लाभले, तर चिमणे, (गळ्यांतील चंद्रहार काढून व तो चिमणीच्या गळ्यांत घालून) हा एकटा चंद्रहारच नव्हे तर सोन्यामोत्याच्या डागिन्यानं तुला मढवून काढीन! आणि तुझ्या कपाळचं हें जन्माचं दळिद्र दूर करीन बरं मी तिकडे सांगून!!

चिमणी—ताईसाहेब, त्या फाकडयासारखी धनाची खाण माझ्या हातीं आल्यावर मीच तुह्मांला तुमच्या लग्नांत असा श्रीमंती थाटाचा आहेर करीन, कीं तसा आहेर तुह्मी आजवर कोणाच्या लग्नांत कध्धीं पाहिला नसेल! (दूर पाहिलेसें करून.) पण ताईसाहेब, ते ते पाहिलेत का बाबासाहेब! इकडेच येत आहेत! हं—चला आटपा लवकर—आणि द्या तें दौलतरावांचं मघाशीं मी तुमच्या ज-

वळ दिलेलं पत्र झटकर माझ्याजवळ. कारण आपल्या सर्व व्यूहाची गुरुकिल्ली आणि आपल्या या खेळां-तली मुख्य जादू काय ती त्याच्यांत भरली आहे ! मी हें पत्र आतां येथून जातां जातां बाबासाहेबांच्या इकडे ये-ण्याच्या वाटेवर त्यांच्या दृष्टीस पडेल अशा उघड्या जागीं टाकून देतें. आणि हें का एकदां त्यांच्या दृष्टीस पडलं आणि यांतला मजकूर त्यांनीं वाचला, कीं ते जातील रा-गानं लाल होऊन आणि माझी धिंडका घराबाहेर काढून लावायला होतील तयार ! आणि या थराला गोष्ट आली, कीं ठरल्याप्रमाणं व्हा तुह्मीं चटकन् घराबाहेर ह्मणजे झालं ! ! (चिमणी जाते व धनाजीराव व सर्जेराव बोलत बोलत प्रवेश करतात.)

धनाजी०—सर्ज्या, त्या दौलत्याची संगत धरूं नकोस ह्मणून तुला पन्नास वेळां निक्षून सांगितलें—पण तूं आपला हट्ट अजून सोडीत नाहींस याचा परिणाम नीट होणार नाहीं बरं ! मी तुला पुन्हां पुन्हां सांगतों आहें, अजून तरी डोळे उघड—आणि त्याच्या सारखा निर्लज्ज बनून हें पोळासारखें गांवभर भटकणें सोडून दे ! तुझे हे असले ढंग मला बिलकूल खपणार नाहींत ! इ-तकी जबरदस्त मोहनी तुला त्यानें कोणती घातली असेल ती असो ! त्याच्या सारखीं नाना तऱ्हेचीं सोगें घेऊन आणि रूपें पालटून तूं नाहींस ना कोणाच्या घरांभोंवतीं घिरट्या घालायला लागलास ! (तारेकडे पाहून) ही कार्टी तर सारी लाज खुंटीला गुंडाळून ठेवून माझ्या नां-

वाला काळोखी लावायला तयार झाली आहे ! आणि तूं जर त्या दौलत्यासारखी निशाचरवृत्ति पतकरून कोणाच्या घराभोंवतीं घिरट्या घालूं लागलास तर बेरडा माझ्या तोंडाला लोक काजळ फांसतील ! आणि तुला हलकट, लुच्या, पाजी, गद्धा असें ह्मणतील !! ह्मणून सांगतों कीं वेळींच सावध हो. नाहीं तर तुझे हे असले अंधारांतले चाळे जगापुढें येऊन लोकांत तुझी आणि तुझ्या बरोबर माझी छीः थूः होईल !!! आज पहांटे त्या दौलत्यानें आपल्या दारापुढं केवढा धिंगाणा माजविला होता ! मी जागा होऊन त्याच्याशीं दोन शब्द ठांसून बोलतांच तो पळून गेला ! त्या बेरडाला मी त्या वेळीं ओळखिलें नाहीं रे ! नाहीं तर या बडग्यानें त्याचा आज कपाळमोक्षच केला असता !! चवचाल कार्टी ! धर्म करायच्या निमित्तानें खिडकीचें दार उघडून त्याच्याकडे काय ग आपलें बोडकें पहात होतीस ! त्याला काय हिरेमाणकें लागलीं आहेत वाटतें ? आणि त्या मानाजीरावाला किडे पडले आहेत होय ? बऱ्या बोलानें त्या पाजीचा नाद सोडून मानाजीरावाबरोबर लग्नाला उभें रहायचें कबूल केलेंस तर बरें—नाहींतर कार्टे, उभी चिरून टाकीन तुला ! असली खटचाळ कार्टी जिवंत राहण्यापेक्षां मेलेली काय वाईट !! मग ऐकायचें आहे कीं नाहीं तुला माझें ?

सर्जेराव—बाबा, कोण हा तुमचा हट्टवादीपणा ! जो नवरदेव ताईला पसंत नाहीं, त्याच्याशीं तिला बळेंच दावणीला बांधणें ह्मणजे बाबा, वडिलांनीं आपल्या

अेरेरावीच्या भव्य इमारतीवर कळस बांधणें होय ! ! बाबा, ताईच्या जन्माची अशा रीतीनें माती करण्यापेक्षां तिला मुळींच अविवाहित ठेविलेली काय वाईट ? नाहीं तर तिच्या गळ्यांत धोंडा बांधून तिला एखाद्या डोहांत जिवंत जलसमाध दिलेली काय वाईट ?

धनाजी०—कार्ट्या, तुझें तोंड आज फारसें सुटलें आहे ? कांहीं चिलीम बिलीम, अफू, चंडोल, गांजा, भांग यांतला कांहीं प्रकार नाहीं ना केलास आज ? मी कोण-तूं कोण–तूं बोलतो आहेस काय–आणि तें कोणाशीं–याचें कांहीं आहे का तुला भान ? गाढवाचें पोर किती जरी गोड झालें तरी त्याला अंथरुणावर लोळूं देण्याइतका बेशरम मी अद्याप झालों नाहीं हें ध्यानांत ठेव ! हरामखोरा–कार्टीची समजूत घालून तिला शुद्धीवर आणायची, तें सोडून माझ्याशीं वितंडवाद घालतोस काय ? आणि माझ्या सारख्या वृद्धाला शहाणपणा शिकवितोस ? थोबाड रंगवून टाकीन, ठाऊक नाहीं अजून ! मी तुझा आणि या कार्टीचा बाप आहे हें तूं विसरलास वाटतें ? तुह्मीं उभयतांनींही मी ह्मणेन तसें वागलेंच पाहिजे, हा तुमचा धर्म असून तुह्मीं मला उलट्या गोष्टी सांगायला लागलात काय ? तुला तुझ्या बहिणीचें हित कळतें आणि ती माझी पोटची पोर असून मी तिचें अनहित करतों आं ! अरे, मानाजीरावाच्या घरीं केवढी संपत्ती आहे ! पालखीपदस्ताच्या घरीं देखील माझ्या तारीला इतकें सुख लागायचें नाहीं समजलास ! मानाजीराव हिला अ-

गर्दी तळहाताच्या फोडाप्रमाणें वागवील! उंची उंची लुगडीं—भरगच्ची चोळ्या—सोन्यांचे—मोत्यांचे—हिऱ्याचे—माणकाचे—लठ्ठ लठ्ठ डागिनें, गिळायला त्रिकाळ पंचपक्वान्नें, बसायला पालखी मिळणार पालखी!! सेवेला मुबलक दासदासी! कार्ट्यां, हीं सर्व सुखाचीं साधनें त्या मानाजीरावाच्या घरींच तारेच्या वाऱ्यास येणार आहेत समजलास!!! आणि कार्टे, ह्मणूनच विचारतों, कीं हे भिकेचे डोहाळे कुठले आठवले आहेत तुला या वेळेला?

सर्जेराव—बाबा, आपण ह्मणतां हे सुखाचे प्रकार बाह्योपचाराचे आणि लौकिकी होत. यांत अंतर्यामच्या अविनाशी सुखाचा लवलेशही नाहीं! खऱ्या सुखाची मदार डागडागिने नोकरचाकर ऐषआराम आणि सुग्रास अन्न किंवा भरगच्ची वस्त्रप्रावरण यांवर बिलकूल नाहीं. त्याला प्रिय वस्तुचाच सहवास लागतो. आणि तो जेथें नाहीं त्या ठिकाणीं काय प्रकार होतात त्यांची शेकडोंशें उदाहरणें या जगांत दररोज आपल्या प्रत्यक्ष दृष्टीस पडत आहेत आणि आपल्या कानांनीं आपण ऐकत आहोंत! अमक्या सरदाराची बायको, घरीं सर्व प्रकारचीं सुखें अनुकूळ असतां अमक्याचा हात धरुन निघून गेली! अमक्या इनामदाराच्या पोरीनें आपल्या नवऱ्याला विषप्रयोग केला! अमक्या श्रीमंताच्या बाईनें आपलें पातिव्रत्यभांडार एका फिरस्त्या चोराकडून लुटविलें! अमकीनें आपल्या नवऱ्याला काडी मोडून देऊन अमक्याशीं पाट लावला! आणि अमकीनें आपल्या गळ्याला फांस लावून घेऊन

आपला अंत करून घेतला ! ! एक ना दोन अशी परंपरा लोक आज कैक वर्षें पहात आले आहेत. पण या अनार्थांचें मूळ बीज जो जुलुमाचा विवाह त्याकडे कोणाचेंच लक्ष्य जात नाहीं, हें केवढें आश्चर्य ! ! ! हा मानाजीराव ताईला धडधडीत अप्रिय असतां त्याच्या घरांत तुह्मीं हिला बलात्कारानें कोंबीत आहांत ! केवढा हा आपला कठोरपणा ! ! बाबा,-

धनाजी०—अहो उंटावरचे शहाणे, आवरा-आवरा तुमचें हें वाक्पांडित्य आणि करा काळें येथून बऱ्या बोलानें. गाढवा, त्या मानाजीरावांत कायरे कमी आहे ? आणि या गधडीला तरी त्याची येवढी ओकारी यायला त्याला कसली ग घाण लागली आहे ?

सर्जेराव—पहिली गोष्ट ही कीं तो जातीचा अस्सल मराठा नाहीं ! कडू आहे ! ! आणि त्याला मारवाड्याचा पदर आहे ह्मणून ह्मणतात ! ! !

धनाजी०—-शर्थ आहे बोवा या जगाच्या पुढें ! हें जग कोणाला काय ह्मणेल याचा कांहीं नेम नाहीं ! ! तो मारवाड देशांत राहतो ह्मणून लगेच त्याला मारवाड्याचा पदर लागला आं ! ! धन्य आहे बोवा लोकांच्या कुटाळपणाची ! कडूनी गोड-तो भोपळाबिपळा आहे ह्मणून खायचा आहे थोडाच त्याला ! आमच्या मराठमोळ्यांतल्या जाती आणि ब्राह्मणांतलीं ऋषींचीं मुळें उकरून काढण्याच्या भानगडींत शहाण्यानें कधीं पडूं नये समजलास ! !

तारा–शिवाय तो किनई कसासाच दिसतो बाबा !

धनाजी०—कसासाच दिसतो ! त्याला काय तीन हात आणि एकच पाय आहे वाटतें !

तारा—मेल्याच्या तोंडावर टाकी किती दिली आहे ! रंगानं मेला किती काळा कुट्ट आहे ! मुरकतो काय मेला बायकांच्या सारखा ! नटतो काय मेला एखाद्या बाजारबसवी सारखा ! इश्श !! मेला उकिरड्यावरचा दिसतो जसा कांहीं !!!

सर्जेराव—शिवाय बाबा, काल तो माझ्या शेजारीं बसला होता–राम–राम–राम–कोण घाण मारीत होती त्याच्या अंगाला !

तारा०—आणि त्याच्या बोलण्यांत–बसण्यांत–उठण्यांत–चालण्यांत एवढासा तरी आहे का पोक्तपणा ! बोलतो काय वचावचा, बसतो काय हेल्यासारखा–मेला चालतो काय उंटासारखा–हलकट सोदा दिसतो आहे सगळ्या मुलखाचा !!

सर्जेराव—आणि इतकें असून शिवाय मूर्खांचा राजाही आहे !!!

धनाजी०—(दोघेंही क्षणभर बोलायचीं थांबलेलीं पाहून) कां ? चालूं द्या तुमच्या तोंडाचा पट्टा ! थांबलांत कां ? पुरी हौस फेडून घ्या एकदां मनाची ! पुन्हां अशी सोन्यासारखी वेळ यायची नाहीं ! ह्मणून ह्मणतों–कांहीं शिल्लक ह्मणून राहूं देऊं नका !

सर्जेराव—आणि बाबा—

धनाजी०—हां खबदार माझें नांव घेशील तर. त्या कार्टीशींच चालूं दे तुझें पांडित्य! वडिलांची मर्यादा फार चांगली राखतो आहेस बरें बाबा! आणि मला ह्मातान्याला वृद्धपणीं सुख देण्याला खाशी युक्ती शोधून काढली आहांत बरें तुह्मीं!! राम-राम-राम-अशीं मुलें ज्यांच्या पोटीं ब्रह्मदेवानें घातलीं असतील ते पुरे हतभागी यांत बिलकूल शंका नाहीं!! लहानपणीं मुलांची खस्त खायची-त्यांना न्हाऊं माखूं घालायचें-त्यांना हाता खांद्यावर झेलायचें-त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था करायची आणि त्यांना लहानाचीं मोठीं करायचीं-कशा करितां, तर वृद्धपणीं त्यांनीं आपल्याला सुख द्यावें आणि आपले हात पाय थकले ह्मणजे तीं आपल्या उपयोगीं पडावीं ह्मणून! पण पोरांचे लहानपणचे ते आंखूड कान मोठेपणीं असे लांब झाल्यावर जेव्हां तीं सूर काढून अशा दुगाण्या झाडायला लागतात तेव्हां त्यांनीं झाडलेल्या दुगाण्यांच्या कठोर प्रहारांनीं हें काळीज कसें दुभंग होऊन जातें.!! आणि हा असा अपमान करून घेऊन जिवंत राहण्यापेक्षां पटकन् मरून गेलेलें फार बरें वाटतें!!!

तारा—बाबा, नका हो मजवर असे निष्ठुर होऊं! मी किनई हा पदर पसरला आहे तुमच्या पुढं! तुह्मांला जर मला अशी कसाबाच्या हातीं द्यायची होती, तर लहानपणींच जेव्हां मला कांहीं कळत नव्हतं तेव्हांच कां नाहीं माझा विक्रय करून टाकलात? ह्मणजे माझ्या जन्माचा असा खेळखंडोबा तरी झाला नसता!!

सर्जेराव—बाबा, ऐका–माझ्या लाडक्या ताईकरितां तरी माझें एवढें ऐका ! ही ताईची स्थिति पाहून काळीज कसें चर्र होतें !!

धनाजी०—पोरी, काय ह्मणावें तुझ्या या हट्टाला ! अग, मानाजीराव खरोखरच तुला योग्य पति आहे ! पोरी, मागचा पुढचा पोंच तुझ्या आंगीं आला नाहीं ग अजून, आणि ह्मणूनच त्या गोऱ्या भुरक्या दौलत्याचा नाद धरून बसली आहेस तूं ! अग, मानाजीचा स्वभाव किती गोड आहे ह्मणून सांगूं ! तूं त्याची एकदां पट्टराणी झालीस कीं नाहीं ह्मणजे बाळे, तुझ्या समोर तो मोठ्या थाटानें चालेल ! तुझ्याशीं गोड गोड आणि प्रेमानें बोलेल ! तुला तो कशाची देखील उणीव पडूं देणार नाहीं ! तुला तो हातावर झेलील बरें ! तुझा एवढासा शब्द सुद्धां तो खालीं पडूं द्यायचा नाहीं ! अग, हे दौलतरावासारखे कफल्लक लोक, यांच्या रंगारूपाला आणि गुणांला काय चाटायचें आहे ! त्या दौलत्याचा हा दिमाख साऱ्या जन्मभर टिकणार आहे काय ? घरांत मीठ आहे तर पीठ नाहीं, आणि पीठ आहे तर मीठ नाहीं, अशांतला होणार आहे पुढें लवकरच त्याचा प्रकार समजलीस !!

तारा—मला तें सारं पत्करलं बाबा ! मला तीं तुमचीं उंचीं वस्त्रं नकोत–तुमचे ते खंडीभर डागिने नकोत–आणि तुमचीं तीं पंचपक्वान्नंही नकोत !! त्यांच्या सहवासांत साऱ्या जन्मभर जरी मला गरीबींत दिवस काढण्याचा

प्रसंग आला तरी चालेल ! पण बाबा, माझ्यावर अशी आग पाखडूं नका ! आणि माझी अशी बळंच मोटही बांधूं नका एवढंच माझं पदर पसरून मागणं आहे!!

सर्जेराव—बाबा, ताईनें तुमच्यापुढें आतां आपला प्राण काढून ठेवायचा उरला आहे बाकी. !

धनाजी०—ती माझ्यापुढें आपले प्राण काढून ठेवो, कीं जीभ आंसडून घेऊन माझ्यापुढें आपला जीव देवो—तिनें त्या मानाजीरावाबरोबर लग्न लावायला तयार झालेंच पाहिजे!!

तारा—बाबा, तुह्मांला जर माझ्या जिवाची इतकी परवा नाहीं तर तुमचा वडीलपणाचा मान माझ्याकडून राहिला नाहीं, तर त्याची मात्र मला क्षमा असूंद्या !

धनाजी०—असें काय ? कार्टे, तुझ्या डोक्यांत शिरलेलें हें वेड काढून टाकायला तुझ्या डोळ्यांत चांगलेंच अंजन घातलें पाहिजे ! त्या शिवाय तूं कुठली वठणीला यायला!! आणि कार्ट्या—तुलाही घरांतून हांकून दिल्याशिवाय तूं तरी कुठला नरम यायला !!

तारा—बाबा—

धनाजी०—चूप—जास्त एक अक्षर सुद्धां बोलूं नकोस. आजपासून तो सैतानी बंगला तुझें सारें जग समजलीस! तुला कोंडून ठेवून मारे मिर्च्यांची धुरी देववितों आणि तुझें अन्न पाणी तोडून मिठाच्या पाण्यानें तुझ्या पाठीवर कोरडे ओढवितों ! तूं काय समजलीस?

नीच–नीच–नीच माझ्या डोळ्यांसमोरून (तिला मारून घालवून देतो.)

सर्जेराव—बाबासाहेब, कडेलोट झाला आज आपल्या पुत्रवात्सल्याचा ! वधूच्या मर्जीविरुद्ध तुमच्या आमच्या हट्टानें घडून येणारे हे असले विवाह परिणामीं अनिष्टकारक होतात ह्मणून मघांशीं ताईच्या तोंडावर मी आपल्याला आड पडद्यांत सांगितलें ! तें आपल्या ध्यानांत आलें नाहीं वाटतें ?

धनाजी—सर्ज्या, कसली रे घेऊन बसला आहेस त्या कार्टीची पसंती ? आणि असें चटोरपणानें माझ्या पुढें दांत काढून आणि जीभ लांब करून बोलायला शरम नाहीं वाटत तुला ?

सर्जेराव—बाबा, आपली लाज बाळगून ताईच्या जन्माचें नुकसान होऊं देण्यापेक्षां निर्लज्जपणानें तुमची वेळींच समजूत पाडणें लाखपटीनें उत्तम असें मला वाटतें !

धनाजी०—कार्ट्या, जीभ आखडतो आहेस कीं नाहीं अजून ?

सर्जेराव—बाबा, माझ्या टाळक्यांत हा हातांतला बडगा घालून माझा प्राण घेतलात तरी बेहत्तर ! पण जें खरें असेल तें यावेळीं मला बोललेंच पाहिजे.

धनाजी०—बेरडा, असलें हें चऱ्हाट येथें वळीत बसून माझें टाळकें उठविशील तर खबरदार. निघतो

आहेस कीं नाहीं येथून ? कां खरेंच घालूं याचा एक रट्टा तुझ्या बोडक्यांत ?

सर्जेराव—हें शीर आपल्या पुढें केलें आहे! लगावा–खुशाल एक सोडून पन्नास टोले लगावा! तुह्मीं माझ्या टाळक्यावर सहस्र प्रहार जरी केलेत तरी त्यापासून या शरीराला उत्पन्न होणाऱ्या यातना आणि मनाला उत्पन्न होणारें दुःख ताईच्या या दुःसह स्थितीपेक्षां सहस्रपटींनें मला हलकें वाटेल ! ! !

धनाजी०—मर शिंच्या–आणि बस लेका असा येथें एकटाच ओरडत ! अगोदर त्या कार्टीचा समाचार घेतला पाहिजे ! पहातों आतां तुमचा हट्ट चालतो कीं मी आपला हट्ट शेवटास नेतों तें ! ! (रागानें निघून जातो.)

सर्जेराव—इतकी शिकस्त केली मीं आपल्या कडून, पण बाबांच्या त्या पाषाणहृदयावर त्याचा यत्किंचितही परिणाम झाला नाहीं ! उलट माझ्यामुळें ताईची याहून जास्त विटंबना न होवो ह्मणजे झालें ! ! अशीं हीं भरी भरलेलीं थेर्डी माणसें काय करतील आणि काय न करतील याचा नेम नाहीं ! वेळ पडली तर प्रत्यक्ष पोटच्या गोळ्याच्या गळ्याला नख द्यायला सुद्धां हीं कमी करायची नाहींत ! ! दोस्त दौलतराव, माझ्या लाडक्या ताईबद्दल तुझी आतां सर्वस्वी निराशा होणार ह्मणून मला फार वाईट वाटतें ! पण छेः–निःसीम प्रेमाच्या दृढबंधनानें एकत्र बद्ध झालेलीं स्त्रीपुरुषांचीं जोडपीं असल्या या अल्प काळ टिकणाऱ्या वावटळीस मुळींच जुमानीत नाहींत !

इतकेंच नाहीं, तर उलट असा प्रतिकूळ झंझावात जों जों जोरानें वाहूं लागेल तों तों तीं एकमेकांस अधिकाधिक प्रिय होतात! हा जो सिद्धांत त्यास ताईसारख्या खंबीर मनाच्या आणि दृढ निश्चयी अबलेकडून आणि दोस्त दौलतरावासारख्या एकवचनी, दिलदार आणि प्रेमळ पुरुषाकडून बट्टा लागेल असें मला तरी वाटत नाहीं !! मग या उप्पर परमेश्वरी नेमानेम असेल तो खरा !! (पडद्यांत आरडाओरड ऐकूं येते) अरे या वेळेला आमच्या घरांत हा कसला कल्लोळ उठला आहे ? (दूर पाहिलेंसें करून) अरे हा थेर्डा तर आतां त्या बटकुराच्याच मागें लागला! हा आतां वाटेनें येणाऱ्या जाणाऱ्यावर सुद्धां जेव्हां चालून जाऊं लागला तेव्हां काय ह्मणावें याच्या अकलेला !! बटकुराच्या आंगाला झोंबण्यापर्यंत आणि तिच्या दंडाला धरून तिला फर फर ओढण्यापर्यंत ज्या अर्थी आतां मजल येऊन ठेपली आहे, त्या अर्थी या थेर्ड्याच्या आंगाची आग होण्याला तसेंच कांहीं तरी कारण झालें असलें पाहिजे ! तेव्हां या लठ्ठालठ्ठीच्या भानगडींत पडण्यापेक्षां तूर्त आपण आपला येथून चटकन् पाय काढलेला बरा ! (निघून जातो.)

(धनाजीराव चिमणीला फरफर ओढीत घेऊन येतो.)

चिमणी–अग–बया–बया–बया–बया–अग–आई–आई–मेलें–मेलें–मेलें हो मेलें—

धनाजी०—चाव–डस–तोड–लचका तोड माझ्या हाताचा ! तुला वाटतें या ह्मातार्‍याच्या आंगांत कांहीं

अवसान नसेल आं ? एक मुस्कुटांत लगावली तर इकडलें गालफड तिकडे करून टाकीन, ठाऊक नाहीं अजून ! त्या दौलत्याची कुंटणगिरी पतकरून माझ्या वाड्यांत फंदफितूर माजवला आहेस काय ? थेर्डे, या वयांत तुला हे असले चाळे आणि असले ढंग आठवले आहेत काय ? काळुंद्रे, तुझी वाचा बसली कीं काय आतां ? माझ्या पोरीला घरांतून पळवून नेण्याची तुझी खटपट आं ! (तिला मारतो)

चिमणी—अय्–य्–य्–य्–य्–मेल्या आण माझं तें पत्र–बायकांच्या अंगाला झोंबायला लाज नाहीं वाटत तुला ? सोडतो आहेस कीं नाहीं माझं मनगट ? अंगाला अंग घांसतो आहे मेला मघांपासून! तुझं ह्मणणं तरी काय ? आणि तूं करणार तरी काय माझं ? मला असा मारीत बसणार होय ? मार–मार–मार मेल्या खुशाल मार ! मार–कीं ?

धनाजी०—काय वेसवा आहे हो ! मघांपासून मी तिची इतकी शोभा करतों आहें, पण आहे का कांहीं तिला त्याची लाज ! बेशरम ! कुंटणीची जात अस्सल बेरडाची दिसते !! अशा कैदाशिणीच्या सहवासांत मीं आपल्या पोरीला आजवर ठेवण्यांत मोठी चूक केली ! आणि हिच्याच चिथावणीनें माझी पोर इतकी बेताल झाली !!

चिमणी—थेर्ड्या, तुझं मला इतकं भय कशाला हवं आहे ? हो माझ्याच चिथावणीनं तुझी पोर बेताल झाली बरं ! मग काय ह्मणणं आहे तुझं ? साठी आणि बुद्धि

नाठी अशांतली झाली आहे तुझी गत ! आणि ह्मणूनच बरं या ह्मातारचळांत ती नक्षत्रासारखी तुझी पोर पैशाच्या आशेनं त्या खुळ्या नवऱ्याच्या गळ्यांत बांधायला तयार झाला आहेस तूं ! ! तुझ्या पोरीला साजे असं त्याच्यांत रूप–कां गुण–कां अक्कल–कां ऐट–एक एक तरी आहे का ? आणि खविसा, अशा अजागळ आणि बावळ्या नवऱ्याच्या पदरीं पडून तुझ्या पोरीला काय सुख लागणार आहे ! आणि तिचा संसार तरी कसा होणार ! ! तिला ह्मटलं ह्मणजे दौलतरावांच्या सारखाच रूपगुणसंपन्न–छेलछबेला–रंगेलाच मिळाला पाहिजे ! तरच तिच्या जन्माची हौस फिटेल बरं ! ! नाहीं तर तुझ्या नांवानं तिला जन्मभर रडत बसावं लागेल समजलास ! ! !

धनाजी०—अग हाडळी, मला ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी शिकवितेस होय ? भांडीं घासतां घांसतां आणि लुगडीं धुतां धुतां हाताला घट्टे पडले आहेत ते पुरे झाले नाहींत वाटतें ? आतां लोखंडाच्या पाटल्या आणि तोडे हवे आहेत वाटतें हातांत ? दम धर ! तेही ठोकतों लवकरच तुझ्या हातांत ! आणि मग पाहतों तुझा तो छेलछबेला दौलत्या, आणि तूं पढवून तयार केलेली ती चवचाल कार्टी, येत आहेत कां तुला सोडवायला तीं ! आजपर्यंत तुला गळगळघशीं गिळायला घातलें आणि तुला मोठमोठीं उंची उंची लुगडीं नेसायला दिलीं आणि तुला कुटुंबांतल्या माणसाप्रमाणें वागविली ह्मणून तुझी अशी मिजास वाढली होय ?

चिमणी—आजवर मला अगदीं फुकटच घातलं असशील गिळायला ! तुझ्या पोरीला लहानाची मोठी केली, तिला प्रेमानं न्हाऊं धुऊं घातली, तिला कडेखांद्यावर खेळविली, तिला तिच्या आईचा विसर पाडला आणि हीं हाडांचीं काडं करून घेतलीं, त्याची अखेर फार चांगली केलीस बरं ! ! तुझ्या तोंडांत शेण घालायला आणि तुझा कान वेळींच पिळायला कोणी उरलं नाहीं आतां तुझ्या घरांत ! आणि ह्मणूनच चालली आहेत बरं तुझीं हीं असलीं थेरं ! ! प्रत्यक्ष पोटच्या पोरीचा छळ मांडला आहेस याचं पाप कुठं फेडशील तें फेड ! ! !

धनाजी०—मी तुला प्रायश्चित्त देतों तें तर घे अगोदर ! (तिला मारतो) मग माझें मी पाहून घेईन ! नीघ, नीघ, नीघ, या घटकेला हो माझ्या घरांतून चालती ! तुला येथें पाणी प्यायला सुद्धां राहूं देणार नाहीं मी आतां !!

चिमणी—आणि मी तरी आतां कुठली या बंदीखान्यांत रहा ह्मटलंस तरी राहायला ! मेल्याची देवाला जायची—कां कुणाकडे बसायला जायची—कां घटकाभर इथं कोणाला बसा बोलायला आणायची-सगळ्या—सगळ्या गोष्टींत मेल्याची जशी चोरी ! तुला भिऊन भिऊन वागायचं तरी कुठवर ? पण मी येथून गेल्यावर हा मांग ताईसाहेबांना कुठला सुखानं राहूं द्यायला ! हा राक्षस त्यांना अष्टौप्रहर तापल्या तव्यावर उभं करील. ह्मणून मोठं वाईट वाटतं ! ! आणि पोटांत कसं अगदीं भडभडून येतं ! ! !

धनाजी०—हं! काय सोंग आणलें आहे वेसवेनें! मायेचा जसा कांहीं पान्हाच फुटला आहे हिला!!

चिमणी—बेरडा, तूं निर्दय मांग आहेस रे मांग! मेल्या शुद्ध राक्षस आहेस तूं! अरे खवीसा, तुझ्या सारख्या कोळशाच्या पोटीं ताईसाहेबांसारखा हिरा जन्माला येऊन अखेर त्याला तूं उकिरड्यावर फेंकून देणार ह्मणून मोठ्ठं अवघड वाटतं!!!

धनाजी०—आतां करते आहेस कीं नाहीं काळें येथून? कां अजून शोभा करून घ्यायची हौस उरली आहे तुझी?

चिमणी—ही मी चाललें. मी इतका घसा कोरडा करतें आहें, पण याच्या डोळ्याला पहा कीं—एक—एक तरी टिपूस येत आहे कां तें!

धनाजी०—हं—चला—आटपा—पडूंद्या एकदां तुमची धिंडका घराच्या बाहेर—

चिमणी—मेल्या, माझीं लुगडीं—माझ्या चोळ्या—माझे खण—माझं किडुकमिडुक—माझी चीजवस्त—हीं तरी माझीं मला घेऊं द्यायचीं आहेत कीं नाहीं? कां तीं देखील गिळंकृत करायचीं आहेत? बाकी तुझी कीर्ति ह्मटली ह्मणजे तूं पैशाकरितां मढ्याच्या टाळूवरचं सुद्धां लोणी चाखायला कमी करायचा नाहींस!!

धनाजी०—कसलीं ग आलीं आहेत तुला बटकुराला चोळ्या नी लुगडीं! कशाला तरी उपटा देऊन जायचं असेल येथून!! हाडळी, माझ्या घरीं जेव्हां नो-

करीला राहिलीस तेव्हां काय आणलें होतेंस बरोबर ? नुसती अवधूत लंका तर आली होतीस ! ! ह्मणे माझें किडूकमिडूक आणि चीजवस्त ! ! !

चिमणी—नुसतं माझं किडूकमिडूकच नाहीं—तर ताईसाहेबांच्या खोलींत गाडग्यांत पुरून ठेवलेली माझी ठेव आहे समजलास ! ठेव !! ती तरी माझी मला परत देण्याची बुद्धि होते आहे कीं नाहीं तुला? माझा तोंडावरचा बुरखा—तो तरी आहे ना माझा ? कां तोही ठेवून घेऊन आणि तो आपल्या तोंडावर टाकून हिंडणार आहेस माझ्या सारखा साऱ्या गांवभर वाण वाटीत ! ! ताईसाहेबांना मला एकदां शेवटचं कडकडून भेटलं पाहिजे ! त्यांचा विरह मला कसा सहन होईल तो होवो ! देवा, या राक्षसाच्या हातून ताईसाहेबांचं रक्षण तुलाच केलं पाहिजे आतां ! !

धनाजी—अग हाडळी, काय तुझें असेल तें घेऊन कर एकदां काळें तोंड माझ्या घरांतून ! तोंडावरचा बुरखा !! तुला कशाला बुरखा आणि पडदपोशी हवी आहे वेसवेला ! आणि तुझें तारुण्य कोठें चाललें आहे आतां वायां ! ! आणि तुला थेर्डीला कोण टपलें आहे आतां निरखून पाहायला !! अग ए मदनाचे पुतळी ! तुला जर जगाची लाज वाटत असली तर घे आपला बुरखा आणि आतांच्या आतां काढ आपला पाय येथून—निघालीस कीं नाहीं अजून ? कां घालूं याचा एक रट्टा टाळक्यांत ! नीघ—नीघ—नीघ—(चिमणीला मारीत मारीत

हांकून देतो) पोटीं मुली आल्या ह्मणजे कर्मांत हें असें सुख लिहिलेलें असतें बरें! या विषाचें पाणी दिलेल्या तीव्र कट्यारी ज्यांच्या ज्यांच्या उरावर परमेश्वरानें ठेवल्या असतील ते पुरे हतभागी यांत शंका नाहीं!! नको—नको—नको—नको—या तारेनें माझा जीव अगदीं रंजीस आणला. ही साडेसाती माझ्या घरांतून कधीं निघेल ती खरी! (तारा चिमणीचा पोषाख करून व तोंडावर बुरखा घेऊन रडत रडत पुढें येते. ती चिमणीच आहे अशी कल्पना करून) या—अशा इकडून चला! काय कांगाव करते आहे ही सटवी! हुंदके देत आहे हुंदके!! तुला त्या कार्टीचा विरह दुःसह झाला असेल नाहीं? बस बरें, साऱ्या जन्मभर अशी रडत बस! बरें झालें या वेळेस तें आपलें खापर तोंड झांकून घेतलें आहेस ह्मणून! नाहीं तर त्याच्या दर्शनानें माझे डोळे व्यर्थ विटाळले असते! कां? लाथ पाहिजे वाटतें एक कमरेवर? तुझा रस्ता तुला दिसत नाहीं होय? कां पाय उचलायला शक्ति उरली नाहीं तुझ्या आंगांत? बटकीच्या तोंडांतून आतां एकतरी शब्द निघतो आहे कां? कुंटणगिरी करायच्या वेळीं कोठें गेली होती अक्कल शेण खात? आतां भोग त्याचें प्रायश्चित्त जन्मभर! आतां सगळें जग तुला मोकळें आहे!! त्या तुझ्या रंगेल छबेल्या दौलत्याकडे जा आणि त्याला सांग कीं मला धनाजीरावानें लाथ मारून हांकून दिली ह्मणून! आणि त्याच्या गळ्यांत गळा घालून बस आतां जन्माची भाकर गेली ह्मणून चौपद्री

गळा काढून ओरडत!! कुटणी–वेसवा–हाडळ! (तारा निघून जाते व जातां जातां तोंडावरचा पदर दूर करून मी तारा आहें असें प्रेक्षकांस दाखविते) यावेळीं या बटकीला अशी मनगटाला धरून खेंचून बाहेर काढली ह्मणून बरें झालें. नाहीं तर हें सापाचें पोर केंव्हां दंश करतें याचा नेम लागता ना ! माझ्या घरांत हे असले खेळ आं ! त्या कार्टीचा पुरा सूड उगवतों आतां ! कवटाळीण मला चकवूं पहात होती आं! बरं आहे ह्मणावें, आतां मी आहें आणि तूं आहेस ! पहातों आतां तुझा हट्ट शेवटाला जातो कीं मी आपली प्रतिज्ञा शेवटाला नेतों ती!!! (निघून जातो.)

चिम०–(दुसऱ्या बाजूनें प्रवेश करून) या असल्या चळ भरलेल्या थेरड्यांचे दांत हे असेच घशांत पाडावे लागतात ! थेडर्या मी नांवाची चिमणी आहें समजलास ! ताईसाहेबांचा सूड तूं घेणार होय? घे आतां कुणाचा सूड घेतोस तो ! आणि त्या मानाजीराव फाकड्यालाही ह्मणावं ये आतां ! ही चिमणी हातांत माळ घेऊन तुझीच वाट पहात बसली आहे बरं ! मेला इथून तिथून झाडून सारा कसबांचा बाजार भरला होता ! आणि त्या मुक्या गाईला मेल्यांनीं कशी चोहोंकडून अडविली होती ! पण परमेश्वरानंच गाऱ्हाणं ऐकलं ह्मणावयाचं आणि ह्मणूनच ताईसाहेबांची इथून सुखरूप सुटका झाली !! माझा जीव किनई खरंच आतां किती निश्चिंत झाला आहे ह्मणून सांगूं ! होखरंच पण मी कांहीं आतां ती पूर्वीची चिमी बटकुर राहिलें

नाहीं ! आतां मी गर्भश्रीमंताची लग्नाला उपवर झालेली मुलगी ! आणि थोरामोठ्याची भावी पट्टराणी ! ! मला किनई आतां लहान पोरी सारखं नटलं पाहिजे—ठुमकलं पाहिजे—झालंच तर—गालांतल्या गालांत खुदकन् हांसून—खुबीदार आणि मंजूळ स्वरानं बोललं पाहिजे ! पण हें मेलं मला कसं साधेल तें साधो ! प्रयत्न तर करून पहावा मग देव हांतून काय घडवील तें खरं ! ! (पडदा पडतो.)

अंक २ रा.

प्रवेश १ ला.

स्थळः—विचित्रपुरींतील आडबाजूस असलेल्या बागेंतून जाणारा रस्ता.

वेळ—सकाळ—प्रहर दिवस उलटून गेल्यावर.

(गजरा रंगभूमीच्या डाव्या बाजूनें प्रवेश करते.)

गजरा—घरांतून बाहेर पडलें नव्हतें तेव्हां घरांतून केव्हां एकदां बाहेर पडेन असं झालं होतं ! पण आतां घर सोडलं—दार सोडलं—सावत्र आईच्या जाचांतून सुटलें आणि त्या मेल्या बावळ्या भवानरावाच्या कचाट्यांतून निसटलें—हें सारं झालं, तरी पण मेली या जीवाला स्वस्थता ह्मणून वाटत नाहीं याचं काय बरं कारण !

(तारा रंगभूमीच्या उजव्या बाजूनें प्रवेश करते.)

तारा—मोठ्या शर्थीनच बाई आजचा प्रसंग टळला ह्मणायचा ! घराच्या बाहेर पडून देवीचं देऊळ मागं टाकीपर्यंत मेलं या काळजांत कसं अगदीं धड—धड—करीत

होतं ! कोणाचं मागं पाऊल वाजलं तर मला कोणी धरायला आलं आहे कीं काय असं वाटे, आणि भीतीनें पायांत गोळे किं हो येत होते ! नको ग बाई ! मेला वैऱ्यावर सुध्धां कध्धीं असा प्रसंग येऊं नये बरं ! !

गजरा—तिकडचे पाय पडतील कां पुन्हां माझ्या दृष्टीस ! आणि माझ्या अपराधाची मला क्षमा करून ते घेतील कां मला पदरांत ! ! कालच्या रात्रीचं स्मरण झालं ह्मणजे अंगावर कांटाच उभा राहतो बाई ! ! !

तारा—हुश्श–मेला घाम तरी कोण दरदरून सुटला आहे हा ! ही चोळी आणि हा पदर भिजून कसा अगदीं चिंब झाला आहे ! ! (विचार केल्यासारखें दाखऊन) तिकडली आणि माझी आतां गांठ तरी कशी पडणार ! आणि त्यांना हुडकायला मी जाणार तरी कुठं ! गजरेकडून त्यांचा शोध करवीन ह्मटलं, तर आहे कां मला तिच्यापुढं हें तोंड घेऊन जायची सोय ! !

गजरा—बरं माझी ही काहाणी तारेला सांगून तिच्या कडून त्यांची माफी मागवीन ह्मटलं, तर ती मला अशा स्थितींत राहूं देणार आहे कां आपल्या पुढं उभी ! आणि मला तरी हें लाजिरवाणं तोंड घेऊन तिच्या पुढं जायला जळ्ळी कांहीं लाज हवी कां नको ! !

तारा—गजरे, मी घरांतून बाहेर पडलें हें तुला कळलं किनई ह्मणजे तूं मला हसूं नकोस हो ! मी तरी काय करूं आणि कुठवर धीर धरूं ! खरंच अगदीं निरूपायानंच मीं हें धाडस केलं बरं ! ! (गजरेकडे दृष्टी जा-

ऊन) अगबाई ! पण मी हें काय पहातें आहे !! किंचित पुढें होऊन) गजरे, तूंच कां ही ? (गजरा व तारा एकमेकींस ओळखतात व प्रेमानें एकमेकींस कडकडून भेटतात)

तारा—या घटकेला मीं तुझ्या कित्ती कित्ती आठवणी काढल्या होत्या ह्मणून सांगूं ! पंढरीच्या रुक्मिणी सारखी धांवण्या धांवलीस बाई !!

गजरा—आणि खरंच मीं देखील किनई तुझ्या नांवाची तशीच जपमाळ ओढीत बसलें होतें बरं !

तारा—पण गजरे, मीं कांहीं मन मोकळं करून तुला सांगितलं तर तूं माझ्यावर रागावणार नाहींस ना ?

गजरा—आणि गडे मला देखील तेंच विचारायचं आहे तुला ! कां ह्मणून नाहीं पुसलंस ? आलंच असेल बहुतेक तुझ्या ध्यानांत ह्मणा ! पण आपलं उगीच वेड पांघरते आहेस झालं !!

तारा—गजरे, तुझ्याच गळ्या शपथ माझ्या नाहीं बाई आलं ध्यानांत तूं काय ह्मणतेस तें ! मीं मात्र तिकडच्या साठीं बाबांचं घर सोडलं ह्मणून मला तूं हसूं नकोस एवढंच तुझ्यापाशीं माझं पदर पसरून मागणं आहे!

गजरा—आणि गडे, मलाही तुझ्यापुढं पदर पसरून तसंच मागणं मागितलं पाहिजे!

तारा—गजरे, खरंच कां हें ? कां मला हिणवण्या करितां हें सोंग आणलं आहेस आपलं ?

गजरा—खरंच--अगदीं खरंच बरं !

तारा—तर मग गडे, आपण दोघीजणी समदु:खीच ह्मणायच्या !

गजरा—गडे, आपण या घटकेला समदु:खी आहोंत खऱ्या, पण किनई आणखी घटके दोन घटकेनं तूं आपल्या प्रियकराला भेटलीस ह्मणजे सौख्यपर्वताच्या शिखरावर जाऊन बसशील बरं ! पण मला मात्र अंगाला राख फांसून हातांत लोटाच घ्यायची येईल पाळी ! !

तारा—इश्श ! जळ्ळं मेलं हें काय भलतंच तोंडांतून काढते आहेस ! ! माझा दादा तुला भीक कां मागायला लावील ! ! !

गजरा—गडे, तसाच झाला आहे बरं माझ्या हांतून त्यांचा अपमान ! मीं त्यांचं मन किनई अगदीं खट्टू करून टाकलं आहे ! आणि खरंच गडे, त्यांनीं किनई तशीच संताप येण्यासारखी कृति केली हो ! मेली माणसाच्या धिटाईला कांहीं सीमा हवी कां नको ! ! काल तुकती कुठं मध्यान् रात्र उलटून गेली होती माझं पुढं कसं होईल काय होईल अशा विचारानं माझ्या जिवाची उलघाल चालली होती—आणि मी दु:खी कष्टी होऊन भुईवर तळमळत पडलें होतें—अशा स्थितींत बाई वाड्याच्या दिंडीची कडी काढून ते चोरासारखे लपत छपत माझ्या खोलीच्या खिडकी खालीं आले ! आणि घरांत जिकडे तिकडे अगदीं सामसुम आहे बाहेर काळोख किट्ट पडला आहे—डोळ्यांत बोट घातलं तरी सुद्धां दिसा-

यचं नाहीं—असं पाहून मागचा पुढचा विचार न करतां आपले बाई खिडकींतून वर चढून मी पडलें होतें तेथवर आले!! आणि त्यांनीं किनई माझा हात घट्ट धरला! तेव्हां मी इतकी घाबरून गेलें कीं माझ्या तोंडांतून शब्द निघेना! साऱ्या अंगाला बाई दरदरून घाम सुटला! आणि भ्रमिष्टा सारखी होऊन मी आपली निचेष्टित पडलें! माझी अशी अवस्था झालेली पाहून "तूं भिऊं नकोस, तुझ्यावर माझी प्रीति आहे" असं ह्मणून तडातडा शपथा वाहूं लागले आणि मीं किनई तुझी भावजय व्हावं ह्मणून माझी एकसारखी आर्जव करूं लागले!! हें चांगलं नाहीं—घरांतलीं माणसं जागीं झालीं तर त्यांत आपली फजीती होईल—आणि मग जगांत तोंड काढायला जागा राहायची नाहीं—ह्मणून मी जों जों त्यांची कानउघाडणी करायला लागलें, तों तों गडे ते आपले भरीभरल्या सारखे अधिकाधिक आर्जव करूं लागले!! मग बाई मला आली चीड, आणि साफ सांगितलं कीं "इथून जाणं होत आहे कीं बाबांना हांक मारून फजीती करूं?" मला जेव्हां अशी रागावलेली पाहिली तेव्हां स्वारीनीं मुकाट्यानं तिथून पाय काढला! गडे, खरंच शोभलं कां ग असं करणं तिकडे?

तारा—गजरे, खरोखर तूं किनई थोर भाग्याची! आणि ह्मणूनच बरं इतकं सुख तरी तुझ्या वाट्याला आलं! पण माझी जर गोष्ट विचारशील तर किनई खरंच सांगतें रात्रंदिवस माझं लक्ष्य तिकडेच लागल्यानं, ध्यानीं—मनीं स्वप्नीं—सदासर्वकाळ त्यांनीं माझी एकसारखी पाठ पुर-

विली आहे! मेलं ह्मटलं जागेपणीं नाहीं सुचणार एकवेळ दुसरं कांहीं ! पण मेला क्षणभर डोळा लागल्यावर तरी पडावा कीं नाहीं तिकडला विसर!! पण मेला अनुभव पहावा तो आपला उलटाच!!! खरंच सांगतें तिकडली आणि माझी आतां भेट झाली कीं नाहीं ह्मणजे याचं सारं उट्टं काढून घेतल्या शिवाय मी कध्धीं सोडायची नाहीं!

गजरा—गडे, खरंच तूं ह्मणशील तस्सं साधेल बाई तुझ्या प्रियकराला तुला वळवायला ! पण मला बरीक आतां तिकडचा राग घालवायला मोठ्ठं कठीण जाईल बाई!! घरांतून बाहेर पडतांना मनांत आणलं होतं कीं तुझ्याकडून मागवीन तिकडली क्षमा! पण देवानं हा असा प्रसंग आणून तिथंही माझी निराशा केली!!

तारा—आणि गजरे, तशीच माझी अवस्था झाली आहे बरं ! तिकडली आणि माझी भेट करून द्यायला माझं जिव्हाळ्याचं माणूस ह्मटलं ह्मणजे मला कायती एक तूंच! पण तूंही याच वेळीं घरांतून बाहेर पडल्या-मुळं घटकाभर कुठं निवांत बसेन ह्मटलं तर उरलं आहे कां तसं मला आतां ठिकाण ?

गजरा—खरंच गडे ! आपल्या दुर्दैवानं किनई आपला पुरा दावा साधला आहेन बाई !! आणि मेल्यानं आपले हात पाय कसे जखडून टाकले आहेत चहूंबाजूनं !!

तारा—मला तर बाई अगदीं वेड्यासारखं झालं आहे! तुला सुचतो आहे कां अशा वेळीं कांहीं उपाय ?

गजरा—मला तर बाई कांहीं सुचत नाहीं! नाहीं ह्मणायला एक दिसतो आहे मार्ग मोकळा! नदी पलिकडल्या त्या वृद्धेश्वराच्या देवळीं जाऊन बसावं आपलं त्याच्या द्वारीं धरणं घेऊन! ह्मणजे त्याची कृपा झाली तर तोच लिहील पुढचं सुख या कपाळीं!!

तारा—(दूर पाहिलेंसें करून) अग बाई! तें तिकडून एक ध्यान येत आहे, तें पाहिलंस कां तूं? दिसलं कां तुला तें?

गजरा—(दूर पाहून) तें गड्याचं? कां तें त्याच्या यजमानाचं?

तारा—अग मी यजमानाचं ह्मणतें आहे हो! पाहिली होतीस का कधीं आजवर असली ही बावळी मुद्रा!! बाबांनीं माझ्या करितां नवरदेव शोधून काढले आहेत ते हेच बरं का!!!

गजरा—इश्श! हेंच कां तें सोंग! आणि हेंच कां रत्न तुझ्या गळ्यांत तुझे बाबा बांधणार होते!! मेली चावटपणानं मला कांहीं तरी सांगते आहे झालं!!!

तारा—गजरे, अगदीं खरं बरं! खरंच हाच विचित्र पुतळा येणार होता बरं माझ्या वांट्याला! पण माझ्या चिमणीनं माझी आज लाज राखलीन बाई!!

गजरा—अस्सं अस्सं!! तें मीं केव्हांच ओळखलं! आणि तूं आतां ह्यांच्या दृष्टीस पडलीस आणि ह्यांनीं तुला ओळखलं तर?

तारा—गजरे, ह्याच्या मी आजवर कधीं दृष्टीस पडलें असेन तर ओळखील कीं नाहीं मला तो मेला !! हा किंनाहीं परवां आमच्या घरीं आला होता, तेव्हां मेल्याचं हें ध्यान माजघरांतून मी हळूंच पाहिलं ! मेला उंडारलेल्या पोळासारखा डुरकण्या फोडीत बसला होता बाबांच्या पुढं !! ही स्वारी आतां किंनाहीं अशी नटून थटून मलाच पहाण्या करितां निघाली आहे हो आमच्या घराकडे ! ! ! याचा आणि तिकडला आतांशं दाट परिचय झाला आहे, आणि ह्मणून गजरे, एकदां असं मनांत येतं कीं या मेल्याच्या कडूनच लावावा तिकडला शोध ! खरंच सांगतें अशा नेभळ्या आणि बावळ्या पुरुषांना चकवायला कांहीं वेळ नाहीं लागायचा ! ! यांचा थोडा स्तुतिपाठ गाईला कीं चढलेच हे मेले हरभऱ्याच्या झाडावर ! ! !

गजरा—तर मग तूं त्यांच्याशीं बोलणार ह्मणतेस ! तारे, बरीच धिटुकली आहेस हो तूं !!

तारा—गजरे मीं जेव्हां बाबांचं घर सोडलं तेव्हांच सारी भीड आणि सारी लाज खुंटीला गुंडाळून ठेविली आहे बरं ! मग आतां मला कशाला हवी आहे कोणाची लाज, आणि कोणाची भीती ! ! मीं तर केलाच संकल्प कीं याच मेल्याला मध्यस्थी घालून त्यांची मी भेट घेणार ! !

गजरा—तुझा पराक्रम नाहीं बाई माझ्या अंगीं ! मी आपली जातें कशी इथून निघून ! मग तुला काय वाटेल तें कर !

चेहरा आज फारच मोहक दिसतो आहे ! सकाळच्या कारागिरानें ह्या मिशा आणि हे कल्ले—मी घरून निघतांना आरशांत पाहिलें, तों ते खुप खुबीनें कातरले आहेत असें मला दिसलें !

गोडाजी—धनीसाव, काईबी ह्मना, पन ह्ये लांब झुपक आन् ह्ये आखूड कल्ल या जाभाडासनी लै लै वंगाळ दिसत्यात पगा ! धनीसाबाच केस अद्गुगर लै राठ आन् त्येच्यावर आज कातर फिरल्यानं त्ये जनू डुकराच्या केसावानी ताठ उभ राहिल्यात !

मानाजी०—अगदीं मूर्ख आहेस बेट्या ! गाढवाच्या लेका, हें तोंड आतां वाईट दिसतें आहे कायरे ! किती झोकबाज दिसते आहे ही चेहेरेपट्टी !! माझी प्रिया तर हा गोड चेहरा पाहून अगदीं भुलून जाईल !!! गध्या, या असल्या केसानें माणूस मोठें भारदस्त आणि ऐटबाज दिसतें समजलास! माझ्या आईनें जर हा आजचा माझा थाट आणि हें माझें स्वरूप पाहिलें असतें, तर मला दृष्ट लागेल ह्मणून माझ्यावरून तिनदां लिंबलोण उतरलें असतें समजलास !!!

गोडाजी—आं ! तर मंग ह्यो मुखडा तुमच्या कारभारनीच्या मनांत लै भरल ह्मनता व्हय !!

मानाजी०—हातच्या कांकणाला आरसा कशाला पाहिजे ! ती एक आवा तेथें उभी आहे ! दिसली कां ती तुला ? चल बरें तेथवर माझ्या बरोबर. या चेहऱ्याकडे पाहून जर तिच्या मनाची चलबिचल झाली नाहीं तर

बच्चाजी ही मिशी उतरून ठेवीन खालीं समजलास !!

गोडाजी—-धनीसाब,ठरूंद्याच तुमची आमची येच्या पाई होड! या शरतींत म्या जर धनीसाबासनी जितलं तर सा महिन्याचा पगार धनीसाबापासून हथ हथ घेईन ठन् ठन् ठन् ठन् मोजून!!

मानाजी०—आणि लेका तुझ्या तोंडावर जर उलथे पायपोस पडले तर वर्षभर अर्धपोटीं आणि बिनपगारी नोकरी करून घेईन तुझ्यापासून समजलास! (तारा पुढें येते.)

तारा—(मानाजीरावास उद्देशून) महाराज, आपण भले गृहस्थ दिसता! ह्मणून विचारतें, परोपकार बुद्धीनं माझं एक नाजुकसं काम कराल कां तुह्मीं? (इतकें बोलून तोंडावरचा बुरखा दूर करते.)

मानाजी०—(तारेस नीट निरखून पाहून आनंदानें गोडाजीस उद्देशून) गोडाजी, बघ लेका! ही फक्कड फुटाणी आवा कशी आहे ती!! ही आपल्याकडे आपल्यापायांनीं आपण होऊन चालत आली कीं नाहीं! आला कीं नाहीं मीं ह्मटले त्याचा तुला प्रत्यय ? आणि आतां करशील कीं नाहीं या पठ्ठयाची ठरल्याप्रमाणें वर्षभर फुकट चाकरी?

गोडाजी—(मानाजीस एकीकडे) व्हय व्हय व्हय धनीसाब! म्या तर अक्शी पान्यांतल्या डिखळावानी इरघळून गेलो पगा!!

मानाजी०—(गोडाजीस एकीकडे) गोडाजी, पाहिलेंस कां तिच्याकडे! तिच्या चेहऱ्यावरून मला तर असें वाटतें कीं मला पाहिल्यापासून तिच्या पोटांत अगदीं

गुदगुल्या सुटल्या आहेत ! ! ह्या जीवावर ती फारच आषक झालेली दिसते बोवा ! ! !

गोडाजी—(मानाजीस एकीकडे) धनीसाब, लै संभाळूनशान ऱ्हा बरं ! न्हाईतर गोंधळ्याच्या मागं जसं त्येचं तुनतुन ऱ्हात न्हाई तसं इसनि ' हो ' ह्मनूनशान् हिचं बांधून घ्याल ह्मनतो गळ्यामंदी लोढनं ! !

मानाजी०—(तारेस उद्देशून) काय ? तुमचें माझ्याशीं नाजुक काम आहे ह्मणतां ! आलं—आलं—आलं माझ्या ध्यानांत तुह्मी काय ह्मणतां तें ! ! पण तुमचें नांव काय आणि तुमचें राहणें कुठलें हें तर सांगाल कीं नाहीं अगोदर ?

तारा—दासीला गजरा ह्मणतात. मी उदाजीराव बिऱ्हाडकरूंची मुलगी.

मानाजी०—काय ! उदाजीराव बिऱ्हाडकरूंची मुलगी ! ! त्याची घरांतून पळून गेलेली पोर ती तुह्मीच कीं काय ?

तारा—होय—तीच मी ! प्रीतिपाशांत बद्ध झाल्यामुळं निरुपायानं मला असं करावं लागलं ! ! आपल्या थोरपणावर भरवंसा ठेऊन मीं आपल्या पुढं पदर पसरून हें मागणं मागितलं आहे आतां ही भिक्षा मला घालणं आपल्या हातीं आहे ! !

मानाजी०—(गोडाजीस एकीकडे) ए गेन्या ! आपलं गोडाजी—ए गणू ऊंहु:—गोडाजी ! लेका ही तर माझ्याच गळ्यांत पडायला लागली ! ! काय करावें बोवा,

देवानें मला हें असलें अद्वितीय स्वरूप देऊन माझा मोठा घात केला आहे ह्मणायचा!! जी ती आपली जेव्हां तेव्हां माझ्यावर अश्शी झटून पडते!!

गोडाजी–(मानाजीस एकीकडे) व्हय–व्हय–व्हय धनीसाब! ह्येच्या पायींच म्या हकडे निघायच्या वक्ती ह्मनत होतो कीं धनीसाबाच्या गळ्यामंदी एक फुटकी कवडी आन् एक बिबा गाठूनशान बांधाया होवा ह्मनून!!!

मानाजी०–(गोडाजीस एकीकडे) त्यावेळेस मीं तुझें ऐकलें नाहीं ही मोठी चूक केली बोवा! पण आतां पश्चात्ताप करून काय उपयोग! अगोदर हें लचांड गळ्याबाहेर काढायची हिकमत योजिली पाहिजे! (तारेकडे वळून) मग काय ह्मणतां बाई! तुमचें नाजुक काम माझ्या हांतून व्हायचें नाहीं! आणि तुह्मांला अशा रीतीनें प्रीतिपाशांत गुंतायला कोणीं सांगितलें होतें!! तुह्मीं ह्मणता असें जर मी प्रत्येकाच्या उपयोगीं पडायला लागलों, तर ही माझी शरीराची गोटी एक दिवस तरी टिकेल काय!! माझ्याकडे अशा रागावून पाहूं नका! मीं तुमचें ऐकलें नाहीं ह्मणून मीं तुमची परिस्फुटता करीन अशी भीति तुह्मी यत्किंचितही बाळगूं नका! कारण माझें तसें शील नाहीं! तुह्मीं माझ्या नादीं लागूं नका एवढेंच माझें तुह्मांला सांगणें आहे!

तारा—(एकीकडे) अहाहा! शेणाचे दिवे ओवाळून दृष्ट काढा मेल्याची!! मेल्याची अक्कल जशी घोड्यापुढं धांवते आहे!! मी ह्मणतें आहे काय, आणि हा मेला

समजतो आहे काय!! (उघड) महाराज असं कां बरं?

मानाजी०—बाई, तुह्मी माझे किती जरी आर्जव केलेत, तरी माझा नाइलाज आहे! माझ्यानें तुह्मांला या कामीं होय ह्मणवत नाहीं!!

गोडाजी—(एकीकडे) काय इचिभन् न्याव हा-य हो! या इचित्रपुरीमंदी समदच इचित्र!! ह्या आवानं आमच्या धनीसाबासनी पगितल काय, आन् खिनांत कीं हो लागलीया त्येच्या ह्मोरं थै थै नाचाया!!!

तारा—महाराज आपण माझं थोडं तरी ऐकाल कां?

मानाजी०—ऐकून घेण्यासारखें आतां कांहीं उरलें नाहीं! आणि तुह्मीं आतां कांहीं जरी ह्मणालांत तरी त्याचा कांहीं उपयोगही व्हायचा नाहीं!! माझें लग्न दुसऱ्या एकीबरोबर अगदीं निश्चित झालें आहे! काय रे गोडाजी, होय कीं नाहीं?

गोडाजी—व्हय–व्हय–व्हय–धनीसाब अक्शी खरं बोलत्यात पगा! आन् धनीसाबासनी मामुंजी बी लै लै पैकेवाल मिळाल्याती पगा!

तारा—तर मग अशा स्थितींत तुमच्या खेरीज या जगांत मला कोण बरं साह्य करिल?

मानाजी०—(एकीकडे) ही एक नवीनच घोरपड माझ्या गळ्यांत पडली ह्मणायची! (उघड) बाई, काय हो तुमचा हा लोंचटपणा!! मी साफ सांगतों आहे कीं मी तुमचें ऐकत नाहीं ह्मणून, आणि तुह्मीं बळेंच माझ्या ग-ळ्यांत पडता!!! तुह्मीं त्या उदाजीरावाला अगदीं योग्य

कन्या शोभता बोवा ! रस्त्यानें भेटला वाटसरू आणि त्याचाच जवळ आपलें बिऱ्हाड करूं, अशांतला तुमचा हा प्रकार तुमच्या दृष्टीनें जरी नसला तरी जगाच्या दृष्टीनें फार वाईट आहे बोवा ! तुह्मांला आणि मला अशा रीतीनें एकांतीं बोलतांना तुमच्या नातेवाईकांपैकीं जर कोणीं पाहिलें, तर तो तुमचा आणि माझा खर्पूस समाचार घेईल समजलांत ! ! ह्मणून ह्मणतों कीं तुह्मीं माझा नाद सोडून आपली वाट धरा कशी लवकर ! ! !

तारा–महाराज, मी दौलतरावांच्या बद्दल ह्मणत होतें !

गोडाजी–(एकीकडे) थुः तिच्याभन् ! ही आवा है त्या दौलत्यावर फिदा, आन् ह्यो मर्द मघापून ह्मशीच्या शिंगासनी धरूनशान् 'अग अग ह्मशी आन् मला कुठं न्हेशी' असं करीत उगच हिच्या पाठी लागलाया ! ! (उघड) धनीसाब ! अहो धनीसाब ! ! राम राम ! ! ! सा म्हईन्याचा पगार आतां हथ ओतला पाहिजे बरं कां माझ्या ह्मोर ! ! मघाची होड हैना धनी साबाच्या ध्येनामंदी ?

मानाजी०–काय हो गजरा बाई तर मग तुमचें प्रेम कांहीं माझ्यावर नाहीं जडलें ह्मणतां !

तारा––छे; मुळींच नाहीं !

मानाजी०–तर मग तूं मोठी दांडगी, उद्धट आणि लबाड पोर आहेस ! दम धर, साऱ्या गांवभर तुझ्या नांवाचा बोभाटा करून तुझी फटफजीती उडवून देतों ! ! तूं काय समजली आहेस ! ! !

गोडाजी—(एकीकडे) धनीसाबासनी येड ह्म-नावं तर बरच शेन हायती कीं ! आं ! जवर ती आवा सवतावर फिदा है ह्मनून धनीसाबासनी वाटत व्हत, तवर तिच्याशीं कशा गुल गुल गुल गुल गोष्टी करीत व्हत ! पन् त्येच जवा कां तिनं दवलतरावाचं नांव घेतलं तवा इचवाचा नांगा मोल्डच्यावानी झाल्यात व-शाळ ! ! आन् त्येचा सूड घेन्यापायीं आतां लागल्यात उलट्या गोष्टी सांगाया ! ! !

मानाजी०—कायग ए पोरी, दौलतराव दुमालदार काय ?

तारा—हो. त्यांचच मी नांव घेतलं ! आपण कृपा करून जर त्यांची आणि माझी भेट करून द्याल तर किनई आपले उपकार मी जन्मभर विसरणार नाहीं ! !

मानाजी०—(गोडाजीस एकीकडे) गोडाजी, हा दौलत्या कोण हें आलें कां तुझ्या ध्यानांत ? त्या धनाजीरावा-च्या पोरीला मागणी घालणारे आमचे प्रतिस्पर्धी फक्कड ते हेच ! आणि ह्याच रंगेलासाठीं ती धनाजीरावाची गोड पोर तारा झुरणीला लागली आहे ! (किंचित् विचार केल्यासारखें दाखवून) यंव ! या वेळीं अशी सोळा आणे युक्ती या गब्रूच्या डोक्यांत आली आहे कीं, गोडाजी, ही गोळी जर बिनचूक लागली तर फारच बहार होईल !! ह्मणून ह्मणतों या पोरीला हातची गमावून उपयोगी नाहीं ! इतकेंच नाहीं, तर हें लोढणें त्या दौलत्याच्या गळ्यांत कायमचें अडकविण्याची खटपट केली पाहिजे आतां ! ! !

गोडाजी—(मानाजीस एकीकडे) धनीसाब, डोचकं

पण डोचकं हे तुमचं !! समद्या प्रिथ्मीची आकल भरली हे नव्ह का येच्यांत !! दुनयेंतलीं समदीं टक्कुरी येच्या पासंगाला बी न्हाई पुरायची !!! धनीसाब व्हावत तर अस व्हावत !

मानाजी०—गजराबाई, ज्या अर्थी तुह्मीं मजवर इतका विश्वास टाकला आहे त्या अर्थी मला तुमचें हित पहाणें इष्ट आहे ! शिवाय तुमच्या हितांत दोस्त दौलतरावाचेंही हित अनायासेंच साधलें जात आहे !! तेव्हां निराश्रित स्त्री, आणि प्रिय मित्र, या दोघांच्याही उपयोगीं पडण्याची ही अमोल संधी मी निष्ठुरपणानें हातची कधींही जाऊं देणार नाहीं !! पण तुह्मीं मात्र अंमळ धीरानेंच घेतलें पाहिजे !

तारा—खरोखर, आपले हे मजवर अनंत उपकार होत आहेत ! या उपकारांची फेड माझ्या हातून कशी होईल ती होवो !!

मानाजी०-गोडाजी, गजराबाईना घेऊन आपल्या बिऱ्हाडीं जा, आणि त्यांची तेथें नीट व्यवस्था लाव; आणि मग दौलतरावांना गांठून, मी कांहीं जरूरीच्या कामानिमित्य जरूर जरूर बोलाविलें आहे असें सांगून त्यांना आपल्या बिऱ्हाडीं घेऊन ये. मला जर आतां धनाजीरावांच्या घराकडे जाण्याची ओढ नसती तर मी आतांच दौलतरावांना भेटून त्यांची आणि ह्यांची भेट करून दिली असती ! गजराबाई, धनाजीरावांची पोर तारा

तुमच्या पाहण्यांत असेल नाहीं? लोक ती मोठी रूपवती आहे असें ह्मणतात ह्मणून विचारतों!!

तारा—ताराबाई ना? त्या कित्ती सुरेख आहेत ह्मणून सांगूं! सारं जग त्यांच्या रूपाची वाखाणणी करीत आहे!!

मानाजी०–(आनंदानें डोळे मिचकावीत) ऐकलेंस कां, गोडाजी, गजराबाई काय सांगत आहेत तें?

तारा—तुमची आणि माझी पूर्वींची ओळख नसतां केवळ तुमच्या मोठेपणावर आणि तुमच्या या पोक्त वयावर आणि स्वभावावर विश्वास ठेवून मी आपली लाज, लज्जा आणि अब्रू हीं सारीं तुमच्या हवालीं केलीं आहेत! तेव्हां या माझ्या सर्वस्वाचं जतन तुमच्याकडून चांगलं व्हावं एवढंच माझें पदर पसरून मागणं आहे!!!

मानाजी०–हा गोडाजी मोठा प्रामाणिक, मोठा हुशार आणि मोठा अब्रूदार गडी आहे. तुह्मी याच्या बरोबर निर्धास्त आमच्या बिऱ्हाडीं चला. तुह्मी मला माझ्या पाठच्या बहिणीप्रमाणें आहांत; ह्मणून ह्मणतों तुमची इजत कायम राहण्याबद्दलची तुह्मांला यत्किंचितही काळजी वाळगायला नको! तुह्मीं मात्र दोस्त दौलतरावांचा संसार करायला लागलांत ह्मणजे हें नातें कायम ठेवा इतकेंच माझें तुमच्या जवळ उलट मागणें आहे!!! बरें तर येऊं मी आतां? गोडाजी, यांचें कांहीं कमी पडूं देऊं नकोस बरें! धनाजीरावाकडचें काम आटोपून मी मागच्या पाऊलींच परत येतों. (पडदा पडतो.)

अंक २ रा.

प्रवेश २ रा.

स्थळः—धनाजीरावाचें घर.

वेळः—सकाळ–दोनप्रहर दिवस.

(मानाजीराव व धनाजीराव बोलत बसले आहेत असा पडदा उघडतो.)

धनाजी०—काय! ह्मणतां काय! उदाजीरावाची पोर? ती गजरा!!

मानाजी०—होय! तीच ती!! तिचीच गोष्ट मी सांगतों आहे!!!

धनाजी०—अरेरे! उदाजीराव केवढा लौकिकवान् पुरुष!! पण वृद्धपणीं त्याच्या तोंडाला या कार्टीनें ही मोठीच काळोखी लाविली ह्मणायची!!!

मानाजी०—अहो, तिनें फासलें आहे त्या उदाजी-रावाच्या तोंडाला काळें! पण आतां ह्याच कुंचलीनें हा मानाजी त्या दुमालदाराला पहा कसा चित्रविचित्र रंगवून सोडतो आहे तो!!

धनाजी०—काय! दुमालदाराला!! त्या दौलत्याचा हिच्याशीं काय संबंध?

मानाजी०—अहो, ती आहे त्याच्यावर फिदा!

धनाजी०—काय! ह्मणतां काय!!

मानाजी०—अहो त्याच्याच करितां ती निघाली आहे घराच्या बाहेर! आणि त्याला गांठून देण्याचा मक्ता पत्करून आह्मीं आपला डाव साधून घेण्याचा घातला आहे घाट!!

धनाजी०—खरें कीं काय ? मोठे वस्ताद आहांत बोवा तुह्मीं ! !

मानाजी०—मामा साहेब, त्या दौलत्याला आमच्या वाटेआड करायला बिनतोड युक्ति ह्मटली ह्मणजे हीच ! त्याच्या गळ्यांत ती ल्हास अडकवून दिल्याशिवाय तुमच्या आमच्या संबंधांत आडवें येणारें हें मधलें मोठें विघ्न नाहींसें व्हायचें नाहीं ! !

धनाजी०—मानाजीराव, तुमच्याच गळ्या शपथ, तुमच्या सारखेच अट्टल सोदे जामात या धनाजीरावाला मिळाले पाहिजेत ! आणि खरोखरच जशाला तसें जुळलें आणि जातीला जात मिळाली तरच तो संबंध ! !

मानाजी०—मग आहे कीं नाहीं, मामा साहेब, या मानाजीरावाचा तशांतला संबंध ? पण मामा साहेब, या दगदगी बद्दल तुह्मीं ह्मणत आहांत ती पांच हजारांची रक्कम—त्यांत थोडीशी तरी सूट हा मानाजी हक्कानें मागून घेईल बरें कां ! !

धनाजी०—(हांसत हांसत) मानाजीराव, तुमच्या सारख्या सरदारांना आणि दिलदारांना पैसा ह्मणजे उकिरड्या वरचा केर ! शिवाय तुह्मी मोठे हौशी—मोठे रंगेल—मोठे लौकिकवान् आणि बडे खर्चीक ! ! माझ्या तारी सारखें रत्न तुमच्या हातीं आल्यावर, तुह्माला आह्मीं आग्रह करकरून थोडा हात आखडता घ्या ह्मणून सांगितलें तरी तुह्मी आमचें कुठलें ऐकायला ! ! तुमची लांबण संपता संपायची नाहीं समजलांत ! ! आणि

तुमच्याशीं टक्कर देतां देतां आह्मांला कैक हजार ओतावे लागतील ! ! ! पण मानाजीराव राहून राहून मला त्या उदाजीची मोठी कीव येते हो! काय त्याचा वचक-केवढा त्याचा दरारा–प्रतिकाळा सारखा तो–पण अखेर या टीचभर पोरीनें त्याला गाय करून सोडलें हो ! !

मानाजी॰—मामा साहेब, अशा तरण्या ताठ्या पोरी घरांत अविवाहित ठेवणें ह्मणजे पदरांत अग्नि बांधून घेणें होय ! यांना चटकन् यांच्या मनासारखा फटाकडा नवरा बघून दिला तर बरें ! नाहीं तर हा अग्नि धुमसून धुमसून शेवटीं पेट घेतल्या शिवाय कधींही राहायचा नाहीं ! ! या उदाजीरावा सारखे फजितखोर लोक आपण आजपर्यंत थोडे कां पाहिले आहेत !

धनाजी॰—पाहिले आहेत पुष्कळ ह्मणा ! पण मी तर ह्मणतों, त्या उदाजीरावाची अशी स्थिति व्हायला त्याची बाईलबुद्धीच कारण ! अहो, पोरी ह्मणजे निव्वळ गाई ! त्यांचे कान वरच्यावर पिळले तर लांब होतील ह्मणजे बिशाद काय ! ! ही माझीच पोर पहाना ! मीं ह्मटलें कीं इतकें पाणी पी, तर ती तितकेंच प्यायची ! डोकें वर करून माझ्या पुढें बोलण्याची नाहीं तिची प्राज्ञा ! ! मग असला हा चवचालपणा ! नांव कशाला घेतां त्याचें ! ! तिचें थोडें वांकडें पाऊल पडलेलें जर माझ्या कानीं आलें तर उभी चिरून टाकीन तिला उभी ! हे असले लपंडाव माझ्यापुढें क्षणभर टिकायचे नाहींत ! ! उगीच नाहीं हे काळ्याचे पांढरे करून घेतले ! ! !

मानाजी०—मामासाहेब, आपण तर वृद्धच आहांत ह्मणा—तेव्हां तुमची गोष्ट राहूं द्या. पण हा मानाजीसुद्धां कोणाची मात्रा चालूं द्यायचा नाहीं पुढें !! मामासाहेब, मी लहान होतों तेव्हां आमच्या आळींतलीं—इतकेंच नाहीं तर आमच्या गावांतलीं—झाडून सारीं पोरें माझ्यापुढें नेहमीं हात जोडून उभीं असत ! आणि मला मोठेपणानें 'बिलंदर मान्या' अशी हांक मारीत असत!! आणि हें ऐकून माझी आई मला प्रेमानें पोटाशीं धरी आणि माझ्या तोंडावरून हात फिरवून मोठ्या कौतुकानें 'तुला इतका छट—इतका लबाड—आणि इतका बेरड कोणत्या देवानें घडविला असेल तो घडवो' असें नेहमीं ह्मणे !!! मामासाहेब, उगीच स्वतःची थोरवी मारण्यांत अर्थ काय ह्मणा ! पण तुह्मांला सुद्धां येईल माझा अनुभव !!

धनाजी०—मानाजीराव, खरोखर सांगतों, तुमच्यासारखा वस्ताद गडी आपल्या नाहीं आजपर्यंत पहाण्यांत आला ! त्या दौलत्याच्या नरड्याला लावण्याकरितां तुह्मीं तयार केलेला हा गळ बिनमोल आहे बोवा बिनमोल !!

मानाजी०—अहो, या गळानें मी त्या दौलत्याला पहा तर खरा कसा लोळवून सोडतो तो ! हे असले प्रसंग आले ह्मणजे मला स्फुरण चढतें पहा स्फुरण !!

धनाजी०—पण मानाजीराव, त्या दौलत्याचें तिच्यावर प्रेम असलें तरच साधणार आहे तुमचा हा डाव ! नाहीं तर कश्या पायावर रचलेली तुमची ही इमारत के-

व्हांच ढांसळून तुमच्याच अंगावर पडायची एखादी ! !

मानाजी०—मामासाहेब, त्या दौलत्याच्या अंतःकरणांत तिच्याबद्दल जर पूर्वीचा प्रेमपाझर नसेल तर मधूर आणि गोड शब्दांनीं त्याचें तें अंतःकरण फोडून तो नवीन उत्पन्न केला पाहिजे ! मामासाहेब, हें काम कांहीं हलकेंसलकें नाहीं ! माणूस जातीचा पुरा बेरड पाहिजे ! बेरड !! तरच त्याच्या हांतून उठतात अशीं कामें समजलांत !

धनाजी०—तुमच्या शहाणपणाला आणि तुमच्या अक्कलेला मोल नाहीं बोवा ! माझ्या तारेच्या स्वरूपाबद्दल तुह्माला जें कांहीं सांगायचें तें मीं पूर्वीं सांगितलेंच आहे. तिचे डोळे (आपल्या डोळ्याकडे बोट करून) हे अगदीं थेट असेच ! यांतलें पाणी त्या तिच्या डोळ्यांत अगदीं ओतप्रोत उतरलें आहे ! !

मानाजी०—तर मग तिच्या डोळ्यांत पाणी अगदीं एकसारखें खेळत असेल नाहीं ! आणि मामा साहेब, हांसतांना तिच्या गालांना खळ्या पडल्यामुळें तिचें तोंड फारच गोड दिसत असेल ! नाहीं बरें ?

धनाजी०—तें कांहीं विचारूं नका ! भाग्यशाली स्त्रिच्या आंगीं जी लक्षणें जगांत आपल्या दृष्टीस पडतात तीं तिच्या ठिकाणीं पूर्ण भरलीं आहेत ! !

मानाजी०—अंगलट, बांधा आणि वर्ण हीं अगदीं तुमच्याच वळणावर असतील नाहीं ?

धनाजी०—शंभर वेळा तुह्माला पुन्हां पुन्हां तेंच तेंच मीं किती जरी सांगितलें तरी तुमच्या पोटांतला संशय

फिटायचा कठीण ! ह्मणून ह्मणतों तुम्हीं तिला प्रत्यक्ष पहा. तिच्याशीं दोन शब्द बोला आणि घ्या आपलें माणूस पडताळून ! डोळ्यांत आणि कानांत पुष्कळ अंतर असतें ! तेव्हां तिला एकदां तुमच्या डोळ्याखालीं घातलेली बरी असें मला वाटतें. असें करणें म्हणजे व्यवहारिक दृष्टीनें जरी अंमळ चमत्कारिक आणि अपवादक आहे, तरी मला असें वाटतें कीं, मुली उपवर आणि जाणत्या झाल्या आणि त्यांना बरें वाईट-खारट तुरट-आंबट गोड हें कळायला लागलें म्हणजे, त्यांच्याच पसंतीच्या वरांशीं त्यांचीं लग्नें लावून दिलीं पाहिजेत !! आणि शिवाय तुमच्या सारख्या वयातींत पुरुषांनीं गुणांनीं, स्वभावानें, रूपानें आणि एकंदर गोष्टींनीं योग्य अशीच वधु पाहून तिच्याशीं जन्माचा संबंध जुळवून घेतलेला बरा ! म्हणून म्हणतों तिनें तुम्हाला आणि तुम्हीं तिला समक्ष पाहिलेंच पाहिजे. माझ्या तारीला तुमचा हा थाट, तुमचें हें रूप, तुमचा हा गोड स्वभाव आणि तुमचें हें प्रेमळ भाषण आवडेल यांत तर शंकाच नाहीं ह्मणा ! पण मानाजीराव माझी तारा देखील तुमच्या पसंतीला उतरल्याशिवाय राहायची नाहीं बरें का !! ती माझीच पोर ह्मणून मी तिची वृथा स्तुती करतों असें समजूं नका ! खरेंच सांगतों अहो तिच्या सारखी स्वरूपवान् पोर या साऱ्या विचित्रपुरींत एक-एक देखील सांपडायची नाहीं असें सगळें जग म्हणत आहे समजलांत !!!

मानाजी०—खरें कीं काय !!

धनाजी०—अहो, परमेश्वरकृपेनें जर हा संबंध जुळला तर मानाजीराव तुह्माला काय सांगूं तुमचा जोडा लाखांत एक होईल समजलांत ! ! !

मानाजी०—मामासाहेब, रूपाला मी फारशी किंमत देत नाहीं ! मुलगी साधारण आपली काळी सांवळी आणि नाकानें अंमळ अप्री असली तरी मला चालते ! फार तर काय एकवेळ मांजरासारखे घारे डोळे आणि भुरे केंसही मला पत्करतील ! पण अवयवांत मात्र यत्किंचित्‌ही खोड उपयोगाची नाहीं ! नाहीं तर कुठे एक डोळाच फुटला आहे—नाहीं तर त्यांत वडसच वाढला आहे—एक कानच फाटला आहे—ओंठच चिरला आहे—हातच लुळा आहे—पायच लंगडा आहे—कुबडच निघालें आहे—नाहीं तर खारकेसारखी आपली वाळकीच आहे—नाहीं तर ह्मसरासारखी ढमाली आहे—नाहीं तर गुडघ्या इतकी ठेंगूच आहे—नाहीं तर ताडासारखी उंच ढंगाळ आहे—अशांतला प्रकार मात्र बिलकूल खपायचा नाहीं आपल्याला ! ! हाडकांडानें मजबूत—संसारांत दक्ष—नवऱ्याच्या जीवाला जपणारी—आपल्या कुलशीलाप्रमाणें वागणारी—वडील माणसांची मर्यादा ठेवणारी—अशी वधु असली ह्मणजे झालें आमचें काम ! ! नाहीं तर हातपाय गोंडस आहेत पण अंगांत तरतरीच नाहीं तर काय उपयोग ! नाकाडोळ्यांनीं सुरेख आहे पण चंचल आणि चटोर आहे तर काय उपयोग ! ! रंगानें गोरी भुरकी आहे पण त्याबरोबरच अंगांत चवचालपणा भरला आहे तर काय उपयोग ! !

कंठ मधुर आहे आणि गाणींही चांगलीं गळ्यावर ह्मणते पण नजर जरा वांकडी आहे तर काय उपयोग!! मामासाहेब, घरचा कित्ता उत्तम–आणि सुशील वर्तन हीं असलीं ह्मणजे यांहून जास्त कांहीं एक नको आम्हाला!!

धनाजी॰—मानाजीराव, तुह्मीं ह्मणतां हे गुण तर आहेतच तिच्या अंगांत! पण शिवाय तिचा स्वरही अगदीं कोकिळे सारखा आहे! पोर कशिदा काय काढते सुरेख! रांगोळ्या किती काढते नाना प्रकारच्या! भागवत–रामायण–वाचते किती प्रेमळपणानें! मानाजीराव, टापटीप तर तिच्याच पासून शिकावी! मात्र सासरच्या चरकांत अजून पिळली गेली नाहीं ह्मणून अंमळ हट्टी आहे इतकेंच!

मानाजी॰—अं:! त्यांत कांहीं विशेष नाहीं! मामासाहेब, तो हट्टबिट्ट चट सारा निघून जाईल तेव्हांच! पण मामासाहेब, हो बरी आठवण झाली, तिचे दांत आहेत ना पांढरे स्वच्छ! लोक ते पांढरे असावेत असें ह्मणतात म्हणून विचारतों!!

धनाजी॰—मानाजीराव, माझ्या पोरींत एवढेंसें न्यून्य दाखवा म्हणून जर तुम्हीं मला विचारलेंत तर तें मलाच काय पण जगांतील कोणत्याही चाणाक्ष पारख्याला सांपडणें कठीण!! मग मानाजीराव, आतां उगीच उशीर कां? कोण आहे रे तिकडे? तो एसबा आहे का तेथें? एसबा–(एसबा 'जी' म्हणत पुढें येतो.) यांना पोरीकडे घेऊन चल. पोर शहाणीच आहे म्हणा! तेव्हां तिला कांहीं

अधिक उणें सांगितलें पाहिजे असें नाहीं! पण तिच्या कानांत हलकेच माझा असा निरोप सांग कीं, या मानाजी-रावासारख्या दरबारी माणसांचा आदरसत्कार योग्य रीतीनें झाला पाहिजे!!

मानाजी०—मामासाहेब, आपण तेथवर आला असतां तर बरें झालें असतें! मला एकट्याला तेथें कसेंसेंच वाटेल म्हणून म्हणतों!!

धनाजी०—छे–छे–छे–छे–मानाजीराव, तिनें त्या दौलत्या बद्दलचा हट्ट सोडल्याखेरीज मीं तिचें तोंड पहायचें नाहीं आणि तिच्याशीं बोलायचें नाहीं असा संकल्प केला आहे!! म्हणून म्हणतों कीं, तुमच्याबरोबर मला या वेळेस तरी तिच्याकडे येतां उपयोगी नाहीं! आणि शिवाय मानाजीराव–असल्या मनधरणीच्या प्रसंगीं स्त्रीपुरुषांना एकांतच पाहिजे!! माझी तर पक्की खातरी आहे कीं, तुम्हांला पाहतांच त्या दौलत्याबद्दल तिच्या डोक्यांत शिरलेलें वेड पार नाहींसें होऊन जाईल!!

मानाजी०—मामासाहेब, यांत शंकाच नाहीं! पण मनधरणीचा प्रसंग म्हटला म्हणजे आम्हांला हा पहिलाच! मीं असें म्हणतों म्हणजे मला कांहीं तिचें भय वाटतें असें नव्हे!! पण—

धनाजी०—पण काय? यांत तुम्हांला बिकट तें काय वाटतें!

मानाजी०—बिकट असें कांहीं नाहीं म्हणा; पण समजा, हे डोळे त्या तेजानें दिपले तर पुढें काय वाट!

मामासाहेब, ही कांहीं लहानसहान अडचण नाहीं ! अहो, या पोटांत धडकी भरेल धडकी ! आणि ती कां एकदां भरली कीं मग आमची ही जीभ चळायला मोठी पंचाईत पडेल समजलांत ! ! हूं काय ! म्हणून म्हणतों यानात बरें थोडावेळ माझ्या बरोबर तेथवर ! अहो, असा प्रसंग यायचा नाहींच म्हणा, पण आलाच तर आपण दोन शब्द बोलून तेवढी वेळ मारून न्यायला उपयोगी पडाल म्हणतों आणि दुसरें काय ! ! !

धनाजी०—मानाजीराव, तुम्ही पुरुषासारखे पुरुष दिसतां आणि पोरीला पाहून दिपून जाईन म्हणून म्हणतां ! (एकीकडे) हें असलें रडत राऊत घोड्यावर बसवून कसा निभाव लागेल तो लागो !! (उघड) तुमची आई तुम्हांला छट म्हणून तुमचें कौतुक करीत असे, असें मघाशीं तुम्हीं मला सांगितलेंत, तें काय ! अहो, जर कां तुम्हीं म्हणतां अशी तुमची त्रेधा उडालेली माझ्या पोरीनें पाहिली तर ती तुमच्या आणि माझ्या दोघांच्याही तोंडांत शेण घालील समजलांत ! !

मानाजी०—मामासाहेब, नांव कशाला घेतां त्याचें ! तिच्या त्या तेजानें जर कां माझ्या डोळ्यावर झांपड आली तर कांहीं तरी युक्ति करून अशी वेळ मारून नेईन कीं ज्याचें नांव तें ! ! अशा मनधरणीच्या प्रसंगीं काय करावें लागतें आणि कसें वागावें लागतें त कैकवेळां ऐकलें आहे मीं लोकांच्या तोंडून ! देतों हुबेहुब तशी बतावणी उठवून आणि येतों आपल्याला

विचारायला कीं कधीं घेतां हें मंगलकार्य उरकून !! (मिशीवर पीळ देऊन) मीं नांवाचा बिलंदर मान्या आहे येवढें ध्यानांत असूं द्या आपल्या !!!

धनाजी०—वा: ! तुमचें आताचें हें अवसान खूप छान ! हं—असा मिशीला पीळ देऊन जरा नेट धरा म्हणजे पोर तुमची खास झाली म्हणून समजा ! एसबा, चल यांना पोरीकडे घेऊन. मानाजीराव, चलावें आपण याच्या मागून. आज दिवसही बरा आहे, आणि ही आतांची वेळ ही शुभ आहे !! तेव्हां अशा शुभ वेळीं आरंभिलेलीं कामें परिणामीं शुभच व्हायचीं !! मानाजीराव, तुमच्या कुळस्वामीचें स्मरण करा आणि चला या एसबाच्या मागून म्हणजे सर्व कार्य निर्विघ्नपणें पार पडेल !!!

मानाजी०—मामासाहेब, आमची कुळस्वामीण तुळजापुरची भवानी ! हे माझ्या तुळजापूरच्या भवानी आई या तुझ्या भक्ताला या कामांत यश आलें म्हणजे तुला कवड्याची माळ वाहायाला धांवत येईन बघ तुझ्या पायीं !!

(पडदा पडतो.)

अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

स्थळ:—सैतानी बंगला.

वेळ:—अडीचप्रहर दिवस उलटल्यानंतर.

(चिमणी तारेचा पोषाख करून नट्टापट्टा करीत बसली आहे, तिच्या समोर एक व दोन बाजूस दोन आरसे

आहेत, जवळ डागीन्यांचा डबा व कुंकवाचा करंडा आहे असा पडदा उघडतो.)

चिमणी॰—अजून कांहीं बाई मेली या चेहऱ्यांत चटक येत नाहीं! मेलं म्हटलं हे खोल गाल या नथेंतल्या भपकेदार आणि टप्पुऱ्या मोत्यानं, या हिऱ्याच्या टिकेनं, आणि या हिरव्या लोलकानं अंमळ उठून दिसतील म्हणून! पण त्यामुळं मेल्या ह्या गालांच्या खळग्या पहावं तों आपल्या जास्तच खोल दिसायला लागल्या!! गालांत सुपाऱ्या तरी धरून पाहूं कां! छेः भलतंच! त्यानं मेली बोलायला यायचीच पंचाईत पडायची! अगोदरच मेली ही जीभ या विरळ दातांत घोटाळते आहे, आणि त्याच्यांत जर ही सुपाऱ्यांची भर पडली, तर अजून तोंडांतून लाळ गळायला लागली नाहीं तीच मेली गळूं लागेल!! या मेल्या पांढऱ्या बटेनं तर माझी जशी कांहीं पाठ पुरविली आहे! मेलीला मी वरचेवर चोपून बसवितेंच आहे, आणि ही मेली वरचेवर खालीं पडतेच आहे! (बट हातानें चोपून बसवून) बस हो बस—अश्शी बस! कुंकवाची ही इतकी बारीक टिकली मला नाहीं बाई शोभत! हा अस्सा (कुंकू मोठें करून) भळभळीत चांदच चांगला शोभतो!! पण मेल्या ह्या कपाळावरच्या सुरकुत्या! इश्श ग बाई! म्हटलं कुंकवाच्या या मोठ्या चांदानं त्या लपवीन म्हणून! पण मेल्या त्या कुठल्या झांकायला!! जळूं देत मेल्या त्या सुरकुत्या! तोंड गोरं दिसावं म्हणून तोंडाला हाळद चोपडली, पण आहे कां

कांहीं उपयोग! आपलं हें तोंड आतां हिरवंच दिसायाला लागलं!! कोण मेला हा त्रास! ह्यातान्याचं तरणं होणं कठीण ग बाई कठीण!! माणूस किती किती गोष्टी ह्मणून तरी सांभाळील! ही गालावरची लव—हिनं तर मला कशी अगदीं ओकारी आणली आहेन्! मेली हिच्यावर हाळद तरी किती चोळायची आतां! हें कातडं देखील हुळहुळं झालं बाई! आभाळाप्रमाणं फाटलेला हा भांग—हा बरीक बाई मेणानं आणि काजळानं कसापण अगदीं छानदार जुळून आला आहे!! पण मेला हा बुचडा! जव्ळा अजून रेखून येत नाहीं!! हीं फुलं—हीं बरीक चांगलीं बसलीं आहेत ह्मणायचीं! (केसावरून हात फिरवून) मघापासून पहातें आहे कीं ह्या तेलपाण्यानं ह्या मेल्या अर्ध्या पांढऱ्या झालेल्या चरड केसांना थोडी मवाळी येईल ह्मणून! पण पहावं तों आपला यांचा चरचरीतपणा आहे तस्सा आहे!! (पदरानें डोळे पुसून) आज चार वर्षं मेल्या ह्या डोळ्यांना खूप लागून त्यांतून आपलं पाणीच गळायला लागलं आहे! आणि त्यांतून मेलं आज एक सारखं आरशाकडे पाहिल्यामुळं आतां तर जशी कांहीं आपली त्यांना गळतीच लागली आहे! अंमळ ह्मटलं हें डोळ्यातलं काजळ टिकेल! पण तें कुठलं टिकायला!! हे तोंडावरचे काजळाचे पाट पुसून पुसून माझे हात देखील किनई आतां अगदीं काळे कुट्ट झाले!! मेली ही चोळी, चार वेळां दोरे घालून आंवळून आणली! पण मेली आंगाला तंग बसेल तर शपथ!! अंगावर नाहीं उरलं मेलं गुंजभर

मांस ! मग ह्या उघड्या हाडांवरून ती निसरेल नाहीं तर काय होईल ! ! ! (उठून पदर सरसावून) हो—पदर इतका आंखुडच चांगला ! पण ही मेली दोन बोटा एवढी कासोट्याची लहान पट्टी या वाळक्या अंगाला अगदींच वाईट दिसते !! जळूं दे मेली ही पट्टी! पण आतां ह्या पोटाच्या वळकट्या ! इथं आहे कां कांहीं उपाय ! हें लुगडं—हें तरी बसतं आहे कुठं अंगाला चोपून ! हीं हाडं आहेतना हात धुऊन पाठीस लागलेलीं !! त्याला लिंपण देणारानं द्यावं तरी कसलं !! पायांची ही चोपणीं ! आहे कां यांना कांहीं या सुरेख तोड्यातोरड्यांची शोभा ! पुरे झालं मेलं !! सारंच ओंगळ तिथ माणूस छपवील काय आणि लपवील काय !! कित्ती कित्ती केलं तरी पोरवयाची सुरखी कां आतां यायची आहे आमच्या तोंडावर !! आणि तसं बाळसं कां आतां यायचं आहे आमच्या अंगावर !! (ठुमकत चालून पाहून) चिमणे, हें सारं उसनं ग उसनं ! याला बाई जातीवंतच लागतं !! लहानपणीं लागलं होतं कां कधीं असं ओढून चंद्रबळ आणायला ! साधीच होतीस तेंव्हां, पण दिसत होतीसना गौरी सारखी घवघवीत !! आणखी तेंव्हां लागत होतं कां कधीं असं नकली नटणं नी मुरडणं !

(दगड्या प्रवेश करून व चिमणीचा थाट पाहून)

दगड्या—अल्–ल्–ल्–ल्–ल्–ठार करतीया ठार ! विंद्राची अस्तुरी जनुं ! नेतर दिपूनशान् आकल गुंग व्हतीया ! हाय्–हाय्–हाय्–हाय्–नंदर न्हाई ठरत नंदर !

जनूं नागीन फुन् फुन् फुन् करतीया ! स्वोंग पन अक्शी दिरिष्ट लागलसं ग्वाड झालया ! चिमे–ए चिमे–हा शिनगार मनांत लै भरतूया ! आन् ह्यो मुखडा आन् ह्यो नोक झोंक पघूनशान् जीव कसा गारीगार होऊन जातुया !!

चिमणी—(संतोषानें) दगड्या, तर मग हा थाट तुला आवडला ह्मणतोस ! खरंच ही आजची वेळ एकदांची कशी निघून जाईल अशी मला मोठ्ठी धास्ती पडली आहे !! पण खरंच सांग–मी आतां कशीरे दिसते ? खरं–खरं सांग हो अगदीं–मी भरेन कां रे त्यांच्या डोळ्यांत ! माझं वय रे किती दिसतं ! आतां दिसते कां मी चाळीस वर्षांची थेर्डी !

दगड्या—छे ! त्येचं नांव नग पगा ! चिमे, तूं तर जनूं अक्शी आठरा न्हाई तर ईस वर्साची तरनी नार दिसतेस !! मानाजीराव तर तुझ्या गळ्यामंदी उड्या घालील पघ उड्या !! थाट पन् थाट झालाया ! असं सरूप त्येच्या बानबी पगितलं नसल ! अक्शी बिजलीवानी तेज मारतया नव्ह का ! (पड्यांतून 'दगड्या' 'दगड्या' अशा हांका ऐकूं येतात.) येसबा–येसबा–येसबा–येसबा–हो वांईच दमानं घ्या दमानं–पन् चिमे, मी ह्मनतो येचा उलगडा कसा व्हनार ! आन् त्यो मरद जर तुझ्यासंग लगीन लावायचं ह्मनाला तर ह्मोर काय वाट !!

चिमणी—दगड्या, त्याची नको तुला काळजी ! पुढं काय करायचं आणि काय नाहीं ते सारं मी योजून ठेवलं आहे ! मी अंमळ आंतून जाऊन येते बरं का,

तवर मानाजीरावांना तूं इथ बसायला सांग. त्यांच्याशीं नीट बोल, नाहींतर बावळी मुद्रा करून बसशील आपला त्यांच्या तोंडाकडे पहात! ते विचारतील त्या प्रश्नांची उत्तरं मोठ्या अदबीनं आणि! हुशारीनं दे धरशीलनां मीं सांगितलेलं पुरं ध्यानांत? पहातें आतां तुझं शहाणपण कसं आहे तें! (चिमणी निघून जाते व पुन्हां पडद्यांतून 'दगड्या' 'दगड्या' अशा हांका ऐकूं येतात.)

दगड्या—अक्शी दम न्हाई झंजी! आलों आलों व्हय. (जातां जातां) परसंग तर लै बिकट है! ही आवा आतां झालीया आमच्या ताईसाब—आन् त्यो मान्या आतां आलाया इसनी पगाया! जर कां त्येनं हें कवटाळ हेरलं न्हाई तर झालं काम फत्ते! पन् ह्येंच जर का त्येच्या ध्येनामंदी आलं तर मातर है वखत परानावर! ('दगड्या'—'दगड्या'—अशा हांका पुन्हां ऐकूं येतात.) काय इचभन्! ही का मानसं हैती कां जनारं हैती! आलुया—येतुया—ह्मनून गागतूया—पन् दगड्या—दगड्या—दगड्या—हांका मारूनशान् परान् काढलया!!! (दार उघडतो. येसबा व मानाजीराव प्रवेश करतात.)

येसबा—दगड्या, लेका हथ आपल्या बाचं डब्रुलं गाडीत व्हतास व्हय डबुलं! आं! इक्त्या वाटकूळ लेका तुझ्या बानं बाहीर उभं रहाव व्हय! ह्येच कां लेका आतां आपलं थोरलं धनीसाब असत, तर त्येनी तुझ्या पाठीवर कोरडच वढल असत पग!! (दगड्याचा कान धरून) ह्ये पग लेका, ताईसाबासनी पाहान्या पाईं ह्ये गि-

रिस्त आल्याती ! ह्येना या ह्मनावं–बसा ह्मनावं–का लेका आ वांसूनशान् ह्येंच्या ह्मोर हेल्यावानी सवस्त उभं रहावं!! (मानाजीरावाकडे वळून) धनीसाब, ह्यो चाकूर है खुळा! तवां ह्येसनी यातलं काईबी उमगत न्हाई ! ताईसाब खोली मंदी काय करत्यात त्ये पगुनशान् हा आलोंच पगा खिनांत ! तुह्मीं तवर वाईच टेका हथं ! ! (निघून जातो.)

दगड्या—धनीसाब, बसा कि हो हथं ! हे घरबी तुमचंच आन् मीबी तुमचाच है ! (मानाजीराव बसत नाहीं असें पाहून) धनीसाब, ह्या चोळन्यापाई लई तंग वाटतया व्हय ! वाईच खांकत हात घालूनशान् धनीसाबासनी बसवूं व्हय खालतीं ! !

मानाजी०—छे: छे: तसें कांहीं नाहीं. मी थोडा दम टाकतों आहे. शिवाय ह्मटलें अंमळ पायही मोकळे होतील आणि येथल्या वस्तुही दृष्टीस पडतील ! ताईसाहेब आल्या ह्मणजे त्या आणि मी एकदमच बसूं ! पण काय रे तो आरसा कर बरें अंमळ इकडे ! (दगड्या आरसा देतो, तो मानाजीराव हातांत घेतो; इतक्यांत येसबा प्रवेश करतो, त्याच्याकडे वळून) काय रे ताईसाहेब आल्या वाटतें !

येसबा—ताईसाब चिरडी नेसत्यात चिरडी ! आपून वांईच दम टाका तवर आल्याच ह्मंगाल्या त्या ! मी आन् ह्यो दगड्या घेतूया तवर न्हेरी करूनशान्! कां खरं कीं न्हाई दगड्या? (दगड्या मानेनें 'हो' ह्मणून सुचवितो)

मानाजी०—बरं आहे–पण आंत जाऊन ताईसा-

हेबांना धांदल करूं नका हो ! माझी कांहीं घाई नाहीं ! त्यांना ह्मणावें तुमचें स्वस्थ होऊंद्या–अंमळ उशीर लागला तरी चालेल !!

दगडया— }
येसबा — } जी–व्हय. (दोघेही निघून जातात.)

मानाजी०— (इकडे तिकडे पाहून आश्चर्यानें) अब–ब–ब–ब–ब–या धनाजीरावाची केवढी ही अलोट संपत्ति ! मला नाहीं वाटलें कीं आमचे हे भावी मामंजी इतके गबर असतील ह्मणून ! ! ह्मातारा बडा लुच्चा–मोठा खुबीदार–आणि खूप रंगेल दिसतो आहे ! आणि या पोरीला त्यानें तशीच रंगेल आणि छटेल बनविलेली दिसते ! ! अशा ह्या चटक चांदणीला (हातांतील आरशांत पाहून) आमचें हें असलें ध्यान कसें मनांत भरेल कोण जाणें ! मोठ्ठी काळजी आहे बोवा आपल्याला ! मींहीं बारा बंदरचें पाणी चाखलें आहे ! बोलण्यांत पटाईत आहे ! दिसण्यांत बभूक आहे ! कृतींत कावेबाज आहे ! आणि पुष्कळ खेळही खेळलों आहे ! हें सारें खरें, पण आजची ही माझी गोळी बिनचुक लागेल तेव्हां खरी ! बार तर खूप ठांसून भरला आहे ! पण तो ऐनप्रसंगी रंजूक प्यायला नाहीं ह्मणजे मिळविली !! (आरशांत पाहून)वः ! ही कंगणीदार पिळाची पगडी या फक्कडाच्या या भव्य शरीराला कशी पण अगदीं खूप खाशी शोभते! (पगडी हालवून)याहून अंमळ किंचित्–हं–अशी–अश्शी तिरपी बसली पाहिजे ! पण हा नेत्र कटाक्ष ! हा नाहीं बरो-

वर! हे डोळे कसे गर–गर–गर फिरले पाहिजेत! लुसलुशीत मदनमंजरीच्या मोहक दर्शनानें हे कसे धुंद दिसले पाहिजेत! आणि या कटाक्षांत जहर भरला पाहिजे जालीम जहर!! ही दृष्टी ह्मटली ह्मणजे हं! किंचित् अशी–अशी वांकडी पाहिजे!! आणि ही जर कायमची टिकेल तर हा नेत्रभाला तिच्या काळजाचें पाणी पाणी करून टाकील! पण यांत जर उणें पडलें तर आमची ही नेहमीची बावळी मुद्रा आमचा सफै घात करील!! (आरशांत पाहून) यंव! या गुलमिच्छानीं केवढी जबरदस्त कामगिरी बजावली आहे! उतार वयामुळें येथें पडलेले हे गालखड्डे आणि पुढें आलेलीं हीं येथलीं टेंगळें–यांनीं कशीं अगदीं छान झांकून टाकिलीं आहेत!! अरे! पण हें काय लचांड! तेल पाणी चोपडून–घासून–पुसून–या आरशासारखें स्वच्छ केलेलें हें तोंड पुन्हां आपलें कळकट आणि निस्तेज दिसायला लागलें! (अंगरख्याच्या डाव्या खिशांतून फडकें काढून त्यानें तोंड पुसून व पुन्हां आरशांत पाहून) अरे–रे–रे–रे–रे–च्–च्–च्–च्–हें काय भलतेंच झालें! या धांदलींत डाव्या खिशांतलें हें नाक पुसायचें फडकें! काय करावें आतां! नाकांतल्या पाण्याचें हें चिकट भेण झालें कीं नाहीं आतां साऱ्या तोंडभर!! मान्या! कोण लेका तुझी धांदल ही! सकाळीं घोटघोटून गुळगुळीत केलेला हा चेहरा आणि मोठ्या प्रयासानें त्यावर आणलेली ती तुकतुकी! सारी मेहनत झालीं कीं नाहीं आतां व्यर्थ!! (फडकें डाव्या खिशांत घा-

लून आणि उजव्या खिशांतला हातरुमाल काढून त्यानें तोंड पुसून आरशांत पाहिल्यावर) आतां काय होणार कपाळ! गचाळ माणसाचें कर्मच हें ! आतां ह्या तेलकट तोंडावर बसलेले हे मेणाचे डाग—झाले हे आतां वज्रलेपच झाले! बरें झालें ह्या पोषाकानें तरी ह्या वेळेस बरेंच संभाळलें आहे ह्मणून ! नाहींतर तोंडांत भडकावून घेऊन असेंच परत जावें लागलें असतें ! (तोंडावरून हात फिरवून) अरे ! एक प्रहरापूर्वी या येथें हाताला कसें अगदीं साफ आणि गुलगुलीत लागत होतें ! आणि वाटलें होतें कीं तें असेंच बराच वेळ टिकेल ह्मणून ! पण पुन्हां झाला आपला हा खरारा ! (आरशांत पाहून) हा—हा पहा पांढरा केस ! दोन घटका मोडून मेहनत केलीन् खंड्यानें! पण उपयोगाच्या नांवानें पूज्य ! ! (पांढरा केस उपटण्याचा प्रयत्न करून) अय—य—य—य—य— यानें उलटा त्रास मात्र व्हायचा ! मरू दे शिंचाला असाच ! ! (कांहीं वेळ आरशांत निरखून पाहून) अरे ! एका पाव घटकेपूर्वी पट्टी खाल्लीना ! तरी पण पुन्हां आपला हा ओंठाचा काळवटपणा कायम ! याला लाली चढवावी म्हणून खटपट करावी तों इकडे चढतो आहे दांतावर कीट ! कीट चढला तरी बेहत्तर ! पण हे ओंठ तरण्या बांडाप्रमाणें गुंजे सारखे लाल भडक दिसले पाहिजेत ! ! (पुन्हां पट्टी खातो व तोंड रंगलेलें पाहून) वाः ! यंव ! आतां बरोबर जमला जम ! बरें पण आतां ती आल्यावर प्रथम आरंभ कसा करावा ! मोठ्ठं कठीण आहे बुवा ! तिनें विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें खु-

बिदार, गोड आणि प्रेमळ अशा शब्दांनीं माझ्याकडून कशीं मिळतील ह्याची मला मोठ्ठी काळजी वाटते आहे बोवा! (दरवाजा उघडल्याचा आवाज ऐकूं येतो.) कोणसें आलें वाटतें! काय तोरड्या वाजताहेत! तर मग ती–तीच आली बरें कां! (कानोसा घेतल्यासारखें दाखवून) अरे पण हा तोरड्यांचा आणि बांगड्यांचा आवाज ऐकल्यापासून या माझ्या छातींत असें धड धड कां बरें व्हायला लागलें!! (कांपत कांपत) हं! मानाजीराव तुमच्या परिक्षेची वेळ अगदीं जवळ आली बरें कां! संभाळा आतां!! नाहींतर–(इतक्यांत चिमणी प्रवेश करते. मानाजीराव तिच्याकडे पाठ करून ऐटीनें उभा राहतो.)

चिमणी—काय मेलीं माणसं–माणसं पण कशीं अगदीं नशीबा सारखी मिळालीं आहेत हो! त्या मेल्या दगड्याला आणि त्या मेल्या येशाला इकडे नीट बसायला सांगा ह्मणून दहा वेळां खडसून सांगितलं होतं! पण मेल्यांची दांतखिळी कांहीं उकलली नाहीं इकडे बसा ह्मणून ह्मणायला!!! अस्सं उभं राहून राहून मेली पायाला कळ देखील लागली असेल! (मानाजीरावास उद्देशून) ह्मटलं बसायचं होतं इकडे!

मानाजी०—(एकीकडे) तिनेंच प्रथम आरंभ केला हें एक बरेंच झालें ह्मणायचें! स्वर तर अगदीं कोकिळेसारखा मंजूळ आहे बोवा!! कानाला कसा खडीसाखरेसारखा गोड लागतो आहे!! प्रथम दर्शनींच जेव्हां इतका आदर सत्कार चालला आहे तेव्हां आमच्या या रूपानें

आणि आमच्या या थाटानें तिच्या मनावर चांगलाच पगडा बसविला आहेसें दिसतें !!! ही एक मोठीच काळजी दूर झाली ह्मणायची ! उगाच नाहीं या मानाजीराव फाकड्याला लोक ऐटबाज पुरुष ह्मणत !! (मागें वळून उघड) पण हा तोंडावरचा बुरखा ! आपल्या दोघांत हा तिसरा कशाला हवा आहे मध्यें लडबडायला !!

चिमणी—मी आज्ञाच होण्याची वाट पहात होतें ! हा पहा याला दूर लोटला !

मानाजी०—(आश्चर्य व भीती पावून डोळे घट्ट दाबून धरतो आणि एकीकडे तोंडानें 'अगस्त्यं याज्ञवल्क्यं च जाबालिंच बृहस्पतीं च–तू–त्–त्' असा पाठ ह्मणतो)

चिमणी—ईश्श ! मेलं हें काय भलतंच ! मी कां कोणी दैदीप्यमान पुतळी आहें ! कां मेली स्वर्ग लोकीचीं रंभा आहे ! कां आभाळांतली वीज आहे ! म्हणून आपले डोळे इतके दिपले !! इतकं नाहीं कांहीं माझं स्वरूप नांवाजण्या सारखं ! मला बरं वाटावं म्हणून माझं आपलं उगीच कौतूक करणं होत आहे इकडून, हें मला कळत कां नाहीं ! माझ्या सारख्या रुपवती मुली आजवर इकडे कैक पाहिल्या असतील ! खरंच बाई, पुरुषांना किनई सोंग फार चांगलीं आणतां येतात हो !!

मानाजी०—(एकीकडे) हा काय मला भ्रम पडला आहे ! कीं हे माझे डोळे मला फसवीत आहेत !! (किलकिल्या डोळ्यानें पाहून) ही तर ती खास नाहींच ! मग ही कोण !! हां–ही तिची थोरली बहीण

असावी ! तरी ह्मटलें हें असें कां ! ही आमची मेहुणी, अगदीं आमच्या मातोश्री सारखी दिसते बोवा ! आमची मातोश्री तिच्या चाळीशीच्या सुमाराला अगदीं हुबेहुब अशीच दिसत होती !!

चिमणी—मेलं पुरे झालं आता या तारेचं कौतुक ! ह्मटलं बसायचं होतं आतां इकडे !!

मानाजी०—(एकीकडे) कोण तारा !! अरे, तर मग ही तीच ! पण तीच ह्मणावी तर ही वयानें बरीच उतार दिसते ! हीं हांसायला लागली ह्मणजे हिच्या गालांना खळग्या पडतात, आणि त्यामुळें हिच्या मुखकमलाला शोभा येते ! ह्मणून मला त्या थेडर्यानें सांगितलें ! पण हिच्या गालांकडे पाहावें तों ते आपले हात हात खोल गेलेले दिसतात !! आणि शिवाय मधून मधून एखादा दुसरा केंसही पांढरा झालेला दिसतो आहे !! हें गौडबंगाल आहे तरी काय !! आणि हिला लोक ही लेकोत्तर सुंदर आहे असें म्हणतात तें कसें !! कां माझ्याच डोळ्यांतल्या बाहुल्या उलट्या आहेत ? बाहुल्या उलट्या आहेत असें म्हणावें तर जगांतल्या साऱ्या वस्तू—लोक त्या जशा आहेत म्हणून मला सांगतात—तशाच मला दिसतात ! मग हिच्याच स्वरूपाची साक्ष माझ्या डोळ्यांना कां पटूं नये !! कां स्त्रियांच्या सौंदर्या बद्दलची माझी कल्पना चुकीची आहे !!!

चिमणी—माझं कौतुक करायला नको असं मीं आतां म्हटलं त्याचा इकडे राग आला वाटतं ? आणि

ह्मणूनच कां माझ्याशीं बोलायचं होत नाहीं तें ! माझं ग बाई त्यांत काय वेचतं आहे ! मला किनई आपण हवी त्याची उपमा द्या !! मग तर झालं ना ?

मानाजी०—(एकीकडे) पण हिच्यांत कांहीं जादू तर भरली नाहीं ना ! हिच्याकडे जों जों जास्त निरखून पाहवें तों तों लोकांच्या म्हणण्यांत सत्यता आहे असें मला पुन्हां पुन्हां कां बरें वाटूं लागतें ! नीलमण्यासारखा तकाकणारा हीचा हा नीलवर्ण ! आहे ! यांत ही एक प्रकारची मौज़ दिसते आहे खरी ! ! तसेंच हिच्या पाणिदार डोळ्यांतून मधून मधून गंगाप्रवाहाप्रमाणें झिरपणारें पाणी, कसें पण अगदीं मोत्याप्रमाणें चमकत आहे खरें ! !—तरी ह्मटलें लोकमत चुकीचें कसें होईल ! ! ! तसेंच ज्या माणसांच्या अंगावर लव फार असते तीं माणसें मोठीं दैववान् असतात असें ह्मणतात ! तसली लव तर हिच्या सर्व तोंडभर आणि अंगभर विपूल आहे ! ! तेव्हां ही मोठी दैववान् आहे यांत शंका नाही ! ! जें माणूस शरीरानें कृश असतें तें मोठें विचारी आणि विशाल बुद्धीचें असतें असें ह्मणतात ! तेव्हां हिचें हें कृश शरीर हिच्या अंगच्या शहाणपणाचें द्योतक आहे ह्मणायचें ! ! तरी ह्मटलें सारें जग हिची प्रशंसा करतें तें कां ! आणि हिच्यावर मागणीघालणारांच्या इतक्या उड्या कां ! ! बरें झालें कीं पहिल्या प्रथमच ' तूं कुरूप आहेस ' असें आह्मीं हिला तोंडून म्हटलें नाहीं म्हणून ! नाहीं तर

हिच्या कडून आचरट ह्मणून घेऊन शिवाय बहुजन समाजाचेंही हांसूं करून घेतलें असतें !!

चिमणी—कां ! विचार कसला होतो आहे ह्मटलं आतां ? खरंच सांगतें, माझ्या दादानं किनई मला इकडच्या स्वरूपाबद्दल, स्वभावाबद्दल आणि गुणांबद्दल खोटं नाटं सांगून माझं मन कसं अगदीं उदास करून टाकलं होतं ! ! पण इकडचं दर्शन मला आतां झाल्यानं माझ्या मनाला कित्ती आनंद वाटतो आहे ह्मणून सांगूं ! !

मानाजी०—आणि तुम्ही देखील कर्कश आहांत—द्वाडच आहांत—हट्टीच आहांत असें मामासाहेबांनीं मला सांगून तुमच्या गुणांबद्दल आणि तुमच्या वर्तनाबद्दल माझा खोटाच ग्रह करून टाकला होता ! ! पण खरोखर सांगतों तुमच्यासारखा गोड स्वभाव, तुमच्यासारखें मधुर भाषण आणि तुमच्यासारखें थोर अंतःकरण आपण तर बोवा आजपर्यंत कोणत्याच स्त्रीच्या अंगीं पाहिलें नव्हतें!!!

चिमणी—आणि खरंच, मीं देखील किनई आजवर पुष्कळ पुरुष पाहिले, पण बाई इकडल्या इतकं उदार मन, असं शहाणपण आणि असं रूप माझ्या कांहीं आजवर कधींही दृष्टीस पडलं नव्हतं ! माझं भाग्य थोर ह्मणूनच परमेश्वरानं आज हा आनंदाचा दिवस मला दाखविला !

मानाजी०—तर मग त्या दौलतरावापेक्षां मी तुमच्या मनांत अधिक उतरलों आहे ह्मणायचें ! मला प्रत्यक्ष पाहिलें ह्मणजे तुह्मांला असें वाटेल अशी माझी खा-

त्रीच होती ह्मणा! पण खरेंच सांगतों, मजवरचं हें तुमचं प्रेम पाहून मला मोठी धन्यता वाटते!!

चिमणी—अगबाई! त्या मेल्या माकडतोंड्याबद्दल आपल्याला हें असं खोटंच सांगून आपले कान ज्या मेल्यानं भरवले असतील त्याचं परमेश्वर (बोटें मोडून) कध्धीं कध्धीं बरं करणार नाहीं! इकडल्या नखाची तरी सर येणार आहे कां त्या मेल्याला! मला किनई तो दृष्टीसमोर आलेला देखील खपत नाहीं! मग आवडण्याची गोष्ट कशाला हवी!! माझ्या दादानं किनई हें माझ्यावर निव्वळ कुभांड रचलं आहे बरं! या असल्या राक्षसांच्या जाचांतून परमेश्वर मला केव्हां सोडवील तो सोडवो!!

मानाजी॰–त्याला परमेश्वर हो कशाला हवा आहे! मीच तुह्मांला सोडवितों!! आणि त्या सर्ज्याची आणि मामासाहेबांची याबद्दल पुरी खोड मोडतों!! मग तर झालें कीं नाहीं?

चिमणी–खरंच, करायचंच होतं असं एकदां! माझ्या बाबांच्यासारख्या धनलोभी पुरुषांना अशी अद्दल घडलीच पाहिजे! ही कोण मेली पैशाची राक्षसी हाव!! आमच्या बाबांच्यासारख्या नांवलौकिकाच्या माणसानं आपली मुलगी इतकं वय होईपर्यंत लग्नाशिवाय ठेवलेली कधीं पाहिली होती कां कोणी आजवर! मी ह्मणजे त्यांना आपली बाजारांत नेऊन विकायची ह्मैसच वाटतं आहे! तिला कोणी मागेल तेव्हां ती घरांतून बाहेर निघायची! नाहींतर पडलीच आहे आपली वर्षोनवर्ष घरांत!!

ह्मणून ह्मणतें आपणच जर हें मनावर घेतलं तरच लागणार आहे माझा निभाव! नाहींतर (रडत रडत) माझे बाबा मला ह्मातारपणापर्यंत अशीच कुवारीण ठेवून, शेवटीं मला एकाद्या अजागळ थेडर्याच्या पदरीं बांधून आपली तुंबडी भरायला कध्धीं कमी करायचे नाहींत!! माझी मोलकरीण मला आतांशा नेहमीं ह्मणत असते, कीं ताईसाहेब बाबासाहेबांच्या जाचानं तुमचं पूर्वीचं तेज अलीकडे अगदीं जात चाललं आहे!! ह्मणून ह्मणतें ह्या माझ्या फुटक्या नशीबानं माझी पाठ लवकर सोडली तर बरं! नाहींतर माझी कांहीं अखेर धडगत लागायची नाहीं!!

मानाजी०—आणि मी तरी तुह्मांला हेंच विचारणार होतों, कीं तुमच्याकडे पाहून या माझ्या मनाला क्षणैक आल्हाद आणि क्षणैक खिन्नता कां उत्पन्न होते! आतां बरीक हें असें कां होतें ह्याचें कारण माझ्या ध्यानांत पूर्णपणें आलें!! (चिमणीस जवळ घेऊन व तिचे डोळे पुसून) वेडी नाहींतर! नववधूच्या अंगीं जे गुण अवश्य, ते तुमच्या ठिकाणीं पूर्ण भरले आहेत अशी माझी आतां बालंबाल खात्री झाली आहे!! (चिमणी तोंड फिरविते) तुमची मी व्यर्थ स्तुती करतों असें समजूं नका! परमेश्वर साक्ष तुमच्यासारखी गुणवान् आणि रूपवान् अर्धांगी मिळाली असतां कोणत्याही पुरुषाला धन्यता वाटल्यावांचून राहणार नाहीं!! निदान मला तरी बोवा तुमच्याशिवाय दुसरी वधू बिलकूल पसंत नाहीं! आणि यापुढें मी दुसरी पहाणारही नाहीं!! उद्यां तुह्मांला सासरचें सुख लागलें

ह्मणजे तुह्मीं याहूनही सुरेख दिसाल समजलांत ! नका– डोळ्यांला पाणी आणूं नका ! हें पहा, त्या थेडर्याची खोड मोडण्याचे कामांत जर मला तुमची अनुकूलता मिळाली, तर त्याला 'मामासाहेब' 'मामासाहेब' असें ह्मणून आणि त्याच्या पोटांत शिरून त्याची सारी दौलत अशा शिताफीनें मी गुंडाळून वाहून नेईन, कीं या मानाजीरावाच्या अक्कलेची तारीफ हें सारें जग तोंडांत बोट घालून करीत राहील समजलांत ! ! !

चिमणी—तसंच आहे हो अंगीं चातुर्य ! असे पाय लाभायला पूर्वजन्मीचं पुण्यच पाहिजे पदरीं ! ! !

मानाजी॰—तर मग मामासाहेबांना मी पहिलाच मुहूर्त धरायला सांगतों ! आणि हें मंगलकार्य एकदां आटोपलें कीं त्या थेडर्याचा आणि त्या सर्ज्याचा दोघांचाही चांगला खरपूस समाचार घेतों ! ! कां असेंच कीं नाहीं ?

चिमणी–(मान ओवाळून)अहाहा ! आपलं नाक कापून घेऊन दुसऱ्याला अपशकून केल्याशिवाय असल्या ह्या अवघड कामांत कध्धीं कोणाला यश आल्याचं ऐकलं आहे कां कधीं !! ह्याला किनई मी सांगूंच कां काय केलं पाहिजे तें ? सांग ह्मणायचं झालं तर सांगत्यें !

मानाजी॰—तर मग काय मी आपलें नाक कापून घेऊं ह्मणता होय !

चिमणी–इश्श ! मी खरोखरीचं नाक कापून घ्यायचं कां ह्मणत्यें आहे ! ऐकलं कां मी काय ह्मणत्यें आहे तें !

ह्मटलं अशीं कामं साधायला पुरुषांच्या अंगांत थोडं पाणी लागतं बरं कां! 'दे ग बाई जोगवा' असं ह्मणून कोणी भीक घालीत नसतं समजलांत!

मानाजी०—तर मग माझ्या अंगांत पाणी नाहीं होय! पहा, पहा तर बरें येथें हात लावून! पहाच पण, हे कपडे किती चिंब झाले आहेत ते!! मग तुझें ह्मणणें तरी काय? आणि मीं करायचें तरी काय?

चिमणी—माझ्या सारख्या हातांत बांगड्या भरल्या असल्या ह्मणजे शोभलं असतं मला असं विचारणं! ह्मणे करायचं काय!! खरंच सांगतें, या बाबांच्या घराची मला किनई अगदीं ओक्क री आली आहे आतां! आणि त्यामुळं या उंबरठ्याच्या बाहेर माझं पाऊल केव्हां पडेल असं झालं आहे मला!! मी ह्मणत्यें बाबांना लग्नाचा मुहूर्त धरायला सांगायचं झालं, आणि तो त्यांनीं पुढच्या पंधरवड्यांत धरला! आणि मधेंच कोणी एखादा थेर्डा ठोंब्या दहा हजारांची गठडी पाठीवर बांधून मला मागणी घालायला आला! तर माझे बाबा मला त्याच्या हवालीं करायला कध्धीं मागं पुढं पहायचे नाहींत!!! मी काय ह्मणत्यें आहे त्याचा पडला कां प्रकाश इकडल्या अंत:करणांत! आणि खरंच सांगतें असं जर झालं तर बाबांच्या दौलतींतली एक फुटकी कवडी तरी लागणार आहे कां इकडल्या हातीं!! मग आपले हे मनचे मांडे मनच्या मनींच राहतील ह्मटलं!!!

मानाजी०—खरंच ! तूं ह्मणतेस हें अगदीं खरें आहे बोवा ! आणि या करितांच मी तुझ्यासारखी बायको मला मिळाली पाहिजे ह्मणून ह्मणतों तें!!

चिमणी—हें खरं ना! तर मग गोंधळांत कां पडायचं आहे इतकं! याला नाहींच का कांहीं उपाय सुचत इकडे! नसला सुचत ह्मणून सांगणं झालं तर मी सांगत्यें!!!

मानाजी०—खरोखर तुमच्या अक्कलेची आणि तुमच्या शहाणपणाची तारीफ करावी तेवढी थोडी! (चिमणी मान ओवाळते) नाहीं मान ओवाळूं नका—खरंच मी अगदीं खरें बोलतों आहे ! !

चिमणी—तर मग सांगूंच कां? मला किनई इथून घेऊन जायचं हो! आणि आज संध्याकाळच्या मुहूर्तावर गुपचीप आपलं लग्न लावून घ्यायचं !! (मानाजी आश्चर्यानें आपल्या तोंडावर हात ठेवतो) कां! तोंडावर हात ठेवायला काय झालं! एकदां आपलं लग्न झालं किनई ह्मणजे बाबांचं कांहीं एक चालायचं नाहीं आपल्या पुढं ! ! पटतं आहे कां मग मी काय ह्मणत्यें आहे तें इकडल्या मनाला ! !

मानाजी०—हां! हां !! फारच छानदार युक्ती शोधून काढली बोवा तुह्मीं !! पण आपल्या ह्या दांडग्या वर्तनाबद्दल मामासाहेबांना जर राग आला तर तुला आणि मला त्यांच्या पुढं नाक घासतां घासतां येथलें सालपट निघून जाईल ! ह्याची काय वाट ! बाकी उलट पाहूं गेलें तर ह्यांत फायदा पुष्कळच आहे ह्मणा ! पहिली गोष्ट ही कीं

मामासाहेबांना तुझ्याबद्दल मीं देऊं केलेली पांच हजारांची रक्कम मला द्यायला नको! दुसरी गोष्ट ह्मटली ह्मणजे तुझ्या माझ्या संबंधाच्या आड एखादा उपटसुंभ्या येईल याची भीती बाळगायला नको! आणि तिसरा फायदा हा कीं मामासाहेबांच्या पोटांत शिरायला आणि चांगलीशी संधी पाहून त्यांच्या टाळूवरून सफै हात फिरवायला अगदींच सुलभ!! खरोखर तुमचें चातुर्य आणि तुमचें धैर्य अगदीं अलौकिक आहे बोवा!! पण हा मुखचंद्र पुन्हां माझ्या दृष्टीस पडणार कसा! आणि माझें येथें येणें पुन्हां होणार तरी कसें!!

चिमणी—हात्तिच्या! त्यांत हो काय मोठं आहे! माझं मन आतां वळत नाहीं! पुन्हा समजूत केली तर येईल प्रकर्ण ताळ्यावर! असं बाबांना लटकच सांगितलं, कीं पुन्हा इथें येऊन माझी मनधरणी करायला बाबाच आग्रह करतील इकडे!! सगळ्या जगाच्या हातावर तुरी देण्याचा पटाईतपणा इकडल्या अंगीं पुरा भरला आहे! तेव्हां बाबांच्या पुढं मी ह्मणत्यें आहे तशी बतावणी करतांना इकडे फसायला व्हायचंच नाहीं ह्मणा!! पण ह्मटलं या कामांत थोडं सावधपणानंच वागायला हवं बरं का!!

मानाजी०—(मिशीवर पीळ देऊन) या मानाजीरावाला–या फाकड्याला–या अट्टल सोद्या बहाद्दराला–लोकांच्या गळ्यांत अचुक फांस टाकण्याची विद्या अगदीं पुरी साधली आहे समजलांत! अहो मला चकविण्याची पुण्याई आहे कोणाची! आणि इतकी अक्कल तरी ब्रह्म-

देवानें कोणाच्या डोक्यांत ठेविली आहे सांठवून!!! तुह्मीं त्याबद्दल बिलकूल काळजी करूं नका! मात्र मी येथें परत येतांच माझ्या बरोबर घराबाहेर पडण्याची कडेकोट तयारी करून ठेवा ह्मणजे झालें!! मी इतक्यांत येतों पहा पुन्हां या मुखचंद्राचें दर्शन घ्यायला!

चिमणी—(लाडिकपणानें मानाजीरावास मिठी मारून) खरंना पण हें! खरंच सांगतें, जर कां पुन्हां आपलं दर्शन मला झालं नाहीं तर ही आपली लाडकी तारा पुन्हां कांहीं आपल्या दृष्टीस पडायची नाहीं हो! माझ्यावर आपलं प्रेम किती आहे तेंच पहायचं आहे मला आतां! (पडद्यांत 'धनीसाब' 'धनीसाब' अशा हांका ऐकूं येतात)

मानाजी०—(चिमणीस दूर करून) लाडके, येऊं तर मी आतां?

चिमणी—(डोळ्यास पाणी आणून) या ह्मणून ह्मणायला मोठं अवघड वाटतं आहे! मी किनई आपल्या वाटेकडे चातका प्रमाणें डोळे लावून बसेन, याचं इकडे स्मरण रहावं इतकंच शेवटीं हा पदर पसरून माझं मागणं आहे!! (हुंदके देत दाराची कडी काढावयास जाते व गोडाजीस घेऊन पुन्हां परत येते)

मानाजी०—लाडके, तुझ्याप्रमाणेंच मला देखील तुझा वियोग दुःसह होईल बरें!! असें काय बरें रडावें माझी बाई ती!

गोडाजी—(मानाजीस एकीकडे) धनीसाब, कटाळलो, कटाळलो पगा—भाईर उभ राहूनश्यान्! धनी-

साब आतां येत्याल–मंग येत्याल–ह्ये आलच–असं करू-नशान् इक्त्या वाटकूळ दम धरला नव्हका ! पन ह्योरं अक्शी दम निघना पगा ! आमीबी परान पिरयेची मन धरनी करतो नव्हका ! पन् धनीसाबाचा परकार समद्या जगापून बी न्याराच ! धनीसाबासनी लै ग्वाड वाटलया व्हय ! आं ! पन् आमच्या बाईसाब नंदर न्हाई पडत ! त्येसनी या चाकराची लाज वाटती व्हय ! !

मानाजी०—(गोडाजीस एकीकडे) अरे अक्कलेच्या सुडक्या ! ती तुझी धनीन तेथें उभी आहे ती तुला दिसत नाहीं होय ! ! कां तुझे डोळे फुटले आहेत ! ! !

गोडाजी—(चिमणीकडे पाहून मानाजीस एकीकडे) ती–ती–ह्यातारी ! वंगाळ आवा व्हय ! या चाकराची थटा मांडलिया न्हव धनीसाब ! !

मानाजी०—(गोडाजीस एकीकडे) अरे खरेंच तीच माझी प्राणप्रिया ! आणि तुझी धनीन ! ! तूं आज शुद्धींत नाहींस वाटतें ! अरे गाढवा, पहिल्या प्रथम मला देखील ती अशीच कुरूप दिसत होती ! पण मग जेव्हां मी तिच्याकडे निरखून पाहिलें, तेव्हां तिचें हें अलौलिक सौंदर्य हळू हळू माझ्या डोळ्यांत भरूं लागलें ! ! तूं नीट न्याहाळून तरी पहा ! कां ! कसें आहे तेज ! ! रंभेंत आणि हिच्यांत एक रतीभर तरी अंतर आहे कां ! ! ! सर्व जग हिची स्तुती करतें ते उगाच नव्हे बरें कां ! ! !

गोडाजी—(मानाजीस एकीकडे) काय ! ! समद लोक इसनी सुरूप ह्मनत्यात ! या माझ्या डोळ्यासनी तर

आपन ह्मनतासा तसं सरूप नाहीं बा हिच्यामंदी हेरत! मंग चचमा बिचमा—न्हाई तर दुब्रिन लावली तर काई न्यारं दिसलं तर नकळ बा!! पन् धनीसाब, तुमासनी भरम झालाया खास! अरे ह्ये काय भूत है ह्मनावं! कां इसनी वडारीन है ह्मनून ह्मनावं!! कां कैकाडीन ह्मनून ह्मनावं!! कां आसोलीन ह्मनून ह्मनावं!! ह्मनावं तरी काय इसनी इचिभन्!!!

मानाजी०—(त्याच्या तोंडावर हात ठेऊन त्यास एकीकडे) चिप-चिप! शहाण्याच्या कांद्या! आंखड आपली जीभ! सारे लोक मूर्ख! आणि तूं मोठा आला आहेस शहाणा!! लेका असें ह्मटलेंस तर सारे लोक तुझ्या तोंडावर थुंकतील समजलास!!

चिमणी—ह्मटलं चाकरापाशीं काय चाललं आहे इतकं हितगूज!

मानाजी०—कांहीं विशेष नाहीं! तुझें अद्वितीय लावण्य पाहून जसा क्षणभर मी दिपून गेलों होतों! तसाच तोही दिपून गेला आहे! ह्मणून सांगतो आहे तो मला आणि दुसरें काय!!

चिमणी—होय कां! काय ह्मणतो आहे तो?

मानाजी०—तुझा माझा जोडा फारच चांगला शोभतो आहे ह्मणून सांगतो आहे तो मला!!

चिमणी—बराच चावट आणि गमती आहे हो आपला चाकर! ह्याचं नांव काय?

मानाजी०—याला गोंडाजी म्हणतात.

चिमणी—होय कां? लबाडाचं नांवही तसंच गोड आहे हो! गोडाजी तुझ्या यजमानांना साजेसं आहे कां रे माझं रूप?

गोडाजी—त्यें कांई पुसून तोड न्हाई पगा! समद्या प्रीथ्मीमंदी बरमदेवानं ह्यो योकच जोडा पैदा केलाया पगा!! कां धनीसाब असंच कीं न्हाई?

मानाजी०—(मिशीवर पीळ देऊन) यांत काय संशय!! (जातां जातां चिमणीस उद्देशून) ह्मटलें येतों मी आतां!

चिमणी—(जातां जातां) मीं सांगितलं आहे त्याचं स्मरण राहूं द्यायचं हो पण!! (मानाजीराव व चिमणी एकमेकांकडे प्रेमानें पहात निघून जातात.)

गोडाजी—(मानाजीरावाचे मागून जातां जातां) आमच्या धनीसाबासारखं इचित्र पुतळ समद्या दुनियेंत हुडकलं तरी गवसन कठीन! आन् अस आकलमंद पुरुस बी लै कवचित्!! अर इचिभन् ही आवा! हीच्या थोबाडामंदी दांत तरी हैती कां समदं! मास मास गेलया झडूनशान् आन् हाड हाड उरल्याती समद्या आंगभर!! आन् डोळे पिचकूनशान् हात हात खोल गेल्यात नव्हका! केस बी कवचित् पांढरं सफूर झाल्याती!! तरी बी ह्यो मरद तिसनी रंभाच ह्मनतुया!! कां तर ह्मन जग तसं ह्मनतया ह्मनून!! आन् ह्या आवाच्या संग ह्यो बाशिंग बांधायाबी झालाया घाबरा!!! तवा आचर्य नव्ह ह्मनायचं! अशा मनुक्श्यासनी नसते सवताची बूध! आन् आमच्या सारख्या शेन्यान यासनी कांई

सांगितलं तर त्यें ह्येसनी न्हाई उमगत !! अशा चांबाराच्या देवासनी खेटरंच होवीत खेटरं ! ! थूत लेका तुझ्या जीनगानीवर ! (पडदा पडतो)

अंक ३ रा.

प्रवेश २ रा.

स्थळः—धनाजीरावाचें घर.

वेळः—दुपार.

(धनाजीरावाच्या पुढें जमाखर्चाच्या वह्यांचा रुमाल पडला आहे व शेजारीं सर्जेराव बसला आहे असा पडदा उघडतो.)

धनाजी०—पोरा, पुरे झाली तुझी त्या दौलत्याची तरफदारी ! अशा नंग्या झोटिंगाच्या गळ्यांत पोर बांधण्यापेक्षां तिला विहीरींत ढकलून दिलेली काय वाईट !!

सर्जे०—बाबा, दौलतराव आजमीतीला जरी अंमळ खालावला आहे, तरी दोन पिढ्यांपूर्वीं त्याच्या पूर्वजांनीं मिळवून ठेवलेली अलोट संपत्ती आणखी चार पिढ्यां पर्यंत पुरण्याइतकी अजून शिल्लक आहे ! !

धनाजी०—अरे खुळ्या ! दौलतरावासारख्या रंगेल, खिलाडू, छांदिष्ट आणि लहरी लोकांना कुबेराची संपत्ती पुरावयाची नाहीं ! त्या ठिकाणीं वाडवाडिलांनीं मिळवून ठेवलेली येवढीशी पुंजी त्यांच्या हातीं किती दिवस टिकणार ! ! अरे वेड्या, या विचित्र पुरींतील झाडून सारे मोडकेतोडके जहागीरदार आणि फाटकेतुटके

सरदार यांच्या दारांपुढें पांच पिढ्यां पूर्वी हत्ती झुलत होते हत्ती ! पण आज त्यांची स्थिती काय झाली आहे हें तूं पहातो आहेस ना !! हे लोक आज अन्नाला महाग झाले आहेत ! आणि पुढें लवकरच हे हातीं लोटा घेऊन आपल्याच दारापुढें अलक करीत आलेले आपण पाहूं !!!

सर्जे०—बाबा, पण या लोकांची अशी स्थिती व्हायला त्यांच्या अंगचे दुर्गुण, त्यांचा पोशाकीपणा आणि त्यांचा गैदीपणा कारण आहे ! पण दौलतरावाचा प्रकार तशांतला नाहीं ! तो बहुगुणी आहे ! तरतरीत आहे ! लोकप्रिय आहे ! निर्व्यसनी आहे ! आणि परोपकार बुद्धि आणि औदार्य हे लोकोत्तर गुण त्याचे अंगीं पूर्णपणें वास करीत आहेत ! ! !

धनाजी०—सर्ज्या, ज्या त्याच्या लोकोत्तर गुणांची तूं तारीफ करीत आहेस, तेच गुण त्याचे नाशास कारणीभूत होणार आहेत समजलास !! आणि ह्मणूनच वैभवपर्वताच्या निसरड्या उतरणीवरून खालीं ढांसळत येत असलेल्या अशा नंदीबैलांना मी माझी पोर देण्यास कधींही तयार होणार नाहीं ! ! हे असले खुळे लोक, लोक प्रियतेच्या नादीं भरून, स्वत:ला आणि अखेर आपल्या बरोबर आपल्या पोरांबाळांना भिकेस लावतात ! ! पोरा, ज्या पैशाला पैसा वीत नाहीं, तो पैसा आज किती जरी मुबलक असला, तरी अखेर तो पार नाहींसा झाल्यावांचून कधींही राहायचा नाहीं ! !

सर्जे०—दौलतरावाच्या वाडवडिलांनीं आणि खुद्द दौलतरावानेंही आपल्या साऱ्या संपत्तीचा व्यय लोककल्याणा करितांच केला असल्यामुळें, बाबा, नुसत्या दौलतरावालाच काय पण त्याच्या पोराबाळांनाही त्यांच्या महत् पुण्याईनें दारिद्र्य हें कधींच शिवणार नाहीं ! ! आणि जर कधीं असा विपरीत प्रकार घडला, तर परमेश्वराच्या न्यायीपणास मोठा बट्टा लागेल ! ! !

धनाजी०—अरे वेड्या पोरा, काय ही तुझी कोती समजूत ! परोपकाराची आणि लोककल्याणाची भलाई—ज्याला तूं पुण्याई ह्मणून ह्मणतोस—तिच्या पाठीस लागून कैक वेडे पीर अखेर कफल्लक बनून धुळीचे दिवे खात गेले आहेत समजलास ! ! पोरा, जों पर्यंत हातीं पैसा आहे तों पर्यंतच त्याला अन्न ! तों पर्यंतच त्याची किंमत ! आणि तों पर्यंतच त्याचा दिमाख ! पण एकदां कां अक्काबाईचा फेरा फिरला, ह्मणजे तोच मनुष्य भल्याचा बुरा—चांगल्याचा वाईट—शहाण्याचा पाजी—अब्रुदाराचा नादान—आणि बहुमोल किंमतीचा कवडीमोल ठरतो ! आणि अखेर जगाच्या लाथाबुक्या खाऊन या मृत्युलोकच्या भयंकर नरक यातना भोगूं लागतो ! सर्ज्या, दौलतरावाच्या अवताराची अखेर याच थरावर जाईल अशी मला मोठ्ठी भीती वाटते आहे ! काय चाटायचें आहे त्याच्या त्या खानदानीला आणि दिलदारपणाला ! त्याचा हल्लींचा रंगेलपणा, ही त्याची छानछुक, हा त्याचा डौल हीं सारीं दोनप्रहरच्या सावलीप्रमाणें अल्पकाळ टिकणारीं आहेत ! !

आणि ह्मणूनच सांगतों कीं, अशा बेताल, बे सुमार आणि बिन्अक्कल अल्लड पोराच्या स्वाधीन मी आपली पोर कधींही करणार नाहीं !!!

सर्जे०—बाबा, राग येणार नाहीं तर बोलतों ! पण तसें कशाला—आपल्याला राग आला तरी बेहेत्तर ! पण आपला हा तर्कवाद मलाच काय पण जगांतील कोणत्याही शहाण्या माणसाला संमत होणार नाहीं, असें मला आतां आपल्याला स्पष्ट सांगितलें पाहिजे !! जर साऱ्या जगाची मदार एकट्या पैशावरच असेल, तर दुनियेंतील सारे सद्गुण आणि दुर्गुण—भलाई आणि बुराई—कीर्ति आणि अपकीर्ति—पुण्य आणि पाप—सत्य आणि असत्य—चांगलें आणि वाईट—झाडून साऱ्या उच्च नीच गुणांचा भेदाभेद पार पिटाळून लावून, सारें जग धनिक आणि दरिद्री या दोनच वर्गात कोंबावें लागेल !! आणि असें झालें तर केवढा मोठा अनर्थ होईल याची कल्पना आपण केली आहे काय !! तो गांवचा धनाढ्य तेली लक्शा—तो गबर न्हावी गण्या-तो पैकेवाला चांभार पिऱ्या-तो चार मजली हवेलीवाला कुंभार जोत्या--तो जमीन जुमलेवाला महार शिरप्या—आणि गांवचा वतनदार धेड ह्मप्या हे सारे आजच आपल्या मांडीला मांडी लावून बसायला तयार होतील !! आणि उद्यां या विचित्रपुरींतले सारे लंगोटीवाले, या सर्वांना आणि त्यांच्याबरोबर तुह्मांला आह्मांलाही एका दावणीला बांधून भरदोनप्रहरीं दिवसाढवळ्या सर्वांचा एकदम शिरच्छेद करतील !!!

धनाजी०—सर्ज्या, जीभ लांब करून तूं कालचा पोर मला ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी शिकवायला लागलास काय ! तोंड फोडून टाकीन ठाऊक नाहीं अजून ! ह्मणे पैसा-पैसा-पैशाला काय करायचें आहे ! शतमूर्ख नाहीं तर ! या लग्नाच्या बाबतींत तूं आतां एक शब्द काढलास तर कारट्या तुझ्या अंगाला राख फांसून आणि तुझ्या हातांत करवंटी देऊन तुला दारोदार भीक मागायला लावीन समजलास !! मोठा आला आहे उंटावरचा शहाणा !!

सर्जे०—बाबा—

धनाजी०—थोतरींत खाशील आतां ! उठ, नीघ, हो चालता माझ्या समोरून ! (सर्जेराव निघून जातो) न्याय अन्याय–पाप पुण्य–बरें वाईट–मान अपमान–या सर्वांना एकीकडे गुंडाळून ठेवून, भल्याबुऱ्या उपायांनीं या धनाजीरावानें मिळविलेली आणि कृपणपणानें जतन करून ठेवलेली ही येवढी थोरली संपत्ती, हा कपाळकरंटा कारटा सर्जा, माझ्या मागें पार नाहींशी करून टाकील यांत बिलकूल शंका नाहीं !! अरे, कसली घेऊन बसला आहेस कीर्ति आणि अपकीर्ति ! अरे दौलत हीच कीर्ति आणि कंगालपणा हीच अपकीर्ति !! जगांतील छपन्न हजार गुणांची उत्पति या लक्ष्मीच्या पोटीं ! निजायला मऊ गादी–खायला सुग्रास अन्न–अंगावर घालायला रत्नजडीत अलंकार आणि मौल्यवान उंचीं वस्त्रें–सेवेला नोकर चाकर–गमतीला इष्टमित्र आणि सोबतीला आप्तवर्ग या साऱ्यांची पैदाज संपत्ती हातांत असली

तरच ! ! आणि ती ज्याच्या जवळ नाहीं त्याला हेंच जग बाबा कवडीमोल आणि निर्माल्य समजतें ! ज्याला जगाची पर्वा नाहीं अशांची गोष्ट वेगळी ! पण ज्यांना या जगांत राहायचें आहे आणि जगाशीं व्यवहार करायचा आहे त्याला बाबा पैशाचीच सोबत लागते ! ! हाच मानाजी पहाना-(मानाजी प्रवेश करतो त्याचेकडे वळून) यावें यावें मानाजीराव-आपल्याला पूर्ण शंभर वर्षं आयुष्य आहे बोवा ! तुमची आतांच आठवण केली होती ! या-असे या. कसें काय ? पोर काय ह्मणते !

मानाजी०—मामासाहेब, आपण ह्मणालांत त्यांतला एकही प्रकार माझ्या दृष्टीस पडला नाहीं !

धनाजी०—ह्मणजे !

मानाजी०—आपण ह्मणालांत तसा हट्टवादीपणा-तशी तिरसटवृत्ती-तसें दांडगें वर्तन-तसा मानी स्वभाव आणि तशी रागीट मुद्रा यांपैकीं एकही गोष्ट मला दिसली नाहीं ! !

धनाजी०—असें काय ! !

मानाजी०—अहो, तिचें बसणें किती अदबीचें ! बोलणें किती मिठ्ठास ! चालणें किती थाटाचें ! हांसणें किती लजतदार ! मामासाहेब, तुह्मांला काय सांगूं आमची भावी कारभारीण इतकी मोहक आहे कीं मनाला चटकाच लागून जातो ! ! आणि आदरातिथ्यांत तिनें आज जसा प्रेमळपणा दाखविला तसा प्रेमळपणा साऱ्या जन्मांत या मानाजीरावानें आज पहिल्यानेंच पाहिला ! ! !

धनाजी॰—मानाजीराव, खरोखरच माझी तारा जशी रूपानें तशीच गुणांनींही अद्वितीय आहे ! अशी गोड पोर या साऱ्या विचित्रपुरींत तुह्मांला एक एक सांपडायची नाहीं!!

मानाजी॰—मामासाहेब, लाख गोष्टींतली एक गोष्ट बोललांत ! ! रूपाचें नांव काढलेंत ह्मणून ह्मणतों कीं खरोखरच ती तशीच अद्वितीय आहे !!! अहो अशी वधू या विचित्रपुरींतच काय पण मी ह्मणतों साऱ्या दुनियेंत देखील सांपडणें कठीण !!

धनाजी॰—अहो यांत काय शंका ! ! मी खात्रीनें सांगतों कीं तुह्माला तर तिनें दिपविलेंच असेल !!!

मानाजी॰—किती दिपविलेन् ह्मणून सांगूं !! मी तर आश्चर्यानें इतका थक्क झालों कीं थोडा वेळ माझी मलाच भ्रांत पडली !!! मामासाहेब, तें अद्वितीय लावण्य माझ्या डोळ्यांसमोर मला अजून दिसत आहे !!!

धनाजी॰—आणि तिचा तो सडसडीत बांधा तर तुमच्या डोळ्यांत खुप भरला असेल नाहीं ? तुह्माला वधू ह्मटली ह्मणजे अशीच सडसडीत पाहिजे !!

मानाजी॰—त्याचें नाहीं मला इतकें कौतुक वाटलें! कारण नाहीं समजलांत ? अहो तिच्या वयाच्या स्त्रियांच्या शरीराची काठी अशीच सडसडीत असते !!!

धनाजी॰—कसें बोललात बरें ! आणि ती तोंडावरची कांति ?

मानाजी०—तिच्या वयाला अगदीं बरोबर साजणारी !!

धनाजी०—आणि ते काळेभोर डोळे ?

मानाजी०—(धनाजीरावाच्या डोळ्याकडे बोट दाखवून) अगदीं हे असेच ! मात्र यांत काजळ घातलें नाहीं आणि त्यांत घातलें आहे इतकाच फरक !!

धनाजी०—आणि तें सरळ नाक ?

मानाजी०—मामासाहेब, तें तर अगदीं ठसठशीत !!

धनाजी०—आणि गाल ?

मानाजी०—तुम्ही ह्मणालांत तसे खळग्या पडलेले !!

धनाजी०—आणि ते गोंडस हात ?

मानाजी०—(धनाजीरावाच्या हाताकडें बोट दाखवून) अगदीं हे असेच !!

धनाजी०—मानाजीराव, तुमच्या सारख्या राजबिंड्याला माझी तारा अगदीं योग्य वधू आहे ! काळेभोर केस–तरतरीत नाक–भव्य कपाळ–पाणीदार डोळे–कमानदार भुवया–वाटोळें तोंड–सडपातळ बांधा–गोंडस हातपाय–आणि गौर वर्ण तात्पर्य मानाजीराव माझी तारा ह्मणजे प्रतिरंभा आहे !!

मानाजी०—आणि तिला दुसरी उपमा आमच्या मातोश्रीची !! मामासाहेब, खरोखरच आज वीस वर्षांनीं आमच्या मातोश्रींचें आह्मांला पुन्हां दर्शन झालें !!

धनाजी०—हं ! आमची विहीण अगदीं अशीच

होती म्हणतां ! पण शंका कसची ! ! तुमचें हें रूपच त्याची साक्ष पटवीत आहे ! ! !

मानाजी०—पण मामासाहेब, हें लग्न तुम्ही अगदीं निरूपायानेंच इतक्या लांबणीवर ढकललें असेल! नाहीं बरें?

धनाजी०—मानाजीराव, तें कांहीं विचारूं नका ! अहो, पोरीला आजपर्यंत नाहीं नाहीं म्हटलें तरी जवळ जवळ पांचशें पर्यंत मागण्या आल्या असतील ! ! पण मानाजीराव, त्यापैकीं तिच्या जोगा असा एकही वर माझ्या मनांत भरेना ! ! !

मानाजी०—तें खरें ! पण कुवारपणची शोभा कांहीं निराळीच असते ! !

धनाजी०—झाली आहे पोर अंमळ मोठी खरी ! पण मानाजीराव, मला तर असें वाटतें कीं माझ्या तारीचें हल्लींचें वय लग्नाला अगदीं योग्य आहे ! ! बरें तें असो, पण माझी तारा आहेना तुह्मांला पसंत ? तुमच्या आणि तिच्या वयांत फरकही कांहीं फारसा नाहीं !

मानाजी०—मामासाहेब, मी आणि ती बहुतेक जवळ जवळ—

धनाजी०—वीस वर्षांच्या अंतरानें आहांत !

मानाजी०—काय ! वीस वर्षांचें अंतर ! ! मामासाहेब, मी चाळीशीच्या घरांत आलों आहे आतां ! !

धनाजी०—आणि ह्मणूनच ह्मटलें, तिची विशी आणि तुमची चाळीशी ! ! जोडा पण जोडा दिसेल तुमचा ! ! !

मानाजी०—काय ! मामासाहेब ! ताराबाईना वीसावें वर्ष आहे ह्मणतां !!

धनाजी०—ह्मणजे ! तुह्मांला आश्चर्य वाटलें कीं काय ! ! पोर अंमळ उफाड्याची आहे इतकेंच ! ! !

मानाजी०—आणि इतक्या वयांत मुलीचे पांढरे केस ! आपण तर बोवा आजच पाहिले ! !

धनाजी०—काय ! पांढरे केस !! चळ भरला कीं काय तुह्मांला ! ! तिचे ते तुळतुळीत केस मधून मधून असेच चमकतात ! त्याला तुह्मी पांढरे ह्मणता कीं काय !

मानाजी०—मला ते पांढरे दिसले खरे ! शिवाय विशींत इतकें खप्पड तोंड ! ! कोण कबूल करील !

धनाजी०—काय खप्पड तोंड ! ! ही काय आतां माझी थट्टा चालविली आहे वाटतें ?

मानाजी०—मामासाहेब, खरेंच सांगतों तिच्या तोंडावरून तर तिची तिशी खास उलटली आहे असें दिसतें ! ! शिवाय खोल गाल ! पोटाला वळकट्या ! तोंडावर सुरकुत्या ! पिचपिचीत डोळे ! नाकाचा वासा ! मामासाहेब, हीं सारीं लक्षणें उतार वयाशिवाय कधींच दिसायचीं नाहींत ! ! !

धनाजी०—मानाजीराव, पुरे झाली आतां ही असली थट्टा ! पण पोर तुह्मांला वळली कीं नाहीं ?

मानाजी०—मामासाहेब, मी मातोश्री ह्मणून साष्टांग नमस्कार घालून परत आलों नाहीं इतकेंच ! बाकी

खरें पुसाल तर इतक्या उतार वयाच्या बाईशीं लग्न लावायचें ह्मटलें ह्मणजे–

धनाजी०—मानाजीराव, हा काय पोर खेळ मांडला आहांत तुह्मी आतां !

मानाजी०—मामा साहेब, यांत थट्टेचा आणि पोर खेळाचा प्रकार मुळींच नाहीं ! खरा प्रकार असा आहे ! मग तुह्मांला राग येवो कीं लोभ येवो ! आडून बोलण्यापेक्षां तोंडावर रोख ठोक बोलणें मला फार आवडतें !

धनाजी०—तर मग तुमचें म्हणणें ती थेर्डी आहे म्हणून !

मानाजी०—म्हणणें कसचें ! मामासाहेब, ती आहेच वयानें उतार !

धनाजी०—आणि कुरूपही आहे म्हणतां! अहो शहाणे, तिला हात–पाय–नाक–डोळे–कान हीं तरी आहेत कां सारीं तुमच्या दृष्टीनें !

मानाजी०—अवयव सारे आहेत !

धनाजी०—मग कमी काय आहे तिच्यांत ?

मानाजी०—अहो, मी आतांच सांगितलें ना ! ती पोक्त आहे, कळकट आहे आणि हिडीस आहे म्हणून ! ! चांगलें काय आहे म्हणून विचाराल तर फक्त नट्टापट्टा!!!

धनाजी०—मानाजीराव, तुमच्यासारखे बैलोबा तुह्मींच ! तुह्मी मोठे चाणाक्ष आणि मोठे अक्कलवान् ह्मणून आजवर तुमची मी तारीफ करीत होतों ! पण तुह्मांला आतां गाजरपारखेच ह्मटलें पाहिजे ! ! उठा आतां येथून,

आणि धरा आपला रस्ता! तुमच्याशीं वितंडवाद घालून मूर्खाबरोबर मूर्ख होण्यांत शोभा काय!!

मानाजी०—मामासाहेब, तुमच्या करितां वाटेल तर ह्मणतों मी कीं तुमची पोर वयानें लहान आणि रूपानेंही सुरेख आहे ह्मणून! पण तुह्माला ठाऊक आहे का? तिनें सुद्धां हें कबूल केलें! आणि असें सांगितलें कीं माझ्या बापाच्या जाचानें माझी अशी अवस्था झाली आहे ह्मणून!!

धनाजी०—काय माझ्या जाचानें तिच्या केसाच्या बटा पांढऱ्या पडल्या ह्मणून ती म्हणाली!!

मानाजी०—होय! आाणि झोंप नाहीं म्हणून तोंड निस्तेज दिसतें असेंही तिनें सांगितलें!!

धनाजी०—आणि खायला अन्न नाहीं म्हणून तोंड खप्पड दिसतें असेंही तिनें सांगितलें असेल नाहीं बरें!!

मानाजी०—होय ती असेंच म्हणाली आणि—

धनाजी०—आतां तुमचें तोंड बंद राहील तरच त्यांत तुमची शोभा राहील!! नाहीं तर—

मानाजी०—पण मामासाहेब, तुम्हाला तसें वाटतें आणि मला ती अशी दिसते! यांत कांहीं मोठें नवल नाहीं!! कारण आईबापांची दृष्टि निराळी! आणि जगाची दृष्टि निराळी! गाढवाचें पोर गाढवाला सुद्धां प्रिय असतें!!

धनाजी०—मान्या! लेका, मला गाढव म्हणतोस काय! तुझा बाप गाढव! हरामखोरा—माझी थट्टा करतोस काय! जीभ कापून हातावर देईन ठाऊक नाहीं अजून!!

मानाजी०—मामासाहेब, आपण वृद्ध आहांत!!

धनाजी०—आणि म्हणूनच तूं मला असें उणें उत्तर बोलतोस काय ? ही तुझी तारुण्याची घमेंड एका क्षणांत उतरून टाकीन ठाऊक नाहीं अजून ! अरे ? कोण आहे रे तिकडे ? तो सर्जा आहे कां तेथें ? त्याला म्हणावें शेणाचे दिवे घेऊन ओंवाळ या बैलोबाच्या तोंडावरून !! पाजी नाहीं तर ! निघतो आहेस कीं नाहीं येथून ? कां देऊं (काठी उगारून) याचा एक रट्टा पाठीवर ठेवून ! (रुमाल सोडूं लागतो.)

माना०–(एकीकडे) शिकविलेली अक्कल आणि बांधलेली शिदोरी कधींही जयाला जात नाहीं ह्याचें हें प्रत्यंतर! व्यर्थ ! व्यर्थ मी त्या पढत मुर्ख गोडाजीच्या नादीं लागलों! आणि त्याच्या म्हणण्यावर विश्वास ठेवून लोकमता विरुद्ध चांगल्याचें वाईट ठरविण्याच्या भानगडींत पडलों ! आतां ही तर माझ्या नरड्याशीं लागण्याची वेळ आली आहे !! हा चवताळलेला वृद्ध कपी कांहीं तरी युक्ति लढवून या वेळेस शांत केलाच पाहिजे ! नाहीं तर हा हातचा डाव गेलाच म्हणून समजा !! याला शांत करण्या करितां आतां गोडीगुलाबीनेंच घेतलें पाहिजे ! आणि इतकेंही करून जर जुळलें नाहीं तर याच्या पांयावर डोकें ठेवायला सुद्धां मागें पुढें पहातां उपयोगी नाहीं !

(सर्जेराव प्रवेश करतो.)

सर्जे०—बाबा, काय आहे भानगड ?

धनाजी०—अरे हा गाढव, तारी चाळीस वर्षांची थेरडी ! आणि रूपानें कुरूप आहे म्हणून म्हणतो !!

सर्जे०—बाबा, ह्या मूर्खोबाला मीं कधींच ओळखून ठेविलें आहे ! तुम्हीं मात्र याला आतां ओळखलेंत ! (मानाजीरावास) अहो फाकडे ! तुमच्या अक्कलेचे आज फारसे तारे तुटूं लागले आहेत ! !

धनाजी०—(पत्रिका पुढें करून) ही पहा ! तुम्हांला डोळे असतील तर ही पहा तिची पत्रिका ! !

मानाजी०—(पत्रिका पाहून) पंधरा आणि आज पसतीस ! मामासाहेब, हिच्यावरून तर तिला विसावें वर्ष नुकतेंच लागलेंसें दिसतें ! !

धनाजी०—मग चाळीशीचा सुमार आहे म्हणून तोंड विचकून आणि दाताड काढून बोललांत तें काय ! !

मानाजी०—नाहीं–समजूतींत चूक झाली इतकेंच! !

सर्जे०—मोठे समजूतदार ! अक्कलेचे खंदक ! !

मानाजी०—मामासाहेब, वयाबद्दल म्हणून आतां बोलायला जागा उरली नाहीं ! !

सर्जे०—बाबा, अशा मूर्खाची समजूत पाडण्याच्या नादीं लागण्यांत काय अर्थ आहे ! !

मानाजी०—सर्जेराव–मामासाहेब, या मानाजीं-रावाचें विनोदी भाषण आपण खरें समजलांत कीं काय? होय, मला असेंच वाटतें ! खरें ना पण ?

धनाजी०—काय हो तुमचा हा लोचटपणा ! अब्रू, माणूसकी किंवा मोठेपणा यातलें कांहीं तरी आहे कीं नाहीं तुम्हांला ! !

सर्जे०—बाबा, अशा लोकांची खेटरांनींच पूजा केली पाहिजे!!

मानाजी०—सर्जेराव, हा पदर पसरला आहे तुमच्या पुढें! आणि मामा साहेब, हा कान केला आहे आपल्या पुढें!! आतां तुम्ही मला पदरांत घेतलेंच पाहिजे!

धनाजी०—(शांत होऊन) मानाजीराव, व्यर्थ शोभा करून घेतलीत आपली! आम्हां वृद्ध माणसांना विनोद आवडतो खरा, पण तो करणाऱ्याच्या अंगीं काळ वेळेचें तारतम्य लागतें!! बरें असो. (सर्जेरावाकडे पाहून) मग काय मुहूर्त अगदीं अलिकडचाच धरला पाहिजे नाहीं? (सर्जेरावाच्या कपाळास आठ्यापडलेल्या पाहून) कां! पडल्याना तुझ्या कपाळाला आठ्या! हं, चढवा-चढवा तें नाक एकदां वरती!! तुम्हां तरुण बांडांशीं हुजत घालतां घालतां थकला हा जीव अगदीं थकून गेला!! मानाजीराव, हा कार्टा तुमचाच सख्खा भाऊ! पण जाऊं दे! पोरीची तयारी आहे ना तुम्हांला माळ घालायला!!

मानाजी०—बहुतेक होकारच आहे! पण (विचार केल्या सारखें करून) हे मोठमोठे कल्ले आणि या तोंडांत शिरणाऱ्या लांब लांब मिशा-हो आणि या जाड भिवया यांचीच थोडी छाटाछाट करायची राहिली

आहे ! ! तिच्या मतानें हीं सारीं अंमळ बेडौल आहेत !!! ह्यांच्यांत दुरुस्ती करून आपल्या परवानगीनें जातों एकदां पुन्हां तिच्या दर्शनाला ! कीं मग लग्न तिथीच ठरवायची राहिली बाकी ! !

धनाजी॰—पोर पण पोर आहे ! सर्ज्या, नाहीं तर तुझी अक्कल ! ! बोकडा सारखा चरतो आहेस झालें ! मानाजीराव, खरेंच पोर म्हणते तशी ही तुमची केशसमृद्धी थोडी बेडौल तर आहे खरीच ! ! अहो अशा गोष्टी तरुण पोरींना आवडायच्या कठीण ! ! ! पण आजचें हें कृत्य उद्यांवर ढकलून, मानाजीराव, मागून पस्तावाल बरें कां ! अशीं कामें कशीं ताबडतोब आणि झटपट झालीं पाहिजेत ! !

मानाजी॰—छे ! पण मलाच कुठला धीर निघायला ! संध्याकाळच्या आंत येतों पहा येथें आपल्याला आनंदाची बातमी सांगायला ! !

धनाजी॰—(उठतां उठतां) सर्जा, पुढच्या दिवाणखान्यांत बैठक घातली आहे तिकडे चल मानाजीरावांना घेऊन. मानाजीराव मी हा आलोंच तिकडे. थोडें साखरपाणी आणि मागून पान सुपारी अत्तर गुलाब घेऊन चलायचें बरें कां ! (पडदा पडतो)

अंक ३ रा समाप्त.

अंक ४ था.

प्रवेश १ ला.

स्थळः—मानाजीरावाचें घर.

वेळः—तिसराप्रहर दिवस.

(गोडाजी प्रवेश करतो.)

गोडाजी—एकाद्या पक्शावानी ही समदी इचित्रपुरी भीर-भीर-भीर-भीर-फिरुनशान् पालथी उलथी केली न्हव का! पन दवलतरावाचा पत्या म्हून न्हाई! गंमत हें इचिभन गंमत!! दांत हैती तर चनं न्हाईत, आन् चनं हैती तर दांत न्हाईत!! ही पीरती! हिनं आमाला बी घेरलं व्हतं! आन् तवा आंगामंदी ताप काय फनानुन भरला व्हता! डोळ काय इंगळावानी लाल झाल व्हत! शीर काय ठनकत व्हत! दारू पेल्यावानी सूद काय गेली व्हती! अनाची काय वकारी बसली व्हती! अक्शी ही पीरती हांजी दिसर येडच पगा!! जातचं मानूस पन् इच्यापायीं अक्शी ढोरावानी व्हऊन जातया!! हैरान! व्हतया हैरान! आन् आमच्या कारभारनीची तराबी आमावानीच झाली व्हती न्हव का! न्हवता तिसनी कनचा कामधंदा सुचत! न्हवता तिचा रातीचा डोळा लागत! भरम झाल्यावानी व्हती काय बरळत! साऱ्या इळभर बसली व्हती काय दारामंदी टेहळत! कुनी काय पुसलं तर त्येच्या तोंडाकड व्हती काय पगत! आन् हांगत व्हती न्हाई येच्यांत माझा

परिनाम दिसत ! पन् जवा का या मरदाची आन् तिची गांठ पल्डी, तवा समदं येड एका खिनांत गेलं पगा ! !

तारा—(प्रवेश करून) गोंडाजी, भेटले कां तुला ते ? आणि तुझे धनी कुठ आहेत ?

गोंडाजी—दवलतराव इचारतासा व्हय ! न्हाई-न्हाई—बाईसाब ! आन् आमचं धनीसाब, माझ्या वानींच पायपिटी करत्यात नव्हका ! त्यंची धांदल तर लै वंगाळ पगा ! दुडकी चालीवर चालत्यात अक्शी दुडकी चालीवर ! ! बाईसाब, या धांदलींमंदी आज मातुर आली व्हती आमच्या धनीसाबाच्या परानावर पाळी ! ! त्यंचं डोचकं है कुठं ठिकानावर ! मोतीचवकांतून जवा कां सवारी झपाट्यानं निघाली, तवा ह्मोरं आली एक गाडी आडवी—आन् गाडीचा बैल ह्यंचं त्ये लळीतांतल्या मानसावानी स्वोंग पगूनशान् आल्डा ! आन् मंग जवा बिचकला तवा त्यो चौपायीं उल्डा ! त्येच्या पायीं गाडीचा दांडा मोल्डा ! गाडीवान खालती पल्डा ! मी ह्मोर होऊन बैल सोल्डा ! आन् तवा धनीसाबाचा जीव भांड्यामंदी पल्डा ! ! आमच्या धनीसाबासनी असं झालया कीं कवा एकदां दवलतराव गवसत्याती ! ! !

तारा—खरंच कां हें ! परमेश्वरानं आज बाई मोठीच खैर केली ह्मणायची ! तुझ्या धन्याचे किनई माझ्यावर मोठे उपकार होत आहेत हो ! परमेश्वर उदंड आयुष्य देईल बरं त्यांना ! !

गोंडाजी—बाईसाब, आमचं धनी पन् धनी हैती !

परुपकार करन्याला त्ये समद्याच्या ह्मोर! आन् अकले मंदी बी लै तरतरीत!! अक्शी बिरस्पती पगा बिरस्पती!!!

तारा—ते तसेच आहेत हो दृष्ट पडण्या सारखे! आणि ह्मणूनच ते मोती चौकांतले धनाजीराव, आपली मुलगी तारा, त्यांना द्यायला तयार झाले आहेत!! तूं पाहिली आहेस कां रे तुझी धनीन?

गोडाजी—बाईसाब, त्या कामांत आमचं धनीसाब डोळं असून शान् आंधळ झाल्यात पगा आंधळ! इक्त शेहन पन् पैक्यापायीं अक्शी खुळ झाल्यात खुळ! मी ह्मनतो सरूप राहिलं! पन उमर! त्येचा तर इचार व्हावा कीं न्हाई बाईसाब!! लै लाज वाटतीया पगा सांगाया, कीं आमची धनीन, या माझ्या शिनेची हाय पगा!! आन् अक्शी भुतावानी दिसतीया पगा भुतावानी!!!

तारा—तूं आहेस आपला थट्टेखोर आणि ह्मणून त्या तारेला कांहीं तरी नांव ठेवतो आहेस झालं! वाईट कां रे आहे ती? अगदीं माझ्या सारखीच आहे.!

गोडाजी—मंग काय मी आंधळा व्हय! काय बाईसाब! आमची धनीन तुमचं बटकूर शोभल पगा बटकूर!! (लांब पाहिलेसें करून) पन् त्ये पगा! आमचं धनी दवलतरावासनी ह्मोरं घालूनशान् बिगी बिगी हकडच येत्यात!! दिसल कां तुमासनी? त्ये आडव झाल! पगितल कां?

तारा—खरंच! गोडाजी ते तुझेच धनी! आणि त्यांच्या बरोबर दुसरे—ते तेच आहेत! आतां किनई

मी पलीकडल्या चौकांत जाऊन बसतें बरं कां! ते आले ह्मणजे त्यांना तिकडेच पाठवून द्यायला सांग बरं का आपल्या धन्याला! सांगशील ना? तुझं गुऱ्हाळ सुरूं झालं ह्मणजे तुला मागचं पुढचं कांहीं स्मरण रहात नाहीं ह्मणून विचारत्यें! धरशील ना माझं स्मरण?

गोडाजी—जी व्हय! अक्शी सुमरन धरून सांगतो कीं त्यासनी!

(तारा जाते व दौलतराव आणि मानाजी प्रवेश करतात)

दौलत०—मानाजीराव, तुह्मी वाटेल तें ह्मणा, आणि मला वाटेल तें सांगा, पण या कामांत तुह्मी चुकत आहांत असेंच मला ह्मटलें पाहिजे! उदाजीरावाची गजरा, तिचें माझ्यावर प्रेम जडलें आहे ह्मणून घरांतून निघाली! आणि तिनें तुह्मांला मला घेऊन यायला सांगितलें! या गोष्टींवर माझा विश्वास कालत्रयींही बसणार नाहीं!! मला फसविण्या करितां तुह्मीं ही कांहीं तरी शक्कल काढली आहांत! नाहीं तर निदान तुह्मांला भ्रम तरी झाला आहे हें खास!!

गोडाजी—ह्मसोबाच्यान! अक्शी खरं बोलत्यात पगा आमचं धनीसाब!!

मानाजी०—दौलतराव, या मानाजीरावानें आज पर्यंत कधीं कोणाला फसविलें नाहीं! आणि तशांत तुमच्यासारख्या स्नेहां बरोबर तर माझें वर्तन नेहमीं सरळ आणि अत्यंत प्रेमाचें असतें!! आज सकाळ पासून या

पायाची जी येवढी पायपिटी केली ती, दौलतराव केवळ तुमच्याच जिवाकरितां समजलांत ! !

गोडाजी—आन् म्या बी या पायाची आज लै लै चाकरी केलिया पगा ! आन् ह्येची बक्शीसी ह्मनून मला मुंडासं होवं मुंडासं ! आन् आमच्या कारभारनिसनी तकड होवी काळी चंदरकळा आन् योक जरी काठी खन् !

दौलत०—मानाजीराव, तुमचे मजवर मोठे उपकार आहेत ! आणि गोडाजी, तूं ही खरोखर आज फार दगदग केलीस ! पण मानाजीराव, ज्या स्त्रीवर माझें प्रेम नाहीं, अशी एखादी स्त्री–ती ह्मणते आहे ह्मणून माझ्या गळ्यांत बळेंच बांधणें, हा असला आपला लोभ माझ्या वाट्याला न येईल तर बरा ! !

मानाजी०—दौलतराव, दैव देतें आणि कर्म नेतें ! त्यांतली गत आहे तुमची ! ! अहो ही असली परी, आपण होऊन तुह्मांला माळ घालायला तयार असतां, तुह्मीं प्रेम नाहीं ह्मणून पिछेहाट खाणें तुमच्या बाणेदारपणाला बिलकुल शोभत नाहीं ! !

दौलत०—मानाजीराव, गजरा पोर तर मोठी गोड खरीच ! पण तिच्या ह्मणण्याला मान देऊन, दोस्त सर्जेरावाशीं दगा करणें, आपल्याला बिलकुल कबूल नाहीं !! पण मला तर असें वाटतें कीं तुमच्या समजूतींत कांहीं तरी चूक आहे हेंच खचित ! नाहीं तर कदाचित् सर्जेरावाचा शोध मजकडून काढवावा ह्मणून बोलाविलें असेल तिनें मला ! !

गोडाजी—न्हव! न्हव!! धनीसाब, देवाच्यान् तुमच्याच पायीं त्या झुरत्यात पगा! आन् सरजेरावाचं नांव त्येनी येकदाबी घेतलं न्हाई! आन् मंग मी म्हनतो त्येचा इचार आपनासनी कशा पायीं व्हावा! त्येचं पराक्तन् त्येच्या बरूबर! आन् धन्याचं पराक्तन् धन्याच्या बरूबर!!!

मानाजी०—दौलतराव, तुम्हीं माझी वेड्यांत गणना करता काय! किंवा हें असलें ओढून चंद्रबळ आणून माझी गम्मत पहातां!! अहो, तिचे पंचप्राण तुमच्यावर लटकले आहेत—असें तिनें एकदां नाहीं, दोनदां नाहीं, पन्नास वेळां निक्षून सांगितलें समजलांत!!

दौलत०—मानाजीराव, हें ऐकून मला खरोखर आश्चर्य वाटत आहे!!

गोडाजी—धनीसाबानी आचर्य आचर्य म्हनून लै लै वढून आनलया! मनामंदी इचार चाललाया योक! आन् भाईर दावायचा दिसराच!!

मानाजी०—दौलतराव, हे येवढे आढेवेढे आपण कशा करितां घेत आहांत तें आलें आहे माझ्या ध्यानांत! सांगूंच कां कशा करितां ते? आपल्याला राग तर नाहीं ना यायचा!!

दौलत०—मानाजीराव, काय ही भलतीच शंका! खुशाल, खुशाल बोला तुमच्या मनांत काय आलें असेल तें!!

मानाजी०—ती—ती—मोतीचौकांतल्या त्या धना-

जीरावाची पोर! तिकडे गुंतला असेल आपला जीव!! होय असेंच!! होय ना?

गोडाजी—व्हय! व्हय!! धनीसाब, माझ्या होऱ्या मंदीबी ह्यंच येतया पगा!!

दौलत०—छे-छे-तुमच्याच गळ्या शपथ—

मानाजी०—तुह्मीं कबूल करा किंवा करूं नका! पण तिच्या लोभानें तुमच्या घरांत आपण होऊन चालत येत असलेल्या या लक्ष्मीला जर तुह्मीं पाठ दाखवित असलां, तर शेवटीं तुह्मीं दोहोंनाही मुकून त्रिशंकूसारखे मध्येंच लोंबत राहाल एवढेंच माझें सांगणें आहे!! कारण त्या तारेचें दुसरें कोठेंसें जमल्याचें मीं आतांच ऐकलें आहे! आणि तो वृद्धकपी धनाजी मोठा हट्टी आहे! तो ह्मणेल तसें केल्याशिवाय कध्धीं कध्धीं सोडायचा नाहीं!! ह्मणून ह्मणतों, पुढें वाढून आलें आहे तें पदरांत घेऊन व्हा मोकळे कसे!! नाहीं तर तेल जाईल तूप जाईल आणि अखेर धुपाटणें मात्र हातीं येईल!!

गोडाजी—अन् धनीसाब ह्मनत्यात त्यें अक्शी खरं पगा! त्ये धनाजीराव तसच हैती!! एकदां कां त्येनी केला निश्चव कीं बरमदेवाच्या बाचं बी त्येंच्या म्होरं चालायचं कठीन!! (मानाजीरावाकडे डोळे मिचकावून) आन ह्ये पगा, त्या धनाजीरावाची पोर जशी सुरूप है न्हाई, तसा त्येनी पगितलेला जावई बी अक्शी फाकडा है!! धनीसाब, त्येची बरुबरी यासनी व्हतीया व्हय! त्येचा झोक बी न्यारा! त्येची अकल बी न्यारी!

आन् त्येचा रुबाव बी न्यारा!! अक्शी जनू आमच धनीसाबाच दिसर!!! धनीसाब, असंच कीं न्हाई!!! ह्मना कीं व्हय!

मानाजी०—दौलतराव, हा गोडाजी ह्मणतो आहे त्याप्रमाणें जावई बोवा तर आहेतच फक्कड! पण शिवाय त्या पोरीच्याही मनांत ते चांगलेच भरले आहेत!! होय कीं नाहीं गोडाजी? (गोडाजी मानेनें खरें आहे ह्मणून सुचवितो) तें कांहीं असो ह्मणा, पण तिच्या नादानें तुह्मी गजरेला हातची गमावणें यांत मला तरी निदान कांहीं शहाणपणा आहे असें वाटत नाहीं!!

दौलत०—पण, मानाजीराव, असें करणें अजून कांहीं माझ्या मनाला प्रशस्त वाटत नाहीं!

मानाजी०—काय खुळेपणा हो हा तुमचा! कसलें घेऊन बसलां आहांत मन! आणि तें प्रशस्त वाटणें!! आपल्या मतलबाशीं गांठ ठेविल्याशिवाय जगांत चालायचें नाहीं दौलतराव! काय ह्मणावें तुमच्या या भित्रेपणाला!!

गोडाजी—धनीसाब, ह्यंच्याशी असा वाद खेळून शान् परिनाम लागनं कठीन्! गजरा बाईचा त्यो केतकीवानी गोरापान वर्न! आन् त्ये रंभेवानी सरूप! आन् त्ये हरनावानी डोळ! आन् त्ये ग्वाड भासन! हीं कां एकदां धनीसाबानी पगीतलीं कीं लोन्यावानी जात्याल इरघळून!! आन् गुळावानी गुळचट गोष्टी सांगत्याल!!! तुह्मीं आहांत कनूच्या नादामंदी! ह्मनून ह्मनतो त्येंची आन् ह्येंची येकदां दिरिष्टा दिरिष्ट तर व्हऊद्यां! मंग आपुनच पगू

कसा उडतुया रंग त्यो !! उगाच मगापून ह्ये असं होनं कठीन ! तसं करनं न्हाई सोभत ! आन् ह्येंच धोरन असल असं ! आन् त्येचा परीनाम व्हईल तसा ! असं चाललया हकडे ! आन तकड तर गजराबाई ह्येंच्या वाटकडं डोळे लावून गेल्यांत अक्शी कटाळून !!

मानाजी०—खरेंच दौलतराव, आतां उगीच उशीर कां ? गोंडाजी, जा यांना घेऊन त्या पलीकडल्या चौकांत ! आणि गजराबाईची आणि ह्यांची एकदां गांठ तर घालून दे खरी !!

गोंडाजी—व्हय–व्हय–व्हय–त्ये काम माझं ! धनीसाब चला माझ्या ह्योरं !

दौलत०—मानाजीराव, तुमच्या आग्रहास्तव वाटेल तर भेटतों मी तिला ! पण खरेंच सांगतों कीं अखेर त्या बाईला निराश होऊन आपला रस्ता सुधारावा लागेल ह्मणून मला मोठें वाईट वाटतें !! मानाजीराव, तुह्मी मला मोठ्या पेचांत आणलें आहे ! होय ह्मणावें तरी पंचाईत ! आणि नाहीं म्हणावें तरी पंचाईत ! खाल्लें तर बाधेल आणि टाकलें तर श्रापेल, अशांतला होऊं पहातो आहे हा प्रकार !!!

मानाजी०—दौलतराव, खरोखरच जर तुह्मांला इतकें संकट वाटत असलें तर, गोंडाजी, हो पुढें आणि त्या बाईना जाऊन सांग कीं दौलतरावांना तुमची बिलकुल पर्वा नाहीं ह्मणून !!

गोंडाजी—धनीसाब, ह्यो असला इचार लै लै वं-

गाळ पगा ! हातामंदी तवलार घेऊनशान् परान घेनं बरं! पन येकाद्या अस्तुरीचं असं मन मोडनं लै लै मोठं पाप हे पगा ! ! त्या आवानं जर ह्यो परकार कानांनीं ऐकला तर तिचे परान तवाच ताडकन निघून जात्याल पगा ! ! धनीसाब, ह्यो दील ! ह्येची मातबरी अक्शी नेरी रहातीया ! !

मानाजी०—दौलतराव, गोडाजी चाकरमाणूस असून याला यांतलें रहस्य जितकें समजत आहे तितकेंही तुमच्या ध्यानांत येईना ! तेव्हां शर्थ झाली बोवा आतां तुमच्या पुढें ! ! सर्जेरावाला दूर लोटून तिनें तुह्मांला जवळ केलें तर ह्यांत दोष तुमचा कीं त्या बाईचा ? मी तर ह्मणतों याचा सारा बोल सर्जेरावाच्या दुर्दैवाकडे ! आणि असें जर आहे तर केवळ मित्रप्रेमाच्या नादीं भरून सर्जेरावाकरतां तुह्मीं तिचा आशाभंग करणें ह्मणजे हा गोडाजी ह्मणत आहे त्याप्रमाणें तिला या दुनियेंतून पार केल्याचें पाप तुह्मीं होऊन आपल्या पदरीं बांधून घेणें होय ! असें मी एकटाच नाहीं, तर जगांतले सारे शहाणे लोक असेंच ह्मणतील ! !

गोडाजी—धनीसाब, द्या आतां समदा इचार सोडून ! आन् चला माझ्या मागं !

दौलत०—मानाजीराव, तुह्मीं मित्रप्रेमानें आणि परोपकारबुद्धीनें इतकी दगदग केलीत त्याचें चीज मीं तिची गांठ घेतल्याशिवाय जर होत नसेल तर हा मी तयार आहे तुमच्या मर्जी प्रमाणें वागायला !

गोडाजी—आन् मी बी त्येंच ह्मनतो हाय न्हवका ! असं–असं–हकडून यावं धनीसाव ! हत जुमीन हाये वाईच खालवर पन ह्मोर है अक्शी सपाट !! जरा जुपूनच चलावं धनीसाव !!! (गोडाजी आणि दौलतराव जातात.)

मानाजी०—(ते गेले असें पाहून) यंव् ! खूप केलीत मानाजीराव यावेळेस तुह्मीं ! त्या दौलत्याचा कांटा न खुपतां आणि न दुखतां उपटून टाकायला बिनतोड युक्ती ह्मटली ह्मणजे हीच ! यावेळेस गोडाजी सारखा रानवट बाप्या बरोबर असल्यामुळें दौलत्या नाक मुरडून परत येईल अशी भीति बाळगण्याचें कारणच उरलें नाहीं! कारण तो आडमुठ्ठा गजरेला रंभा ह्मणेल ! आणि तो खुळा दौलत्या आचरटपणानें त्याचीच री ओढून आनंदानें नाचूं लागेल ! ! असे वेडे पीर एके ठिकाणी जमल्यावर ते काकाचा हंस तेव्हांच बनवितात ! दौलत्या ! धनाजीरावाच्या पोरीवर तुझा डोळा आं ! लेका ब्रह्मदेवानें ती परी याच बहाद्दराकरितां निर्माण केली आहे हें तुला ठाऊक नाहीं वाटतें ! अहाहा ! आमच्या भावी कारभारणीची ती मनोहर मूर्ती नेत्रांपुढें उभी राहिली ह्मणजे मी जणूं इंद्रलोकांतच आहे कीं काय असें मला वाटूं लागतें ! वाहवा रे तिचा वर्ण ! आणि तिचा नाजुकपणा ! ! आजपर्यंत पांचशें नवरदेवांनीं तिच्या प्राप्तीकरितां उद्योग केला आं ! पण यांत आश्चर्य कसलें ! ती तशीच लावण्यखनी आहे ! (गोडाजी प्रवेश करतो.)

गोडाजी—धनीसाब, आतां लै लै गंमत व्हईल पगा ! मी दौलतरावासनी जवा कां न्येलं त्या आवाच्या म्होरं, तवा ती आवा तोंडावरचा पदूर वाईच मागं सारून श्यान् असं असं लागली पगाया ! आन् तवा त्यो मरद अक्शी थंडगार झाला पगा ! ! त्यो कांहीं बोलबी ना, हालबी ना, आन् डोचकं बी वर करीना ! ! अक्शी सुंध झाल्यावानी तिच्या म्होर सवस्थ उभा राहिला पगा ! !

मानाजी०—असें काय ! गोडाजी आपल्याला दिसेल काय रे त्यांची ती गंमत !

गोडाजी—आन् मी बी त्येंच म्हनतूया न्हव का ! धनीसाब, वाईच सरका हकड ! हथं–हथं–उभ राहून श्यान् टाका त्येंच्यावर नदर ! पगितलं कां तकडं ? त्ये त्ये पगा तुमच दोस्त कसं गोंधळून गेल्यात ! अक्शी येड्यावानी टेहळत्यात त्या आवासनी ! ! धनीसाबासनी दिसतं है कीं न्हाई ? त्यो त्यो पगा त्या आवानं तोंडावरचा समदा पदूर दिलाया लोटून दूर ! !

मानाजी०—गोडाजी खरेंच ! आणि तिचे ओंठही हालत आहेत ! ! मला वाटतें ती कांहीं बोलते आहे त्याच्याशीं !

गोडाजी—व्हय ! व्हय !! कुजबूजत्यात-कुजबूजत्यात ! ! पन धनीसाब, पगीतल कां ? आतां तर तुमच दोस्त पोट धरधरून हंसत्यात ! !

मानाजी०—अरे ! दौलत्याची वृत्ति तर आतां अगदींच पालटली ! ! हा तर अगदींच लटपटून गेला ! ! ते

त्याचे आढेवेढे, तें कसेसेंच वाटणें, आणि मित्राबद्दलचें तें लटकें प्रेम, हीं सारीं आतां एकीकडेच राहिलीं ह्मणायचीं !!!

गोडाजी—धनीसाब, काय घेऊन बसलांत त्येनं मारलेल्या शेनपनाच्या गप्पा ! आतां कसचं व्हतया त्येसनी सरजेरावाचं सुमरन! आन त्येचं आतां राहिलया तरी कुठं कारन !! धनीसाब, पगितल कां? त्या आवानं आनूलया डोळ्यासनी पानी आन् ह्मनतीया जनू तुह्मीच व्हाव माझ धनी ! ! धनीसाब, ही चिकाटी सुटाया लै बिकट ! आन ह्यो मारा समद्या माऱ्यापूनबी लै परखर ! !

मानाजी॰—आणि गोडाजी, बोलतांना हे हाताचे रे कसले चाळे चालले आहेत तिचे !

गोडाजी—त्यो हात-आतां तिनं लांब केलाया त्यो व्हय ! धनीसाब, त्यो दाऊनशान् ती घेतीया सरजेरावाचं नांव ! आन मान वोवाळून सांगतीया माझं न्हाई त्येच्यावर पिरेम !!

मानाजी॰—आणि आतां गळ्यावर रे कशाला हात ठेविला आहे तिनें ! कांहीं डागीने मागते आहे वाटतें त्या दौलत्याजवळ !!

गोडाजी—नव्ह ! नव्ह ! ती त्यासनी ह्मनतीया, जर आपून झाला न्हाई माझं पती, तर ही मान कापूनशान लाईन कराया ह्मंते मौती ! !

मानाजी०—असें काय ! तरीच बरें कां तो दौलत्या आतां तिच्या हातावर हात मारून मी तुला अंतर देणार नाहीं असें सांगतो आहे तिला ! ! ही गजरेची घोरपड त्याच्या गळ्यांत अडकून देऊन त्याला माझ्या वाटेआड करायची ही अजब युक्ती पडली कीं नाहीं अगदीं सोळा आणे लागू !! हें बघ-या वेळेला तूं याबद्दल माझी पाठच थोपटली पाहिजेस !! थोपट ! थोपटतोस कीं नाहीं अजून ! (गोडाजी त्याची पाठ थोपटतो) ब्रह्मदेवानें हें डोकें या खांद्यावर उगीच नाहीं ठेवलें समजलास !

गोडाजी—धनीसाब, त्ये इचारूं नका पगा ! त्या कामांत आपली समद्यावरबी तान !! गोळी ह्मंजे अक्शी बिनचुक ! ! ! पन धनीसाब, ह्यो परकार आवरूसतवर हथं असंच उभ राहायचं व्हय ! तुमी तर तकडच डोळ लावलया ! न्हाई फिटली अजून मनाची हौस व्हय ? काय धनीसाब ! नहान पोरावानी राहिलासा पघत उभं !! आन इचिभन सुचत है तरी कसं ह्यं पघनं !! (पडद्यांत "सरकार" "सरकार" "अहो धनी" अशा हांका ऐकूं येतात) आं ! कोन आलाया ह्यो दोडावानी आमच्या धनीसाबाचं ऐन वक्ती नरडं धराया ! ! अशा मनुक्शासनी तथल्या तथच गाडनं होव पगा धनीसाब ! ! !

मानाजी०—ए गध्या, पुढें होऊन पहा तर खरें कोण आलें आहे तें ! येथूनच काय चालविली आहेस वटवट ! पक्का अडाणी आहेस तूं ! !

गोडाजी—(एकीकडे) मी अडानी ! आन धनीसाव लै आकलवान !! लै शेन !! जनू मोत्याचं दानं !!!

मानाजी०—ऐकलेंस कीं नाहीं मीं काय सांगितलें तें ? कां पटलें नाहीं वाटतें माझें सांगणें !

गोडाजी—धनीसाव, त्ये नग मला सांगाया ! तुह्मी मातुर संभाळा ! न्हाई तर लागाल एकाद्या येड्यावानी भकाया ! आणि त्यो दवलतराव तुमासनी एकलच पगूनशान लागल बदा–बदा–बदकाया !! त्यो मरद न्हाई आतां सुधीत ! धनीसाब हैती लै पटाईत ह्मना ! पन वाइच लागतीया त्येसनी शिकवाया कवाईत !! इक्तच ! (गोडाजी निघून जातो व दौलतराव आणि तारा प्रवेश करतात.)

दौलत०—मानाजीराव, खुप मौज उडवून दिलीत आज तुह्मीं ! अहो, धनाजीरावानीं आपल्या पोरी करितां निश्चित केलेले नवरदेव आपणच आहांत ! ह्मणून जर मला मघाशींच सरळपणानें सांगितलें असतेंत तर मी कांहीं तुह्मांला आडवा आलों नसतों !! सरळ गोष्टीसाठीं केवढा अट्टाहास केलांत हा तुह्मीं !! आणि जीवाचें इतकें रान तरी कशाला करून घेतलेंत !! धन्य आहे बोवा तुमची !

मानाजी०—माझी धन्य आहे ह्मणण्यापेक्षां दौलतराव खरोखर तुह्मांलाच रामराम केला पाहिजे !! अहो, तुह्मी प्रथम केवढ्या लांब लांब बाता मारल्यात ! ही गोष्ट मी कधीं कबूल करणार नाहीं ह्मणून नाक चढवून किती वेळां तोऱ्यानें बोललांत ! सर्जेरावाशीं दगा, गोष्ट बोलूं

नका, अरे किती वेळां ह्मणालांत ! आणि कानांत तुळशीपत्र घालून केवढ्या ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगितल्यात! पण अखेर तुमचें तें सारें ब्रह्मज्ञान, तें शहाणपण आणि तें तुमचें लटकें मित्रप्रेम हीं सारीं राहिलीं कीं नाहीं जागच्या जागीं !!

दौलत०—मानाजीराव, खरोखर सांगूं कां, मला तुमची आणि तुमच्याबरोबर हिची कींव आली समजलांत ! त्या धनाजीरावाच्या पोरीचें आणि तुमचें लग्न व्हायचें कायमचें ठरलें आहे, अशाबद्दल हिनें माझी खात्री करून दिल्यावर मग नसत्या भानगडींत पडून, तुमच्या सारख्या प्रेमळ मित्राचें जन्माचें वैर साधणें आपल्याला नाहीं बरें वाटलें ! आणि शिवाय हिलाही झिटकारून हिला मृत्युच्या द्वारीं उभें करणें हेंही मला प्रशस्त वाटलें नाहीं !! नाहीं तर तुमचा हा लपंडाव मीं चालूं दिला नसता बरें का मानाजीराव !!!

तारा—पण हें काय हें ! यानीं किनई इकडेच कशाला, माझ्यावर देखील मोठ्ठे उपकार केले आहेत हो आज ! अशीं सरळ आणि परोपकारीं माणसं या त्रिभुवनांत फारच थोडीं सांपडतील आपल्याला !!

मानाजी०—कसं बोललात बरें आतां ! दौलतराव, हाच जर माझ्या ठिकाणीं आज तुमचा कोणी दुसरा मित्र असता, तर तो तुमच्या इतका उपयोगीं पडला असता काय ! सांगा पाहूं ?

दौलत०—नाहीं ! मानाजीराव, त्या बद्दल तुमची पाठच थोपटली पाहिजे आज !

मानाजी०—दौलतराव, नुसती पाठ थोपटूनच नाहीं हें काम भागण्यासारखें बरें कां ! अहो, ह्या मध्यस्ती-बद्दल आमची कांहीं तरी समजूत केली पाहिजे तुह्मांला ! समजलांत !

दौलत०—तुह्मीं इतका शीण करून आमच्या हातीं आणून दिलेलें हें असलें रत्न तुमच्याकरितां आह्मीं पत-करलें ! याहून तुमची जास्त समजूत काय करायची बोवा आम्हीं !! कां प्रिये असेंच कीं नाहीं !

तारा—कां बरें ! नाहीं हो, करूं बरं याबद्दल आह्मीं तुमची चांगली समजूत !! आणि ताराबाई देखील कित्ती कित्ती सुरेख आहेत म्हणून सांगूं ! आमच्यासारखीं शंभर माणसं त्यांच्यावरून ओंवाळून टाकलीं तरी त्यांची दृष्ट निघायची नाहीं ! त्यांचा आणि यांचा जोडा-जोडा पण कसा अगदीं चांगला शोभेल हो ! ! जशीं पाठचीं ब-हीण भावंडं रुपानं अगदीं एकसारखीं असतात ! तसंच नाहीं कां यांचं आणि ताराबाईचं रूप !! दोघं अगदीं एकसारखीं आहेत !!

मानाजी०—यांत काय संशय ! शोभतेच आहे ती माझी वडील बहीण !!

तारा—आणि खेरीज ताराबाई किनई आमच्या सारख्या कांहीं पोश्या आणि वेंधळ्या नाहींत हो ! अगदीं यांच्या सारखंच इकडलं जग तिकडे आणि तिकडलं जग

इकडे करण्याचा आहे त्यांच्या अंगीं पराक्रम !! शहाण्या किती आहेत ! आंगांत कामाची हौस किती भरली आहे! त्यांचा बेत किती ठाकठीक आहे ! त्यांना कुठं ठेवूं आणि कुठं न ठेवूं असं होऊन जाईल यांना ! !

मानाजी०—दौलतराव, तिच्या रूपाबद्दल आणि सुगरणपणाबद्दल माझी खात्री झालीच आहे ह्मणा ! पण आमच्या उभयतांमध्यें वयाचें अंतर जरा—

दौलत०—कां बरें ! तुह्मीं उभयतांही आमच्याप्रमाणेंच समवयस्क आहांत !

तारा—नुसतं वयानंच कां ! गुणानं—रुपानं—सर्व बाजुनं—फार कशाला अकलेनं सुद्धां ताराबाई अगदीं यांच्याच तोलाच्या आहेत बरं ! !

दौलत०—आणि मानाजीराव, शिवाय तुह्मांला धनाजीरावाकडून जांवईपणाच्या मानपानाबद्दल रक्कम मिळेल ती वेगळीच ! आमच्या इकडे मात्र तें सगळें कानांत ! ! कां प्रिये, ह्मटलें होईल कां कांहीं त्याची सोय ?

तारा—माझ्या हातांत कुठं आहे बाई इकडे द्यायला पैका ! मजजवळचं धन ह्मटलं ह्मणजे माझा हा देह आणि हे माझे प्राण ! ! हें माझं धन मीं नाहीं कां इकडे मोठ्या प्रेमानं अर्पण केलं ! ! मौल्यवान आणि सुंदरशा शेल्या पागोट्याचा अहेर रुप्याच्या ताटांत घालून तें ताट इकडल्या हातांत द्यायचं सामर्थ्य जरी माझ्या अंगीं नाहीं, तरी त्याच्या ऐवजीं इकडल्या वरच्या माझ्या प्रेमाची ठेव ठेवलेली ही अंत:करणरूप पेटी, नाहीं कां

मीं इकडल्या हवालीं केली !! मग याहून दुसरा मोठा आहेर तो कोणता हावा आहे इकडे !

मानाजी०—दौलतराव, खरोखर धन्य आहांत बोवा तुह्मीं ! तुमचें परस्परांवरील हें निस्सीम प्रेम पाहून तुमच्याच गळ्याशपथ मला अत्यानंद होतो आहे !! खरोखर सांगतों, तुमच्यासारखा दैववान आणि सुखी पुरुष आजपर्यंत माझ्या पाहण्यांत आला नाहीं !!

दौलत०—मानाजीराव, तुमचें हें उपरोधिक भाषण मला कळत नाहीं असें नाहीं ! पण हिच्या जीवाकरितां घेतलें आहे मीं हें असलें ध्यान गोड मानून पदरांत !! आणि हिनें मला अर्पण केलेलें हें गुप्त धन यावरच आहे माझी तृप्ति !!! पण मानाजीराव, तुह्मीं मात्र खरोखरच धन्य आहांत! कोणीकडे आमची ही नुस्ती नाकाडोळ्याची बाहुली! आणि कोणीकडे तुमची ती इंद्रलोकची रंभा !! अहो तुमचा थाटच निराळा !! तुह्मी आतां काय साखरेंतून दुधांत आणि दुधांतून साखरेंत लोळणारे ! तुमच्या लग्न सोहळ्यांत मारे तुम्हांला मेजवान्या काय झडतील ! देणग्या काय मिळतील ! आहेराचे तुमच्यापुढें ढीग काय पडतील! नाच-रंग–बैठकी किती उडतील! आतषबाजी केवढी होईल! खरोखर मानाजीराव, तुम्हीं म्हणजे धनाजीरावाला एक परीस सांपडला आहांत बोवा परीस !! तुमचें कौतुक करतां करतां म्हातारा थकून जाईल अगदीं !!

मानाजी०—दौलतराव, तुह्मीं ह्मणतां हा रंग उडेल खरा ! पण एक मोठी तर आहे हो मध्यें !!

दौलत०—ती कोणती बोवा !

मानाजी०—अहो, आमच्या कारभारणीनें कांहीं विलक्षणच हट्ट धरला आहे !

दौलत०–ह्मणजे ! इतक्यांतच लागला कीं काय तुमच्यामागें तिचा हट्ट !!

तारा—ऐकावें तें बाई एक एक नवलच ! ह्मणजे ! असा कोणता मेला धरला आहेन तिनं हट्ट !!

मानाजी०–दौलतराव, तुम्हीं आणि मी झालों आहों आतां जीवश्च कंठश्च मित्र ! कां खरें कीं नाहीं ? तेव्हां तुमच्याजवळ मन मोकळें करून बोलायला आतां कांहीं चोरी नाहीं म्हणा ! पण खरेंच दौलतराव ती म्हणते असें जर मीं केलें ! तर तुम्हीं आतां जो रंग उडेल म्हणून म्हणालांत त्याचा साराच बेरंग होऊन जाईल !!

दौलत०—काय ती म्हणते आहे तरी काय ! !

मानाजी०–त्या थेड्यानें तिला कोंडून ठेविली आहे! तिचें तो तोंड पहात नाहीं ! त्यानें तिचा छळ मांडला आहे ! हें आहेच सारें तुम्हांला माहीत ! खरोखर दौलतराव या त्याच्या छळणूकीनें तिचें रूप आणि कांति इतकीं पालटलीं आहेत कीं तिला जर आतां तुमच्यापुढें आणून उभी केली तर तुम्हीं देखील तिला ओळखणार नाहीं ! गोडाजी तर तिला ती थेर्डीच आहे म्हणून म्हणायला लागला !! तुम्हांला काय सांगू दौलतराव इतकी सुरेख पोर पण त्या बैलोबानें तिला अगदीं हिडीस करून टाकली आहे हो !

दौलत०—अरेरे! खरेंच कीं काय!! ऐकलेंस कां हे मानाजीराव काय म्हणत आहेत तें!!

तारा—खरंच, ताराबाई किनई आताशं अशाच वाईट दिसायला लागल्या आहेत हो! पण उद्यां त्या सासरीं जाऊन सुखांत पडल्या किनई म्हणजे पुन्हां पहिल्याप्रमाणें नक्षत्रा सारख्या दिसायला लागतील!!

मानाजी०—आणि दौलतराव शिवाय तिचा स्वभावही मोठा मानी आहे हो!!

दौलत०–मानाजीराव, बायका तेवढ्या साऱ्या अशाच मानी असतात! आणि त्यांचा हा देहस्वभाव सर्वत्र असाच आढळतो! अहो नाकावर माशी बसलेली यांना नाहीं खपायची! आमच्याही वांट्याला आली आहे त्याची थोडीशी झुळूक!!

तारा—इश्श! इतक्यांतच नको कांहीं बायकांच्या जातीला नांव ठेवायला! पुरुष कांहीं कमीच असतील मानी!! कुणी एवढंसं उणं उत्तर बोललं तर लगेच डोक्यांत राख घालून आकाश पाताळ एक करून टाकतात!!! अनुभव आहे म्हणून बरं आहे!

मानाजी०–दौलतराव, त्या थेडर्यानें पसंत केलेल्या वराबरोबर मी लग्नाला उभी राहायची नाहीं असा तिनें धरला आहे हट्ट!

तारा—खरंच की काय!

दौलत०—पण मानाजीराव तुम्हीं आहांत दोन्हीं पक्षांच्या पसंतीचे नवरदेव! कां खरं कीं नाहीं? मग तिचा हा हट्ट तुम्हांला बाधक होणारा नाहीं!!

तारा—होय ना! तर मग हें सगळं उजूच आहे!

मानाजी०—आणि ह्मणूनच उडाली आहे माझी तारांबळ! इकडे धनाजीरावाला आहे हौस ह्या लग्नसोहाळा मोठ्या थाटानें करायचा! आणि तिकडे तिच्या डोक्यांत भरलें आहे वेड कीं हा सगळा कारभार गुपचुप उरकून घ्यायचा!!

तारा—नवलच बाई! ही कसली मेली जळ्ळी हौस!

दौलत०—मग! मानाजीराव यावर तुह्मीं कांहीं तरी बिनतोड शक्कल काढलीच असेल! तुमच्या अक्कलेपुढें शुक्रनीति आणि चाणक्यनीति अगदीं फिक्क्या ह्मणून ह्मणतों!!

मानाजी०—अहो, हा मानाजी, आजन्मप्रभृती संपादन केलेली आपली अब्रू कोठली जाऊं द्यायला! यावर असा रामबाण तोडगा तयार केला आहे कीं ज्याचें नांव तें! पण ह्मटलें तुमच्या डोक्यांतून काय निघते आहे युक्ति ती ऐकावी एकदां कानांनीं!! कां? चालतें आहे कां कांहीं तुमचें येथें डोकें?

दौलत०—तुमच्याच गळ्याशपथ, मानाजीराव, असल्या कामांत आमच्यासारखीं नेभळीं माणसें कुचकामाची!!

मानाजी०—वाटलेंच होतें मला हें! अशीं कामें पार पाडायला, दौलतराव, हे असेच छटेल पुरुष लागतात!! अहो, यावर वस्ताद तोडगा ह्मटला ह्मणजे तिला घरांतून पळवून—

दौलत०—काय पळवून न्यायची! बोलणें सोपें आहे मानाजीराव! पण तुह्मांला खरेंच सांगतों या कामांत तुह्मांला यश मिळणें मोठें कठीण दिसतें आहे बोवा मला!!

तारा—पाहिलं ना? याला ह्मणतात खरं प्रेम!! अंतःकरणाला असा पीळ पडला तरच त्या प्रेमाचं चीज! हे बाळगताहेत कां कांहीं जगाची पर्वा! आणि आहे कां यांना कांहीं स्वतःच्या जीवाची भीती! नाहीं तर मघाशीं कित्ती आढे वेढे घेणं चाललं होतं! आर्जव करतां करतां आणि समजूत पाडतां पाडतां माझं तोंड कसं अगदीं दुखून आलं बाई!!

मानाजी०—अहो, हे गृहस्थ पहिल्यानें तुमची भेटच घेण्याचें नाकारीत होते! यांना होती कोठें तुमची गरज!! त्या माझ्या नोकराला आणि मला यांची मोट बांधतां बांधतां पुरे पुरेसें झालें!!

तारा—होयना! कां खरंच कां नव्हतं मनांतून माझी गांठ घ्यायची?

दौलत०—लाडके यांचं काय ऐकतेस तूं! मानाजीराव, प्रथम मीं तुमची क्षणभर मौज केली आणि दुसरें काय!!

मानाजी०—आणि हें माझ्या लक्षांत आलें नसेल ह्मणून तुह्मांला वाटलें होय? अहो आह्मीं उडत्या पाखरांचीं पिसें किती, हें चटदिशी मोजून सांगणारे!! आमच्यापुढें तुमचें सोंग किती वेळ टिकणार!!

दौलत०—मानाजीराव, तें जाऊं द्या हो! पण आतां

तुह्मीं हा पुढचा वार कसा उडवून देतां हेंच पाहायचें आहे मला !

मानाजी॰—पहा तर खरें तें काम हा मानाजीराव कसें शिताफीनें पार पाडतो तें ! ! आज ऐन करकरीत तिनसांजा आमच्या नाटकांतील शेवटच्या अंकाचा पडदा वर करून अशी गम्मत उडवून देतों कीं ज्याचें नांव तें ! परमेश्वरानें या डोक्यांत सांठवून ठेवलेल्या अलौकिक बुद्धि चातुर्यानें जर मीं हें सारें जग थक्क करून टाकलें नाहीं, तर मग आमच्या सारखे पुतळे जन्माला येऊन काय उपयोग ! ! आमचें लग्न थाटानें लागलें असतां झडणाऱ्या मेजवान्या वर मेजवान्या, आह्मांला मिळणारे आहेरावर आहेर—आणि देणग्यावर देणग्या—या साऱ्यांची दाम दुप्पट भरपाई करून घेतल्या शिवाय हा मानाजी सोडणार आहे ह्मणतां ! उद्यांच तुह्मीं पहाल कीं ते थेर्डे गर्दभराज वेडे पिसे होऊन या विचित्रपुरींत आळोआळीं आणि गल्लोगल्लीं उकीरडे फुंकीत फिरायला लागतील ! ! आणि हाच मानाजी ती त्यांची धिंड त्यांच्याच मोती चौकांतल्या उंच गच्चीवर बसून मोठ्या डौलानें डोळे भरून पहात राहील ! !

दौलत॰—मानाजीराव खरोखर तुह्मीं ह्मणत आहांत अशी मौज जर तुह्मीं उडवून दिलीत तर तुह्मांला पाहण्याकरितां या विचित्रपुरींत एक मोठी जत्राच जमेल ! !

तारा—आणि मग ताराबाईना केवढा मोठ्ठा मान

चढेल ! ओळखायच्या देखील नाहींत हो आह्मांला ! !

(गोडाजी प्रवेश करतो)

गोडाजी—धनीसाब ! आवरा-आवरा कीं बिगी बिगी ! म्होरल्या चौकामंदी अक्शी तोबा उडालाया पगा ! त्ये सनईवाल-त्ये चौघडवाल-त्ये पालखीवाल-आन् त्ये खनवाल-त्ये फुलवाल-आन् त्यो सोनार-आन् त्यो शिपी-आन् त्यो वानी-अक्शी पुसून तोंड न्हाई पगा ! ! संमद संमद आल्याती, धनीसाबासनी भेटन्यापायीं ! ती मानिकचौकांतली नाईकीन ! ती बी बसलीया कीं वाटकूळ येऊन शान ! म्या हलकच तिच्या कानाप तोंड लावून शान् पुसलं कीं काय घेशील ह्मनून ! तर धनीसाब दावतीया दोन बोट ! दोन ! !

मानाजी०—दौलतराव, आतां मात्र मला तुमचा निरोप घेतलाच पाहिजे ! या साऱ्यांना वाटेला लावतां लावतां माझीं हाडें खिळखिळीं होतील अगदीं ! ! ही लग्नाची तयारी ह्मटली ह्मणजे मोठा बखेडा असतो बोवा ! पैसा ह्मणजे नुसता पाण्यासारखा ओतावा लागतो ! ! !

दौलत०—मानाजीराव, तुमचा खोळंबा मी आतां करीत नाहीं ! ह्या गोडाजीला आमच्यापाशीं ठेवून द्या, ह्मणजे आमची व्यवस्था लावून घेऊं आह्मीं !

मानाजी०—याला तर मी ठेवतोंच आहे तुमच्या तैनातीला ! पण गजराबाई, तुमच्या लग्न सोहळ्यांत माझें स्मरण राहूं द्या हो ! तुह्मांला आहेरा साठीं असें लुगडें आणि असा खण शोधून काढतों आणि तुमच्या

गळ्यांत घालण्या करितां असा ठसठशीत डागिना तयार करवितों कीं तुह्मांला माझी जन्माची ओळख राहावी !! पण त्याची वाच्यता आतां कशाला हवी ह्मणा ! दिसेलच तुह्मांला त्या वेळेस मी काय करीन तें ! दौलतराव येऊं तर मी आतां ?

गोडाजी—आन् मी ? त्यो समदा घोळ धनीसाबासनी एकल्यासनी आवरल व्हय ! त्येसनी हाडं, हाडं, हाडं, हाडं म्हनतां म्हनतां धनीसाबाचा घाम घाम निघल अक्शी !! टाक ढिल व्हत्याल ढिल !!!

मानाजी०—हें खरें आहे बोवा ! मग दौलतराव—

दौलत०—मानाजीराव, तुम्हीं नका आपली अडचण करून घेऊं ! मी आणि ही होतों आतां आम्हीं आमच्या घराकडे ! कां प्रिये तिकडेच चलायचें ना आपल्याला आतां ?

तारा—मग माझी ना कधीं आहे ! ही मी निघालें पाठोपाठ !! (उभयतां निघून जातात)

मानाजी०—कां ! बनविला आहे कीं नाहीं याला गाजीचा पाजी !! जा लेका आतां तिच्या मागें तुला वाटेल तिकडे ! हें सारें जग मोकळें आहे तुला आतां !! गोडाजी, चल हो पुढें ! (गोडाजी निघून जातो) या साऱ्यांच्या हातावर वाटाण्याच्या अक्षता देऊन यांना लाविलें पाहिजे वाटेला !! हं ! लेकाचे माझा थाटमाट पाहून आले आहेत मोठ्या आशेनें मला लुबाडायला ! मूर्ख बेटे !! या मानाजीरावाच्या हांतून तुह्मीं आलांत

हो पैसे काढायला ? तुमचेच खिसे कातरून तुम्हांला रडत बसायला लावणारा हा मानाजी ह्याला तुम्हीं ओळखिलें नाहीं वाटतें ! मारे गोड गोड भाषणाची गर्दी उडवून देऊन पहा तर खरें मी साऱ्यांचा कसा लावतो एका पाव घटकेंत निकाल तो ! धनाजीरावाची पोर म्हणते आहे त्या प्रमाणें गुपचुपीचा कारभार उरकून घेण्याचें सोडून देऊन हा मानाजी, हें लग्न थाटाचें करतो होय पदराला खार लावून घेऊन !! नांव कशाला घेतां त्याचें ! मूर्ख बेटे !!! (पडदा पडतो.)

अंक ४ था.

प्रवेश २ रा.

स्थळः—रस्ता.

वेळः—तिसराप्रहर दिवस.

(सर्जेराव व सटव्या बोलत बोलत प्रवेश करतात.)

सर्जे०—सटव्या, तिची कांहींच बातमी लागत नाहीं ह्मणतोस, तेव्हां मोठेंच आश्चर्य आहे बोवा !

सटव्या—ह्मसोबाचान् धनीसाब, आकल कशी अक्शी गुंग झालीया पगा ! उदाजीरावाच्या घरांतून गजराबाई भाहीर पल्डयाती ह्येच्यामंदी अक्शी सोशय न्हाई पगा ! आन् संमद लोक बी असंच बोलत्याती ! त्येच्या चाकुर मानसांनीं ही समदी इचित्रपुरी पालथी उल्थी केली नव्हका ! पन् धनीसाब पत्यो ह्मनून न्हाई !

सर्जे०—सटव्या काय करूं रे ! अंगाची कशी अगदी आग आग होते आहे !! तिला आतां शोधावी तरी कोठें ? ती या विचित्रपुरीच्या बाहेर गेली असेल असें मला अजून वाटत नाहीं !!

सटव्या—धनीसाब, म्याबी मनामंदी सवतासनी ह्योच परस्न इचारतुया, कीं सटव्या ल्येका, बाईसाब कां इचित्रपुरीच्या भाहीर गेल्याती व्हय ! धनीसाब कुनीं असंबी ह्मंगत्यात कीं तिनं आपल्या पायीं घेतला गळफांस लावूनशान् आन् गेली देवाच्या घरीं ! कुनीं दवलतरावासंग झाली पसार असं बी कुजबुजत्यात !! पन् निर्नव ह्मनून न्हाई ! धनीसाब ह्ये कोडं है पगा कोडं ! उमगाया लै लै बिकट ! गोंदूळ उडतूया गोंदूळ !!

सर्जे०—चोरा, तिनें गळ्याला फांस लावून घेतला ! नाहीं तर दौलतरावाचा हात धरून निघून गेली ! असें खोटेंच सांगून मला चिडवितोस काय ? तुला जीवंत राहायचें आहे कीं जायचें आहे तिच्या मागोमाग देवाच्या घरीं !!

सटव्या—धनीसाब, म्या तसं न्हाई ह्मतलं ! संमद लोक तसं बोलत्यात ह्मनून हा सटव्या तसं ह्मनेल व्हय !!

सर्जे०—चल चालता हो लेका येथून ! तिची कांहीं तरी खरी बातमी आणल्या खेरीज मला तोंड दाखविलेंस तर खबरदार ! हरामखोर ! बसून खातो आहे काकाची मत्ता !!

सटव्या—पग ल्येका सटव्या ! तुझं पराक्तन कसं है

त्ये! घे ल्येका मुस्कुटामंदी भडकावून शान्! आन् पीळ ल्येका करकचून कान!! ल्येका धनीसाब ढोरावानी वढत्यात जवा तवा! ह्येची वाटतीया कीं न्हाई तुसनी काईबी दरद! घे ल्येका चिमटा आन् धर आतां सूध! (निघून जातो.)

सर्जे०—काय करावें! या गजरेच्या पायीं वेड लागायची वेळ आली! तोंड मोठें गोजिरवाणें! पण कसब अस्सल चोराचें!!

(मानाजीराव आपल्याशींच पुटपुटत प्रवेश करतो)

मानाजी०—(आपली स्वतःची पाठ थोपटून घेऊन) शाबास गबरू मानाजीराव! बसा आतां खुशाल मौज मारीत! तारा तुमची आतां खास ठरलीच म्हणून समजा! आतां अगोदर एखादें भटुरडें गांठून, लग्न उरकून घेण्याची तजवीज पाहिली पाहिजे! त्या दौलत्याला पण कसा हां–हां–म्हणतां चकवला! घे लेका गजरा! आणि बस लेका तिला जन्मभर कुरवाळीत!!

सर्जे०—(मानाजीरावाच्या पाठीवर थाप मारून) मानाजीराव, तें गजरेचें काय! काय बरें म्हणत होता तुम्हीं आतां आपल्याशींच?

मानाजी०—(मागें वळून) राम राम सर्जेराव! तुम्हीं आतां आमचे मेव्हणे बरें कां! पण राव हें नातें तुम्हांला आहे ना कबूल?

सर्जे०—तें राहूं द्या हो! पण गजरेचें काय तें बोला अगोदर!

मानाजी०—गजरेचें होय! अहो आज सकाळीं

आमची स्वारी तुरुंगावरून जात असतां आम्हांला एक चटक चांदणी भेटली ! तूं कोण म्हणून आम्हीं तिला जरा ऐटीनें आणि थोडें दरडावून विचारतांच, मी उदाजीरावाची मुलगी, माझें नांव गजरा, असें तिनें आह्मांला सांगितलें ! ! आणि हूं काय ! लागली कीं ती आमच्या मागें ! !

सर्जे०—बरें मग ?

मानाजी०—मग काय ! केली तिनें एकदम लगट ! हूं काय ! माझें मन या विचित्रपुरींतील एका रंगेलानें चोरून नेलें आहे ! त्याला धुंडण्याकरितां बापाला न विचारतां मी घरांतून पळून आलें आहे ! असें अर्ध्या बोबड्या शब्दांनीं आणि जीभ चावीत लागली मला सांगायला ! !

सर्जे०—अहाहा ! मानाजीराव तिनें खरेंच कां असें सांगितलें ?

मानाजी०—खरेंच ह्मणजे ! असें ह्मणून लागली कीं ती आमच्या तोंडाकडे (डोळा फिरवून) असें पाहायला ! मी घरांतून निघून आलें हें तिकडे माहीत नाहीं—इतकेंच नाहीं तर हें त्यांच्या स्वप्नांत सुद्धां येणार नाहीं ! या बद्दल ते मजवर रागावतील कीं काय कोण जाणें! कदाचित् मला झिटकारतील देखील ! अशा लाघवी शब्दांची तिनें अगदीं गर्दी उडवून दिली ! आणि लागली नथ उडवायला ! सर्जेराव मी तर बोवा अगदीं चकित् झालों ! आणि मनांत ह्मटलें न जाणों तिच्याशीं

फार वेळ बोलत उभें राहिल्यानें कदाचित् नसतेंच विघ्न उत्पन्न व्हायचें !!

सर्जे०—तर मग आज तुझ्यावरचें मोठेंच विघ्न टळलें ह्मणायचें ! बरें मग ?

मानाजी०—मग काय लागली मला गळ घालायला ! आणि माझी आणि तिकडली भेट करून द्या असें ह्मणून लागली पटा पटा पायां पडायला ! सर्जेराव तुला काय सांगूं ! गजरा पोर ह्मणजे एक परी आहे बोवा परी ! असें रत्न हजारांत नव्हे तर लाखांत सांपडणें कठीण !!

सर्जे०–(मानाजीरावाच्या हाताला धरून त्याला ओढीत) मानाजीराव चला–चला–चला तर मग ! आतां एक क्षण सुद्धां फुकट जाऊं देतां उपयोगी नाहीं ! चला–

मानाजी०—(मागें ओढ घेऊन) ह्मणजे ! सर्जेराव चाललांत कोणीकडे ! आणि मला चला ह्मणता कोणीकडे !

सर्जे०—याहूनही अधिक प्रिय ऐकायचें राहिलें आहे कीं काय अजून !

मानाजी०—सर्जेराव, अहो सगळी गंमत तर पुढेंच आहे अजून ! तिचें केविलवाणें तोंड पाहून आणि तिचें तें आर्जवी, प्रेमळ, आणि मधूर भाषण ऐकून आह्मीं गेलों तेव्हांच लटपटून ! आणि हूं काय ! झालों तिच्या ह्मणण्याला कबूल ! आणि उरकून टाकलें तिच्या सांगण्याप्रमाणें तिचें काम !

सर्जे॰—मानाजीराव, आतां मात्र तुह्मीं जायला लागतात बरें कां आपल्या वळणावर! तुम्हांला कांहीं वेळ अवेळ समजते कीं नाहीं? ही कां थट्टेची वेळ आहे होय! बरें आतां या वेळेस ती कोठें आहे तें सांगा पाहूं अगोदर चटकन्!

मानाजी॰—कोठें आहे म्हणजे! आतांच सांगितलें ना कीं या मानाजीरावानें तिला तिच्या प्रियकराच्या स्वाधीन करून दिली म्हणून!!

सर्जे॰—मानाजी, कोण रे हा तुझा लोचटपणा! पुरे झाली आतां ही थट्टा! अरे तिचें मला अजून दर्शन सुद्धां झालें नाहीं आणि म्हणे—

मानाजी॰—म्हणजे! तिनें तुमचें नांव घेतलें असें तुम्हीं समजतां कीं काय! यंव रे फक्कड! अहो भ्रमिष्ट—अहो ऐकलेंत कां? दौलतरावावर जडलें होतें तिचें प्रेम! समजलांत कां? केली तिला त्याचे हवालीं आणि झालों मोकळा! हूं काय?

सर्जे॰—(मानाजीराव थट्टाच करतो आहे असें समजून) सर्जेराव, हा दौलतराव म्हणजे दौलतराव दुमालदार असेल नाहीं!

मानाजी॰—हो! हो! तोच तो! पुढची मौज कोठें ऐकलीत तुम्हीं अजून! पहिल्याप्रथम मीं त्याच्या जवळ तिची गोष्ट काढिली तेव्हां त्यानें किती आढेवेढे घेतले! कपाळाला आठ्या किती घातल्या! त्रासल्यासारखें काय केलें! नशिबाला काय दोष दिला! पातक!

पातक ! विश्वासघात ! नीचपणा ! इत्यादि शब्द किती-वेळां उच्चारले ! मित्राला मी कधीं फसवणार नाहीं म्हणून आणा शपथा काय वाहिल्या ! पण तिची आणि त्याची नुसती दृष्टादृष्ट होतांच तो अगदीं लटपटून गेला !! आणि शेवटीं येथपर्यंत मजल येऊन ठेपली कीं त्यानें आमच्या समक्ष—

सर्जे०—(मानाजीरावाची पाठ थोपटून थट्टेनें) शाबास गड्या ! आहे ! आहे ! मानाजीराव, एखाद्याची चेष्टा करून त्याला चिडविण्याची कला तुम्हीं बरीच चांगली पैदा केली आहे !

मानाजी०—सर्जेराव, मी ही तुमची थट्टा करतों असें तुम्हीं समजतां कीं काय ? अहो तो तिला म्हणाला असा विश्वासघात ! माझा मित्र मला काय म्हणेल ! तिनें रोख उत्तर दिलें कीं घेईल गळ्याला फांस लावून ! त्याचा विचार आपल्याला कशाला हवा आहे ! असें ती म्हणाली मात्र तोंच त्या राजश्रीनीं एक साखरेचा असें म्हणून आणि वर आम्हांला साक्षीला ठेवून दिली कीं आपली पूर्ण संमती !!

सर्जे०—मानाजीराव, या प्रसंगीं मी हरलों असें कबूल करून द्या ना बरें आतां मला चिडविण्याचा नाद सोडून ! आणि (त्याचा हात धरून) चला कसे बरें लौकर मला तिच्याकडे घेऊन !!

मानाजी०—सर्जेराव, तुमच्या गळ्याची शपथ ही

थट्टा नव्हे! खरोखरच ती यावेळेस दौलतरावाच्या घरीं मौजा मारीत आहे!!

सर्जे॰—आतां येथून बऱ्या बोलानें पाय काढतो आहेस लवकर, कीं घ्यायची आहे आपली एकदां चांगली कणीक तिंबवून!

मानाजी॰—सर्जेराव, देवाशपथ जी खरी गोष्ट होती ती मीं तुम्हांला सांगितली!! आतां आणखी जीव तोडून किती सांगूं!!!

सर्जे॰—अरे चोरा!

मानाजी॰—पण काय हो सर्जेराव, यांत तुम्हाला इतकें वाईट काय वाटलें बोवा! मला तर अगोदर असें वाटलें होतें कीं ही मौज ऐकून तुम्हीं पोट धरधरून हांसाल!

सर्जे॰—अरे हरामखोरा! मला चिडवितोस काय! हे गोगलगाईचे पोटांतले पाय मला नव्हते अगोदर समजले! कुंटणगिरी करतोस नाहीं!

मानाजी॰—दौलत्यानें ज्या फक्कडाच्या तोंडाला पानें पुसून ती छबकडी पटकावली ते आपणच कीं काय! होय! आपणच वाटतें! होय ना? अरेरे! त्या दौलत्याचा केवढा हा पाजीपणा! आपण तर बोवा असा अपमान कधीं सहन करून घेतला नसता! अशा वेळीं त्या हरामखोराचा प्राण मीं खचित घेतला असता! नाहीं तर निदान मी तरी आपला स्वतःचा अंत करून घेतला असता! हाः! हाः! हाः! (हांसतो.)

सर्जे०—चोरा ! हरामखोरा ! बेरडा ! हांसतोस काय मांगा ! दांत काढतोस ! तुझा प्राण घेतों अगोदर, (मानाजीरावाचा गळा धरतो.) आतां माझ्या तडाक्यांतून तूं जिवंत सुटशील होय ! कुंटणगिरी करतोस नाहीं !! (मानाजीरावाचा गळा जोरानें दाबतो.)

मानाजी०—अय्–य्–य्–य्–मेलों ! मेलों ! सर्जेराव, हें चांगलें नाहीं आं ! मी तुझा भावी मेव्हणा ! तुझा भावी शालक ! तुझ्या लाडक्या बहिणीचा आवडता नवरा ! माझ्यावर असा हात टाकणें शोभत नाहीं तुला ! हा शिष्टाचार नव्हे बरें ! याचें उट्टें काढल्याशिवाय मी कधीं सोडायचा नाहीं हें ध्यानांत धर ! उद्याच्या लग्नसोहळ्यांत तुला एकदां सोडून पंचवीस वेळां नाक घांसायला लावीन तूं काय समजला आहेस !! अय्–य्–य्–य्–मेलों ! मेलों !

सर्जे०—(मानाजीरावाचें तोंड वर उचलून) सुरत तर पहा मला नाक घासायला लावणाराची ! कोणी पाहिली नसेल तर ती नीट पाहून घ्या एकदां ! बेरडा तूं मला नाक घांसायला लावणार होय ! (मानाजीरावाला खालीं वांकवून) तूंच नाक घांस अगोदर माझ्यापुढें ! घांस ! नीट घांस ! नाकाचें सालडें निघूं दे ! ह्मणजे तुला आठवण राहील चांगली ! मांगा ही तुझी वटवट बंद करून बऱ्याबोलानें तो दौलत्या आणि ती कवटाळीण या वेळीं कोठें गेलीं आहेत हें सुध्या उत्तरानें सांगशील तर बरी गोष्ट आहे ! नाहीं तर (कंबरेची तलवार उपसून)

तुझी ही लुब लुब करणारी लांब जीभ आंखूड करून तूझ्या हातावर दिलीच ह्मणून समज !!

मानाजी०—(सर्जेरावापुढें नाक घांसून) सर्जेराव ! माझे नका हो असे हाल करूं ! मी तुमच्यापुढें हजार वेळां नाक घांसून माफी मागतों तुमची ! पण या वेळीं मला जिवंत सोडा ! माझ्या काळजानें अगदीं ठाव सोडला आहे हो !

सर्जे०—अरे बेरडा ! सांगतो आहेस कीं नाहीं अगोदर तीं कोठें गेलीं तें ! कीं धरायची आहे तुला या घटकेला यमपुरीची वाट !

मानाजी०—सर्जेराव,मी अगदीं गोंधळून गेलों आहे हो ! तुमच्या हातांतलें हें शस्त्र पाहिल्यापासून भीतीनें माझी अगदीं गाळण उडून गेली आहे ! माझी स्मरणशक्ति आहे अंमळ मठ्ठ ! आणि तशांतून आतां तर मला अगदींच भ्रमिष्टासारखें झालें आहे !! तुह्मीं जर अंमळ धीरानें घ्याल तर मला सुचेल कांहीं तरी ! नाहीं तर तुमच्याकडून असे हालहाल करून घेण्यापेक्षां मीच स्वतः माझ्या हातांनीं आपली जीभ आंसडून घेऊन प्राण देईन तुमच्यापुढें !!

सर्जे०—(तलवार म्यानांत घालून) हं ! भागूबाई ! रडा ! बोला आतां एकदांचे ! हं आटपा ! बेरडा, बघतोस काय तोंडाकडे ! होतें आहे कीं नाहीं अजून तुला स्मरण ?

मानाजी०—होत आहे हो ! पण जरा लांब व्हाल तर लवकर होईल ! (सर्जेराव दूर होतो) लागलें !

व्हायला लागलें ! बरें झालें ! होईल–होईल असें ह्मणतां ह्मणतां झालें एकदाचें अखेर ! मला वाटतें–हो–आणि गोंडाजीही तसेंच सांगत होता–कीं तीं सावाच्या आळींत बचंभटाच्या घरीं लग्न लावून घेण्याकरितां गेलीं आहेत ह्मणून !

सर्जे०—काय लग्न लावून घेण्याकरितां आणि बचंभटाच्या घरीं ! !

मानाजी०—हो ! हो ! !

सर्जे०—आणि हें खरें ना ? कां ही वेळ मारून नेण्याकरितां मला कांहीं तरी थाप देतो आहेस ! पुरता विचार कर बरें !

मानाजी०—सर्जेराव, देवा शपथ ! मी खरें तेंच सांगतों आहे ! माझे प्राण जायची वेळ आली तरी मी खोटेंच बोलेन होय !

सर्जे०—अरे तुझ्यासारखे बेरड ! प्राण गेला तरी खरें बोलायचे नाहींत ! पण या वेळीं तुझ्यावर विश्वास ठेऊन तुला जिवंत सोडतो जा ! तो चोर हरामखोर दौलत्या त्याचा घेतों अगोदर समाचार !

मानाजी०—हं ! हं ! त्यालाच या दुनियेंतून पार केला पाहिजे ! ही तलवार त्याच्याच मानेवर ठेविली पाहिजे ! आणि मग त्या छबकडीला !

सर्जे०—मानाजीराव, गजरा ह्मणजे एक अद्वितीय रत्न आहे हो ! तिच्यावर वार करायला मांगाचा हात सुद्धां लुळा पडेल !

मानाजी०—खरें बोलतात सर्जेराव ! मी जर आज तुमच्या स्थितींत असतों तर मीं तिला यत्किंचित् ही दुखविली नसती ! ! अहो, असलें गुलाबाचें फूल ! खुडून चुरगळून कोण टाकील ! !

सर्जे०—खरोखर राजपुत्रांनीं तिच्या प्राप्तीसाठीं धडपड करावी अशी तिची योग्यता आहे !

मानाजी०—आणि अशा रत्नाला तुह्मीं मुकलात ह्मणून, सर्जेराव, तुमच्याबद्दल मला फार अवघड वाटतें ! ! (मोठ्यानें हेल काढून रडूं लागतो.)

सर्जे०—अरे बेरडा ! हा मारवाडी गळा ही तूं बराच कमावला आहेस ! माझ्याबद्दल तुला अगदीं भडभडून आलें नाहीं ! !

मानाजी०—नाहीं बोवा ! माझें मित्रप्रेम लटकें असेंच कां होईना ! सर्जेराव तुह्मांला अशा स्थितींत पाहून मला मोठा आनंद वाटला ! (खिद् खिद् हांसतो) मग तर नाहींना उरलें कांहीं तुमचें ह्मणणें !

सर्जे०—लंबकर्णच तूं ! तेव्हां तुझ्याशीं काय बोलायचें जास्त ! माकड तोंड्या ! कवडी मोल किंमतीचा ! ह्मणूनच सोडला तुला आज जिता ! (निघून जातो.)

मानाजी०—(सर्जेराव लांब गेला असें पाहून) कवडी मोल आं ! आपल्या बापाला जाऊन विचार लेका ! ह्मणजे या गब्रूची काय किंमत आहे तें सांगेल तो तुला ! ! (पडदा पडतो)

अंक ५ वा.

प्रवेश १ ला.

स्थळ—धनाजी रावाचें घर.

वेळ—सायंकाळ.

(गोंधळून गेलेला धनाजीराव व त्याचे मागून ह्मशा प्रवेश करतात.)

धनाजी०—अरे काय ह्मणतोस काय ! तारी घरांतून निघून गेली ! आणि ती मानाजीरावाचा हात धरून ! अरे ह्मशा, आज आपल्या नरडयांत बया तर ओतली नाहींस ना ! धुंद झाल्या सारखा स्वस्थ काय उभा राहिला आहेस ! अरे चावडीवर जाऊन कोतवालाला वर्दी दे ! माणिक चौकांत, पेंठत, कापड आळींत आणि भांडी बाजारांत जाऊन सगळे लोक गोळा कर ! आणि नरडयाला फोड येई पर्यंत आणि घसा कोरडा पडे पर्यंत ओरड !

ह्मशा—आन् धनीसाब, ती गंगडी ह्मंगत व्हती कीं रेडकाईच्या जत्रे पाई पाया पडायासनी आपनासनी इचारून शान् मानाजीराव आन् तारा बाई गेल्याती ह्मनून ! अदुगर दोग बी बागमंदी बेगुमान फिरत व्हती नव्ह का ! आन् मंग दोडक्याच्या मांडवा खालन झाली पसार ! अन् हूं काय ! लै लै वंगाल पगा धनीसाब ! !

धनाजी०—अरे अकलेच्या सुडक्या, वटवट काय लाविली आहेस! अरे पाय उचल!

झशा—अन् त्येचाच इचार करतो हे न्हव का धनीसाब! पन् धनीसाब, त्यासनी बोलूं तरी काय! धनीसाब लै तापल्याती म्हनून सांगूं? का ग्वाड ग्वाड बोलून शान् घराकडे हुसकून आनू? हा झशा दिसऱ्या चाकरा वानी न्हव बरं कां धनीसाब! ह्यो मर्द समद्या कामामंदी युगत युगत लढवायचा पगा!!

धनाजी०—झशा!!

झशा—आई रेडकाई! ताई साब गवसल्या हंजी कोंबड देईन पग तुझ्या नेविद्याला! (जातो)

धनाजी०—ही पोर नाहीं, ही जिव्हारी झोंबणारी तीव्र कट्यार आहे बरं कट्यार! आमची पुण्याई जर सबळ असती तर असा प्रसंग कां आला असता! आमचेंच दैव खोटें तेव्हां त्याचा बोल देवाला लावून काय उपयोग! पण ही कार्टी इतकी बेफाम कशी झाली! आणि तो रेडा मान्या इतका उन्मत्त कशानें झाला! तें कांहीं नाहीं हें सारें त्या मान्याचें कवटाळ आहे! त्यानें तिला कांहीं तरी चारलें यांत बिलकूल शंका नाहीं! नाहीं तर तारी सारखी साधी, पोर माझ्या तोंडाला काळोखी लावायला कधीं तयार झाली नसती!!

(एक चाकर धांवत धांवत प्रवेश करतो)

चाकर—(धनाजीरावाला मुजरा करून) धनी-

साब, ह्ये पतर घेऊनशान् एक चाकूर आलाया. आन् ह्मनतुया कीं मानाजीरावानं ह्ये दिलया ह्मनूनशान्. (पत्र देतो आणि निघून जातो.)

धनाजी०—काय ! मान्यानें पाठविलें ! हं समजलों ! ही देणी भरपाई झाल्याची रसद बरें रसद ! बरें आहे ह्मणावें मान्या ! भोगशील याचें लवकरच प्रायश्चित्त ! (पत्र वाचतो.) "राम राम अनेक दंडवत. आपल्या मुलीला मी घेऊन गेलों ह्मणून आपण मजवर रागावला असाल" नाहीं बरें ! रागावलों नाहीं बरें ! या ह्मातार्‍याला मोठा आनंद वाटला !! लेका, हिणवितोस काय या धनाजीरावाला ! "बाबांनीं वर पाहिला आणि त्यांच्याशीं मीं लग्न केलें असें मी कधीं कोणाचें ह्मणून घेणार नाहीं, मीं आपल्या इच्छेप्रमाणें वर पसंत केला, असें सगळ्या जगाला कळलें पाहिजे. एवढ्याकरितां मला येथून घेऊन चला असा तिनें हट्ट घेतला. तेव्हां तिचें मन मला मोडवेना ह्मणून मीं तिला घेऊन निघून गेलों. खरी हकीगत वडिलांस विदित केली आहे, तरी मला व माझ्या बरोबर आपल्या मुलीला आपण याबद्दल क्षमा करावी. आज्ञा होईल तर आह्मीं रात्रौ आपल्या भेटीला येऊं" मान्यानें पोरीला भारलीन् ! त्यानें तिला कांहीं तरी चेटुक केलें हेंच खचित ! अंगाची कशी अगदीं आग आग होऊन गेली आहे !! यावेळेस तो मान्या जर माझ्या समोर असता तर

तो आज खास जिवंत राहिला नसता! पण हा संताप यावेळेस मीं विवेकानें आवरलाच पाहिजे! नाहीं तर मूर्तिमंत पांच हजार रुपयांना मी आंचवलोंच ह्मणून समजा!! कार्टे तुला मान्या आवडो कीं तूं मान्याला प्रिय हो–एकदा तुझें आणि तुझ्या बरोबरच माझ्या तिजोरीचें ही सावधान मला कसेंही करून लावून घेतलेंच पाहिजे!! ह्मशा, अरे ह्मशा, (म्हशा 'जी' ह्मणत पुढें येतो.) मानाजीरावाकडून आलेल्या चाकराला ह्मणावें, तुझ्या धन्याला आणि तुझ्या नव्या मालकीणीला मीं रात्रीं घरीं बोलावलें आहे ह्मणून! (ह्मशा 'जी' ह्मणून निघून जातो) मानाजीराव तसा वाचेचा सच्चा आहे! दगा नाहीं त्याचे हातून व्हायचा! (इतक्यांत दुसरा एक चाकर धांवत धांवत प्रवेश करतो.)

चाकर—ताईसाबाकडन ह्ये पतर घेऊनशान् योक गडी आलाया धनीसाब (पत्र देतो आणि निघून जातो.)

धनाजी०—काय! तारीचें पत्र! हो तिचेंच हें अक्षर!! त्या मान्यानें पत्र लिहिल्यावर ह्या कार्टीला पांढऱ्यावर काळें करायचें काय कारण होतें!! चवचाल कार्टी! कां कांहीं दगा आहे? पोरी परी पोर आणि रुपया परी रुपये, धनाजीराव, या दोहोंनाही तुह्मीं मुकता असें दिसतें! कार्टी लिहीते आहे तरी काय! "मीं जें हें अविचाराचं कृत्य केलं त्याबद्दल आपली क्षमा कशी मागावी हें मला कळत नाहीं, आणि मीं असं कां केलं

हें ही माझ्यानं फोडून सांगवत नाहीं. ” यंव्! याचें नांव स्त्री लाघव !! ह्मणे क्षमा कशी मागावी तें कळत नाहीं, आणि असें कां केलें तें फोडून सांगवत नाहीं ! अरे, हा लपंडाव ह्या ह्यातान्यापुढें काय! कोठे श्रीगचा धडा शिकायला लागला नाहीं तोंच हा वातरटपणा आं ! “ मनासारखा पति मिळावा ह्मणून मीं जें हें धाडस केलं त्याबद्दल आपण मजवर रागावून माझी खंती करूं नये ” असें–असें! आतां मात्र तुझ्या अंतःकरणांतली खरी उकळी बाहेर पडली!! आहे! मान्या तसाच आहे ऐटदार ! शिवाय मोठा वस्ताद आणि खुप खुबीदार ! तेव्हां ती मान्याला भाळेल असें मला पूर्वींच वाटलें होतें!! (चाकर प्रवेश करतो.)

चाकर—धनीसाब त्यो चाकूर पतरापाई गागतोय कीं वाटकूळ !इचिभन अक्शी दम न्हाई ह्यंजी !

धनाजी॰—त्याला ह्मणावें थांब जरा ! (चाकर ‘जी’ ह्मणत निघून जातो.) पोर शहाणी तर खरीच ! अहो माझीच ती! तेव्हां शहाणी कां नाहीं बरें असणार!! “जरी त्यांचं माझ्यावर फार प्रेम आहे तरी आपल्या आज्ञेवांचून मी त्यांना कायमचा रुकार कधींच देणार नाहीं.” खरोखर मानाजीचें तिच्यावर तसेंच प्रेम आहे! बेटा तिच्याकरितां कसा अगदीं झुरणीस लागला आहे हो ! “आपल्याला माझं करणं रुचलं असं लिहून आलं ह्मणजे आह्मी आपल्याला भेटायला येऊं” काय ! मानाजीशीं लग्न लावायला माझी संमती ! पोरी मी ती तुला मोठ्या

आनंदानें देईन ! खरोखर आज माझा जीव अगदीं निश्चिंत झाला ! किती झालें तरी तारी या धनाजीरावाची पोटची पोर ! मग आनंद कां बरें होणार नाहीं !! ह्मशा, नरशा, अरे कोण आहे रे तिकडे ! (म्हशा येतो) अरे दिवाणखान्यांतून कलमदान घेऊन खालच्या चौकांत हो. हा मी तिकडे आलोंच. पोरीचे डोळे इकडे लागले असतील ! तिला अगोदर घरीं बोलाविली पाहिजे ! म्हशा, आजरात्रीं आपल्या घरीं मोठी मेजवानी आहे ह्मणून पंताना कळीव ! ह्मणावें ताबडतोब तयारीला लागा ! पांच पक्वान्नांचा बेत झाला पाहिजे ! सोंवळेकऱ्याला ह्मणावें स्वयंपाक चमचमीत झाला पाहिजे ! मिटक्या मारतां मारतां मंडळींचीं तोंडें दुखून आलीं पाहिजेत ! रात्रीचे पंक्तीला खाशी खाशी मंडळी बोलवा ! लांब पोटाचे ते जोत्याची, लठ्ठ पायाचे ते रोडकोबा, सुकट तोंडाचे ते सूर्याजी, लांब लांब तंगड्याचे ते वाघोजी बोवा सर्वांना बोलवा ! मंडळीची खात्री खात्री उडाली पाहिजे ! आज जांवई बोवांचे पंक्तीचा लाभ आहे ह्मणून ह्मणतों तुमच्या घरच्या बायका पोरांना सुद्धां घेऊन या ! पण पंताना ह्मणावें एकंदर खर्चाचा आकडा (हातानें खूण करून) इतक्यावर जातां उपयोगी नाहीं बरें का ! चला निघा.

(पडदा पडतो)

अंक ५ वा.

प्रवेश २ रा.

स्थळ—वृद्धेश्वराचे देवळा जवळचा रस्ता.

वेळ—सायंकाळ.

तारा—पण गजरे, खरंच कां ग माझा दादा तुला दृष्टी समोर नकोसा झाला? अगदीं मनापासून सांग हो! खरंच कां त्यानं तुझा नाद सोडावा असं तुला वाटतं?

गजरा—अगदीं खरंच बरं कां! आणि ह्मणूनच मी अशी स्वस्थ आहे हो!!

तारा—इश्श! मज जवळ नको कांहीं असं चोरून ठेवायला!! वेळ पडली तर माझाच उपयोग होईल बरं कां तुला! माझ्या दादा सारखा नवरा मिळायला पूर्व जन्मीचं पुण्यच पाहिजे पदरीं! रूपानं, कां गुणानं, कां संपत्तीनं, कश्शानं तरी तो कमी आहे कां!

गजरा—पण तुला कां इतका राग आला!

तारा—खेटर आडलं आहे माझं रागवायला!! आतां हातांत लोटा घेऊन जा घरोघर अलक करीत!!

गजरा—अग वेडे, मीं तुझी थट्टा केली हो! शपथ वाहून सांगतें बरं कां कीं माझी आणि तिकडली भेट कधीं होईल आणि मी पदर पसरून त्यांची क्षमा कधीं मागेन असं झालं आहे हो मला!! पुरुषांचा राग थोडा वेळ टिकतो असं मला तिकडून नेहमीं सांगायचं होत असे, त्याचा अनुभव या वेळेला येईल असं

मला वाटत होतं! पण अजून जेव्हां तिकडनं माझी वास्तपूस्त विचारणं होईना तेव्हां त्यांचं मन माझ्याबद्दल अगदीं विटलं आहे हेंच खरं आणि दुसरं काय!

तारा—गजरे, अशी काय मेली भलतीच शंका घेऊन डोळ्यांना पाणी आणतेस ही!

गजरा—तुला काय आपल्या लांब लांब ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगायला होतंआहे! परदुःख असंच शीतल असतं बरं बाई!!

तारा—गजरे, तूं किनई मला असं टोंचून कां बरं बोलतेस? आज सकाळपासून तिकडून दादाची गांठ घेण्याकारितां दहा ठिकाणीं जाणं झालं होतं, पण दादाची किनई कुठं देखील गांठ पडली नाहीं त्याला मीं तरी काय करावं बरं! मी स्वस्थ बसलें असेन तर बाई एक निराळी गोष्ट!

गजरा—तारे, मी तसं कां ह्मटलं तुला? तूं माझ्याकरितां काय केलंस हें तुझ्याकडून काढून घेण्याकरितांच मी तुला तसं बोललें हो! खरंच मला किनई त्यांची क्षमा केव्हां मागेन आणि 'माझा राग गेला' असं तिकडल्या तोंडातून केव्हां काढीन असं झालं आहे!!

तारा—गजरे, तुझी आणि दादाची भेट करून दिल्याखेरीज मी अन्नाला, कां पाण्याला कां कशाला देखील शिवणार नाहीं! असं मी तिकडे निक्षून सांगितलं आहे!! आणि मलाही पण तिकडनं दादाला खचित घेऊन येतों असं सांगणं झालं आहे!

गजरा—तारे, खरंच कां दौलतरावांनीं तुला असं सांगितलं आहे? या वेळेला माझ्या या उदास मनाला कित्ती कित्ती धीर आला आहे ह्मणून सांगूं! पण मघाशीं मी तुला टोंचून बोललें ह्मणून तूं माझ्यावर रागावूं नकोस हो! नाहीं ना रागवायचीस? माझ्या गळ्याची शपथ आहे हो तुला! माझं मन किनई नाहीं ठिकाणावर ह्मणून तोंडांतून गेला शब्द चुकून! (दूर पाहिलेंसें करून) अगबाई! पण तें पाहिलंस कां कोण येत आहे तें इकडे? तारे मी येतें हो आतां—तुमच्या दोघांत मी तिसरी कशाला हवी! येतें बरं—माझं स्मरण राहूं दे हो! राहील ना?

तारा—राहील हो राहील! (गजरा जाते व दौलतराव प्रवेश करतो.)

दौलत०—प्रिये, कांहीं अधिकउणें?

तारा—कांहीं नाहीं! बाबांच्याकडे पाठविलेला गडी अजून कांहीं परत आला नाहीं!!

दौलत०—लाडके, या कामांत आपल्याला यश येईल असें मला तर कांहीं वाटत नाहीं!

तारा—बाबांच्याकडून कांहीं उत्तर येवो, पण मला इकडून नाहीं ना कधीं अंतर द्यायचं होणार? बाबांनीं माझ्यावर कित्ती जरी आग पाखडली तरी त्याचं मला इकडच्या जिवावर कांहीं—कांहीं ह्मटल्या कांहीं वाटायचं नाहीं! माझ्यापुढं जरी राजाच्या घरची संपत्ती ओतली तरी इकडचे पाय मी कद्धीं सोडायची नाहीं! आणि कसा जरी प्रसंग आला तरी आपण मात्र आपल्या मनाला

आंवरून धरावं एवढंच माझं पदर पसरून मागणं आहे!

दौलत०—लाडके, काय ही भलतीच शंका! या दौलतरावाला या अफाट पृथ्वीचें राज्य जरी मिळालें तरी वचनभंगासारखें घोर पाप ह्याच्या हांतून कधीं होणार नाहीं!! निस्सीम प्रेमाच्या सौख्याची ज्याला एकदां गोडी लागली, तो कधींतरी उलट खाईल का! परमेश्वर साक्ष तुला सोडून हा दौलतराव एकक्षणभरही जिवंत राहणार नाहीं समजलीस!!

तारा—या वेळेस केवढा आनंद झाला आहे ह्मणून सांगूं!

दौलत०—प्रिये, सगळ्या जगाचें मोल जरी दिलें तरी खरें प्रेम हें कधीं मिळणार आहे कां! या हृदयांत तुझ्या विषयीं जो शुद्ध प्रेमाचा सांठा आहे त्याची तूं मालकीण आहेस! आणि तुझी सेवा करणारा हा तुझा दास आहे!! (एक चाकर प्रवेश करतो.)

तारा—बाबांच्या कडचं उत्तर आलं वाटतं!

दौलत०—प्रिये, इतकी अधीर होऊं नकोस! त्यांत धनाजीरावांनीं शिव्या दिल्या असतील शिव्या!! (चाकर पत्र देऊन निघून जातो.)

तारा—पण हें वाचून पाहिलं तर आपलं कांहीं जात नाहीं ना? (पत्र वाचते) "पोरी, तुला आवडेल त्या वराशीं तुझें लग्न मी मोठ्या आनंदानें लावीन! पण आतां हट्ट सोडून घरीं ये आणि माझी काळजी दूर कर!!"

दौलत०—प्रिये, पुरे झाली थट्टा!

तारा—नाहीं-खरंच असंच लिहिलं आहे हो ! पण तसं कशाला-वाचायचंच होतं हें एकदां !

दौलत०—(पत्र वाचून) खरोखर परमेश्वरानें आज आपणा उभयतांना मोठें धन्य केलें ! किती आनंद झाला आहे ह्मणून सांगू ! पण धनाजीरावांची बुद्धि एकदम अशी कशी पालटली असेल तें परमेश्वर जाणें ! मला तर असें वाटतें कीं, त्यांचा कांहीं तरी गैर समज झाला असावा ! नाहीं तर त्यांच्याकडून तुला माझ्याशीं लग्न लावायला संमती ! झोपेंत सुद्धां असें दुष्ट स्वप्न पड ह्मटल्यानें पडायचें कठीण ! पण त्याचा विचार तूर्त करीत बसण्या पेक्षां पडत्या फळाची आज्ञा प्रमाण मानून मामासाहेबांच्याकडे जाण्याची तयारी करावी हेंच मला या वेळेस बरें दिसतें ! मग प्रिये आतां उशीर कां !!

तारा—मग मी देखील तेंच ह्मणतें आहे ! बाबांच्या पायावर डोकं ठेऊन एकदां आपल्या मना सारखं करून घेऊं ह्मणजे झालं आपलं काम !!

दौलत०—मी तेंच ह्मणतों-तर मग कर आपली तयारी—

तारा—ह्मणजे ! आणि इकडे यायचं नाहीं वाटतं माझ्याबरोबर बाबांच्या घरीं ?

दौलत०—उगीच अगांतुकी करायला यायचें आहे कीं काय ? माझें नांव तरी लिहिलें आहे कां या पत्रांत कोठें !

तारा—इश्श ! निराळ्या नावानं कां हवं होतं इकडे बोलावणें !! हा काय जळ्ळा भलताच वाद या वेळेला!

असं बळंच आडरानांत शिरून मला एकटीलाच द्यायची आहे वाटतं बाबांच्या पुढं तोफेच्या तोंडीं! आणि आपण आपलं नामा निराळं राहायचं आहे होय!

दौलत०—प्रिये, तसें नाहीं ग! मामांच्या समजूतींत कांहीं चूक झाली असली आणि मला पाहून ते जर चवताळले तर नसतेंच विघ्न उत्पन्न होईल म्हणून म्हणतों! आणि दुसरें काय!!

तारा—मेली नसतीच शंका घेऊन उगीच वितंडवाद घालीत बसणं मला नाहीं मेलं आवडत! आतां बाबांना राग येवो कीं लोभ येवो! त्यांच्या रागाशीं आणि लोभाशीं आपल्याला काय करायचं आहे आतां! आणि त्यांच्या रागाची आतां आपल्याला एवढी भीती तरी कशाला हवी आहे बाळगायला! मेला एकदां सोक्ष कीं मोक्ष झालेला बरा! मग चलायचं ना बाबांच्याकडे? आणि इकडंन जर हो म्हणणं होत नसलं तर मला त्याची देखील गरज नाहीं!

दौलत०—तुझाच आग्रह असेल तर येतों आम्हीं तुझ्याबरोबर आपली शोभा करून घ्यायला! परमेश्वर करो आणि शेवटीं विषाची परीक्षा पाहण्यांतला हाप्रकार न होवो म्हणजे झालें! तूं म्हणशील तसें वागायला माझी तयारी आहे पण तूं मात्र आपला पुरता विचार पहा म्हणजे झालें!

तारा—पुरता विचार पहायचा अजून कां राहिला आहे! तो पूर्वीच पाहिला आहे!! आतां परमेश्वरानं हा असला सुखाचा ठेवा आणि हें सौख्याचं भांडार मला ज-

न्मोजन्मीं द्यावं एवढंच माझं देवापाशीं पदर पसरून मागणं आहे.

(रंगभूमीच्या डाव्या बाजूनें दोघेही निघून जातात व उजव्या बाजूनें गजरा प्रवेश करते)

गजरा—ताराबाई, तूं मोठी दैववान् बरं! आणि ह्मणूनच आपल्या प्रियकराला घेऊन कशी आनंदानं नाचत उडत गेलीस!! नाहीं तर मी बसलें आहे आपली तिकडचं केव्हां दर्शन होईल याची वाट पहात!! अग वेडे, आतां कां बरं जिवाला लावून घेतेस! आपल्या हातानंच आपल्या पायावर धोंडा पाडून घेतलास आणि मग आतां नशिबाला कां बरं दोष देतेस! माझ्यावर जर तिकडला राग खरोखरच झाला असला, आणि तिकडून जर माझा खरोखरच अव्हेर झाला—अगबाई; पण तें कोण बरं इतक्या लगबगीनं इकड येत आहे! अगबाई! हे तर तेच!! अग गजरे, ज्यांना तूं काल झिडकारलंस तेच बरं हे! यानाच बरं प्रेमाच्या अढळ पर्वतावरून तूं खालीं खोल संशय डोहांत ढकलून दिलंस!! अगबाई! डोळे कसे इंगळासारखे लाल झाले आहेत! कमरेला तलवार आहे! आणि पाऊलं देखील कशी संतापलेल्या माणसाप्रमाणें धपा धपा आणि वेडी वांकडी पडत आहेत! व्यर्थ बरं मी चांडाळणीनं यांना शिणविलं!!

(सर्जेराव प्रवेश करतो व गजरा तोंडावर बुरखा टाकून किंचित् आड होते)

सर्जे०—तो दौलत्याच तो ! आणि तीच ती कवटा-ळीण! ! सटव्यानें बातमी पण कशी अगदीं वेळेवर आणि बिनचूक दिलीन ! !

गजरा—(पुढें येऊन) महाराज, अहो ह्मटलं प्रेम-पुरी ती हीच कां ?

सर्जे०—बाई, हिला विचित्रपुरी ह्मणतात ! पण तुमच्याशीं बोलायला मला वेळ नाहीं ! (लांब पाहिलेंसें करून) झुम झुम पाऊलें टाकीत आणि माना ओवा-ळीत तीच, तीच चालली आहे ! !

गजरा—(एकीकडे) प्रिया, काय हा वेडेपणा ! (उघड) प्रेमपुरीला मीं केव्हां जाऊन पोंहोंचेन बरं !

सर्जे०—संध्याकाळचे वेळेला—मनुष्याला मनुष्य दिसत नाहीं अशा वेळेला.

गजरा—तर मग महाराज—

सर्जे०—बाई, काय हो तुमचा हा लोचटपणा ! (लांब पाहिलेंसें करून) हातांत हात ! आणि ग-ळ्यांत गळा ! ! कसें सहन होईल हें ! ! !

गजरा—(एकीकडे) वेडे गजरे, पुरी खातरी करून घेण्यापूर्वीच अशी भांबावून जाऊन उतावीळ होऊं नकोस ! (उघड) मी या ठिकाणीं लांबचा प्रवास करून आलें आहे ह्मणून विचारतें—

सर्जे०—बाई, तुह्मी आतां येथून जातां कीं—पण थांबा—आतां इकडल्या रस्त्यानें एक पुरुष आणि एक स्त्री गेलेलीं तुह्मीं पाहिलींत कीं नाहीं ?

गजरा--होय नवरा बायकोचं जोडपं मीं पाहिलं खरं इकडून जातांना ! मी त्यांना दहा वेळा विचारलं कीं ही वाट कोणीकडे जाते, आणि राम पाटलाचं घर कोणीकडे आहे ह्मणून ! पण तीं आपल्याच नादांत !! जोडा पण जोडा आहे हो !! ते बोवा आपले स्नेही आहेत वाटतं? कल्याण करो ईश्वर तुमच्या स्नेहाचं !

सर्जे०--बाई, पुरे करा ही तुमची तारीफ ! बायका तेवढ्या साऱ्या लघाळ ! पण काय हो बाई, त्यांचें बोलणें तुह्मीं ऐकलेंत कां कांहीं ? तीं कोणीकडे जाणार होतीं बरें?

गजरा--सर्जेराव ह्मणून त्यांचे कोणी स्नेही आहेत वाटतं ! त्यांच्या बद्दल चाललं होतं त्यांचं बोलणं !!

सर्जे०--असें काय ? काय ह्मणत होतीं तीं ?

गजरा--त्यांना त्यांनीं फसविलं आहे वाटतं ! असं फसविलं, तसं फसविलं, अशा चालल्या होत्या त्यांच्या गप्पा ! आणि शेवटीं तीं येथून बिऱ्हाडाकडे जायचं ह्मणून निघून गेलीं !

सर्जे०--उपकार आहेत बाई तुमचे ! अरे दौलत्या, या सर्जेरावाला फसविलें ह्मणून हांसतोस काय ! थांब--हा आलोंच पहा तुझ्या पाठोपाठ तुला नरकपुरीची वाट दाखवायला !! (निघून जातो.)

गजरा--गजरे, आतां तुला इकडून झिडकारणं होईल असं स्वप्नांत सुद्धां आणूं नकोस ! अग वेडे, असं निर्मळ प्रेम तुला कुठ तरी मिळेल कां ! आतां आणखी खात्री ती काय करून घ्यायची उरली आहे!

आतां अगोदर मागोमाग जाऊन काय मौज होते ती पहावी ! आणि ताराबाईना पाहून मन खट्टू झालं कीं आपण व्हावं पुढं ! मेलं आमचं संशयी मनच आमच्या घाताला मूळ कारण होतं आणि दुसरं काय !!! (पडदा पडतो)

अंक ५ वा.

प्रवेश ३ रा.

स्थळ—दौलतरावाचे वाड्यासमोरचें पटांगण.

वेळ—सायंकाळ.

दौलत०—अहो, अहो राव, अहो मानाजीराव, अहो फाकडे, अहो मानाजीराव फाकडे !

मानाजी०—(मागेंवळून) कोण ? माझे दोस्त दौलतराव ! टाळी–टाळी पाहिजे या वेळेला ! कां ह्मणून नाहीं विचारलेंत ? अहो, या मर्दाचें ठरलें कीं धनाजीरावाच्या पोरीशीं लग्न ! आणि हूं काय ? थोपटता कीं नाहीं आतां या गब्रूची पाठ !!

दौलत०—(मानाजीरावाची पाठ थोपटून) वाहवारे बहादुर ! मानाजीराव, तुमचीच शपथ हें ऐकून मला मोठा आनंद झाला आहे ! तारा ह्मणजे खरोखर एक अद्वितीय रत्न आहे बोवा !!

मानाजी०—तें विचारूं नका ! मरून तिच्याच पोटीं जावें, अशी आहे तिची योग्यता !!

दौलत०—तिच्या अद्वितीय लावण्या बद्दल तुमची एकदांची खात्री झाली हें फार बरें झालें ह्मणायचें ! पण

इतक्या घाईनें इकडे कोणीकडे ? तुमची फारच तारांबळ उडालेली दिसते आहे ह्मणून विचारतों !

मानाजी॰—दौलतराव, तें कांहीं विचारूं नका ! ही सारी धडपड आजचा मुहूर्त साधण्या साठीं !अहो,अजून बाजारांतलें कापड चोपड आणि सराफाकडचे डागडागिने हीं देखील बिऱ्हाडीं जाऊन पडलीं नाहींत ! दौलतराव—छे—छे—छे—तुह्माला काय सांगू, हेलपाटे मारमारून हे पाय अगदीं मट्ट्यास आले ! ! मूहूर्त घटका तर अगदीं जवळ येत चालली ! आणि अजून तिचें आपलें हें लुगडें मला नको—तो खण मला नाहीं पसंत—हे तोडे दिसतात लहान—या वाकी बसतात सैल—आणि या वेळांची घडण नाहीं घड—अशी आवड निवड अद्याप संपत नाहीं ! ! अहो, या धांदलींत तुह्मांला आमंत्रण द्यायला आतां येईन मग येईन, असें ह्मणतां ह्मणतां हा वेळ झाला ! ! बरें झालें तुह्मीं मला आतां हटकलें ह्मणून ! नाहीं तर मी आपल्या नादांत असाच पुढें गेलों असतो ! ! दौलतराव, हें पहा तुह्मीं आणि तुमचें कुटुंब तुह्मीं उभयतांनींही आह्मांला घटका दोन घटका झटून मदत केली पाहिजे ! आणि आमच्यावर एकदां अक्षता टाकून आह्मांला सुखी केलें पाहिजे ! आमचे नाहींत येथें कोणी आप्त इष्ट ! आमची नाहीं येथें कोणाची ओळख ! आणि आमच्या पाशीं नाहीं माणूस बळ ! नवरीच्या गळ्यांत मंगळसूत्र बांधायला देखील बायको माणूस मिळण्याची पंचाईत ! भटाशिवाय आमच्यावर अक्षता टाकायला दुसरें कोणी

पुरुष माणूस नाहीं आमच्या जवळ ! ह्मणून ह्मणतों दौलतराव, या वेळीं तुह्मी आमच्या उपयोगीं पडलेंच पाहिजे ! मी बहूतेक तयारी करीत आणलीच आहे ह्मणा, फक्त काय ते वाजंत्रीच ठरवायचे राहिले आहेत आतां ! आणि दौलतराव, तें काम मात्र मला आतां तुमच्या-कडेच सोंपविलें पाहिजे ! मुंडावळी, बाशिंग, घोडा आणि शिंग यांच्या व्यवस्थेला गोडाजी गेलाच आहे ! दौलतराव, प्रसंग आणिबाणीचा आणि वेळ तर थोडा ! ह्मणून मोठी काळजी वाटते आणि दुसरें काय ! !

दौलत०—मानाजीराव, अहो कसली घेऊन बसला आहांत काळजी ! अहो तुह्मीं आणि आह्मीं मिळून हा बार असा उडवून देऊं कीं ज्याचें नांव तें ! अहो वेळेला जर आह्मीं तुमच्या उपयोगी पडलों नाहीं तर मग तुमच्या आमच्या लोभाचें चीज काय ! अहो तुह्मीं मला वाटेल तें काम हक्कानें करायला सांगितलें पाहिजे ! ह्मणून ह्मणतों तुह्मीं बिलकूल अवघड वाटूं देऊं नका ! आह्मीं उभयतां तुमच्या बिऱ्हाडीं येतों आणि तुमच्यावर अक्षता टाकून तुह्मांला सुखी करतों ! ! मग झालें कीं नाहीं ?

मानाजी०—अहो वधू आणि वर दोन्ही पक्षाक-डचे वऱ्हाडी तुह्मींच ! तेव्हां अशा वेळीं तुह्मांलाच कंबर बांधून पुढें झालें पाहिजे ! आणि शिवाय दौलतराव, लग्न लागल्यावर रात्रीं साड्याकरितां मामासाहेबांच्या घरीं वाजत गाजत जायलाही तुह्मीं उभयतांनीं आम-च्याबरोबर आलें पाहिजे ! नाहीं ह्मणून ...

अहो, तुह्मी बरोबर असलांत ह्मणजे तितकीच जास्त शोभा! शिवाय हें आमचें लग्न होणार आहे गुपचूप! तेव्हां पुढें कदाचित् वेडा वांकडा प्रसंग आलाच तर एकट्या बच्चंभटाच्या दोन डोळ्यांच्या ठिकाणीं तुमच्या दोघांच्या चार डोळ्यांची भर पडेल!! ह्मणून ह्मणतों हा सगळा सोहळा संपे तोंपर्यंत तुह्मीं आमचे वऱ्हाडी झालें पाहिजे!

दौलत०—एकून साड्याचा बेतही आज रात्रींच आणि तो ही सासुरवाडीच उरकून घ्यायचा आपला बेत आहे ह्मणायचा!! फार चांगलें!!!

मानाजी०—अहो, मामासाहेबांनीं मोठ्या आग्रहानें आमंत्रण दिलें आहे! मग आमच्या कडून आळस कशाला! लग्नाचें मुख्य काम उरकून घेतल्यावर लौकिकी सोहळे होईनात मोठ्या थाटानें!! मग केव्हां येतां आमच्या बिऱ्हाडाकडे?

दौलत०—वाजंत्र्यांना सांगून हा आलोंच ह्मणा तुमच्या मागून!

मानाजी०—बरें आहे! मी ही कापड आळींतून आणि सराफ आळींतून मागच्या पाऊलींच जातों बिऱ्हाडीं परत! हो पण बरी आठवण झाली! दौलतराव, अशा गर्दीच्या वेळीं एखाद्या अत्यंत महत्वाच्या गोष्टीचें विस्मरण हें आपलें व्हायचेंच! असो—गोष्ट वेळेवर आठवली हें एक बरेंच झालें ह्मणायचें! हें पहा भटजीबुवाना तुमचें कुटुंब आमची सख्खी बहीण आहे,

आणि तुह्मी आमचे मेव्हणे आहांत ह्मणून मी सांगितलें आहे !! अहो, या लग्नाच्या बाबतींत असे लपंडाव केल्याशिवाय निभाव लागत नाहीं ! ह्मणून ह्मणतों कीं तुमचें आमचें हें नातें तुमच्या ध्यानांत असूं द्या ! दौलतराव, मी तुह्मांला खात्रीनें सांगतों कीं तुमच्या सारख्या सरळ माणसांच्या हांतून हीं असलीं कामें कधींच उठायचीं नाहींत !! याला आमच्या सारखेच बिलंदर लोक पाहिजेत ! तुह्मीं आमची आजची बाजू संभाळलीत तर दौलतराव तुह्मांला काय सांगूं या मानाजीच्या आजच्या या अद्भुत कृत्याचा डंका नुसता या विचित्रपुरींतच काय परंतु या साऱ्या प्रांतांत चिरकाल दुमदुमत राहील समजलांत !!!

(तोंडावर बुरखा घेतलेली तारा घाबऱ्या घाबऱ्या येऊन दौलतरावास मिठी मारते.)

तारा—कुठ तरी पळून जाऊन उभयतांचे प्राण वाचविण्याची तयारी करा ! सर्जेराव कमरेला तलवार लटकावून दांत ओंठ खात आणि डोळे गरगर फिरवीत, आपला शोध करीत इकडेच येत आहे असं तोंऱ्ह्यानं मला आतांच सांगितलन् !!

मानाजी०—कोण ! सर्जेराव ! ! अरे बापरे ! त्याच्या बहिणीला मीं पळवून आणली हें त्याला समजून तो चवताळला आहे वाटतें ! दौलतराव, मला तर असें वाटतें कीं तो माझाच शोध काढीत येतो आहे इकडे !! आणि मी जर कां येथें त्याच्या दृष्टीस पडलों

तर माझीं शंभर वर्षें आतांच पुरीं भरलीं ह्मणून समजा ! ! दौलतराव, शक्ति पुढें युक्ति काम करीत नाहीं हो ! आणि ह्मणूनच दौलतराव मोठी भिती वाटते आहे बुवा आपल्याला ! इडा पिडा टळो ! आणि आणखी एक प्रहरभर तरी त्याची माझी दृष्टादृष्ट न होवो ! ! नाहीं तर आमच्या लग्नाकरितां घातलेल्या बहुल्यांत तो मला आणि माझ्याबरोबर आपल्या बहिणीला आज खास जिवंत गाडील ! ! दौलतराव, पहा बुवा ! ही आतांची वेळ कशी तरी संभाळा ! माझे पाय तर कसे लट लट कांपत आहेत ! खोटें नाहीं सांगत ! छातीला हात लावून पहा ! ठाव सोडला आहे हो माझ्या काळजानें ! हें पहा येथें कसें लक् लक् होतें आहे ! ! !

दौलत०—मानाजीराव, किती घाबरलांत हे ! आणि प्रिये सर्जेरावाला इतकें कां भ्यायचें ! वेडी नाहीं तर ! अग त्याला येथें येऊं दे तर खरा—ह्मणजे मी त्याला तेव्हांच नरम आणीन ! आणि मानाजीराव तुह्मी जरा अवसान धराल कीं नाहीं !

मानाजी०—(लांब पाहिलेंसें करून) नाहीं ! अजून दिसत नाहीं कोठें ! दौलतराव, सर्जेरावाशीं गांठ आहे ! उगीच घमेंडी मारण्यांत अर्थ काय ! माझा शहाणपणाचा सल्ला ऐका ! आणि येथून पळून जाऊन आपले प्राण वांचविण्याची तजवीज पहा ! ! हा सर्जेराव ह्मणजे जीवंत राक्षस आहे बरें ! दौलतराव, हट्टानें कां

उगाच मृत्यूचे द्वारांत शिरतोस आणि तुझ्या बरोबर या बाईलाही खेंचतोस ! ! तुझा प्राण घेतल्या शिवाय तो खचित परत जाणार नाहीं समजलास ! !

दौलत०—मानाजीराव, पाहून घेऊं आह्मीं आमचें काय होईल तें ! ! तुह्मांला पाय लावून पळायचें असेल तर खुशाल सुधारा आपली वाट !

मानाजी०—दौलतराव,हा चाललों बरें मी ! अजून तरी माझें ऐका ! नाहीं तर मरा शिंचानो ! तुमच्या मुळें एखादे वेळेस आमच्या मानेवर घाव पडायचा ! ! (सर्जेराव दृष्टीस पडल्याचें दाखवून) त–त–तलवार च–चें–चमकावीत आ–आ–आलाच ! पाय पा–पा–पाय–नि–नि–निघत नाहींत ! च–च–चला रे–मान्या च–च–चल–चल पुढें ! ! (निघून जातो)

(सर्जेराव व बचंभट येतात)

सर्जे०—अरे मांगा ! आतां सुटशील काय माझ्या हांतून जीवंत !

दौलत०—कां बरें !

सर्जे०—चोरा, हराम खोरा, तोंडाकडे काय पहातोस ! माझ्याशीं दगलबाजी आं ! !

दौलत०—काय दगलबाजी ! सर्जेराव, तुमचें डोकें ठिकाणावर नाहीं दिसत मला ! माझें हिच्या वर प्रेम आहे आणि मी हिला माझा प्राण समजतों हें खरें आहे ! पण घरांतून पळून येण्याला मी हिला मुळींच सल्ला दिला नव्हता ! दगलबाजी मला आवडत

नाहीं ! आणि खरोखरच हिची माझी भेट होई पर्यंत ही आपल्या घरांतून पळून आली हें मला मुळीच माहीत नव्हतें !

सर्जे०—अरे दौलत्या, अजून खोटें बोलतोस आं ! तुझ्याशीं खऱ्या दिलानें वागलों त्याचे असे उपकार फेडलेस काय !! या सर्जेरावाशीं कपट करून याला चिडविलेंस ! आणि तुझें प्रेम माझ्याहून अधिक आहे असें हिला भासवून हिच्या आणि माझ्या प्रेमांत बिघाड आणलास काय ! आतां बळीला बळी तर गेलाच पाहिजे ! तुझ्या अंगांत जर कांहीं पाणी असेल तर उपस आपलें शस्त्र !!

तारा—(एकीकडे) दादाच्या समजूतींत कांहीं तरी चूक असावी असं मला वाटतं !

बचंभट—या उभयतांचीं मनें जेहते एक असतां तुह्मीं आपलें घोडें पुढें दामटता हें चांगलें नाहीं !!

सर्जे०–भटद्या ! तुला काय कळतें आहे ! कुंटणगिरीच्या मिळकतीवर रेड्या सारखा पोसला आहेस! चोर ! अरे भटुरड्या, या सर्जेरावावर आहे हिचें खरें प्रेम ! समजलास !!!

बचंभट—असें असेल तर आमचें कांहींच बोलणें नाहीं ! मुली, तुला हे मनापासून आवडतात कां ? (तारा मान खालीं घालते)

सर्जे०—खोटें बोलून आपली जीभ न विटाळतां

स्वस्थ बसलीस हेंच फार उत्तम केलेंस ! या सर्जेरावानें अखेरपर्यंत तुझ्या मनाला यत्किंचित्‌ही दुखविलें नाहीं. हें ध्यानांत धर आणि अशीच झिजत मर ! ! (तोंडावर बुरखा घेतलेली गजरा प्रवेश करते.)

गजरा—कसलं चाललं आहे हें भांडण ?

सर्जे०—(एकीकडे) माणसें जमायला लागलीं ! काय करूं हो ! (उघड) दौलतराव, खूप समजून रहा ! या सर्जेरावांला चिडविलें आहेस तूं !

तारा—पण असं रागावण्यासारखं मीं केलं तरी काय ?

गजरा—आणि मी देखील तेंच विचारतें कीं आपल्याकडूनच नाहीं कां अगोदर चूक झाली ?

तारा—(तोंडावरचा बुरखा दूर लोटून) दादा, रागाच्या सपाट्यांत ही तुझी लाडकी बहीण तारा नाहीं कां तुला ओळखूं आली ! !

गजरा—(तोंडावरचा बुरखा दूर लोटून) आणि इकडल्या साठीं घर सोडून मी बाहेर निघालें ! तें सारंच कां विसरायचं झालं ! !

सर्जे०—काय ! ही ताई !! आणि ही लाडकी !!! हें काय पहातों आहें मी !

तारा—दादा, पटली कां आतां ओळख ! ! ओळखलंस कां मला ?

बचंभट—(एकीकडे) शांतं पापं—शांतं पापं—हा मदांध सख्ख्या बहिणीच्या मागें लागून तिच्याशीं लग्न

लावूं पहात होता !! शिव–शिव–शिव !! (उघड) सर्जे-राव, या बद्दल प्रायश्चित्त घेतलें पाहिजे बरें कां प्रायश्चित्त!

गजरा—आणि या गजरेची इकडे आठवण सुद्धां झाली नाहीं ना ?

तारा—संशयी माणसं डोळे असून कशीं आंधळीं होतात हे समजलं ना दादा तुला आतां चांगलं ?

गजरा–आतां या हृदयांत संशयाला पुन्हां नाहीं ना कधीं जागा मिळणार !

सर्जे०—ताई–लाडके–पुरे झाली आतां या सर्जेरा-वाची शोभा ! ताई, हा पदर पसरला आहे तुझ्यापुढं ! आज मोठें पाप झालें माझ्या हांतून !! आणि लाडके, हा सर्जेराव तुझा दास आहे ! याला क्षमा कर !!

तारा--दादा, यांत तो पदर कशाला हवा आहे मा-झ्या पुढं पसरायला !

गजरा—पण हें काय इश्श ! माझी कां कुठ क्षमा मागायची !

तारा—पण दादा, इकडचं मन तूं विनाकारण दुख-वलंस ! तेव्हां–

सर्जे०—दौलतराव, राग करायचा नाहीं बरें कां या बद्दल माझ्यावर !

दौलत०—हें काय वेड्या सारखें ह्मणतोस सर्जे-राव ! अरे प्रीतीच्या भोंवऱ्यांत सांपडून अंध झालेले लोक कैक वेळा असे चकतात ! तेव्हां त्यांच्या बद्दल राग बा-ळगणें किंवा आपल्या मनाला खेद वाटून घेणें हीं दोन्हीं

व्यर्थ ! पण अगोदर धनाजीरावांच्याकडे जाऊन त्यांची आपण सर्वजण माफी मागूं ! आणि मग महा प्रयासानें मिळविलेल्या या आपल्या नव वधूंच्या सौख्याचा आपण अनुभव घेऊं !!!

सर्जे०—पण हा सारा घोटाळा कसा झाला आणि त्या मान्यानें माझ्या ताईची गजरा कशी बनवली हें माझ्या लक्षांत अजून येत नाहीं !!

तारा—दादा, जरा स्वस्थ झालास किनई ह्मणजे हें कसं झालं तें सारं सांगेन मी तुला ! (पडदा पडतो.)

अंक ५ वा.
प्रवेश ४ था.
स्थळ—रस्ता.
वेळ—रात्रीचा पहिला प्रहर.

(सर्वांच्या पुढें चौघडा-त्याचे मागून वाजंत्री, त्यांचे मागून कर्णेवाला व शिंगवाला-त्यांचे मागून डोक्याला बाशिंग बांधलेला मानाजीराव व मुंडावळी घातलेली चिमणी-त्यांचे शेजारीं अबदागिरी प्रमाणें काठ्यांना चोळीचे खण बांधून त्या काठ्या हातीं धरणारे दोन गडी-त्यांचे मागून बचंभटाच्या शेजारीं राहणाऱ्या दोन कुळंबिणी, एकीच्या हातांत गड्डू व नारळ आणि दुसरीच्या हातांत कणकेचा जळता दिवा ठेवलेली पितळी-व सर्वांचे मागून दौलतराव व तारा-अशी सर्व मंडळी थाटानें वाजत

गाजत साड्या करितां धनाजीरावाच्या घराकडे जाण्यास निघतात.)

अंक ५ वा.

प्रवेश ५ वा.

स्थळ—धनाजीरावाचें घर.

वेळ—रात्रीचा दुसरा प्रहर.

(धनाजीराव व ह्मशा, सटव्या वगैरे चाकर प्रवेश करतात.)

धनाजी०—अरे ह्मशा, अरे सटव्या, अरे लेकांनो तुमच्या अंगांत अजून आंगरखे चढले नाहींत ! तुमच्या डोक्यावर अजून मंदील फडकले नाहींत ! आणि तुमच्या पायांत अजून तोडे चमकले नाहींत ! अरे तुह्मी अजून असे सुंध कां ? अरे मानाजीराव आतां येतील ! लेकांनो पान विडा अत्तर गुलाब यांचीं तारें तयार झालीं आहेत कीं नाहीं अजून ? आपल्या कोठींतल्या त्या लांकडी थोरल्या समया काढल्या आहेत कीं नाहीं आज बाहेर ? आज एका वातीच्या ठिकाणीं दोन जुळ्या जळत घाला ! जिकडे तिकडे कसा लकलकाट झाला पाहिजे ! कोणत्याही गोष्टींत काडीभरसुद्धां कमी पडतां उपयोगीं नाहीं ! ए शंखानों, नुसती मुंडीं हालवीत आणि डोकें खाजवीत काय उभे राहिलांत ! ! आज एखादा वाडगा जास्त तर झोकला नाहींत ना ! घरांत कांहीं कमजास्त निघालें कीं

ह्या लेकांची बया जास्तच बोकाळते! अरे ह्मशा, हालतो आहेस कीं नाहीं अजून जागचा ? (ह्मशा पुटपुटत निघून जातो) आणि सटव्या लेका तुझे धनी कोठें आहेत आज ? त्यांची धिंड आज सकाळपासून घरा बाहेर पडली आहे ती अजून घरीं परत आलेली मीं पाहिली नाहीं !! ह्मणून विचारतों कीं आतां तरी त्यांची स्वारी घरीं यायची वेळ झाली आहे कीं नाहीं अजून !!

सटव्या—आमच धनीसाब व्हय ? न्हाई ! येत्यालसा रंग न्हाई दिसत! त्येसनी लागलया खूळ ! अक्शी वसा वसा अंगावर तुटून पडत्यात! तवां ह्योरं जावं कुनी! समूक आलास तर पाठीवर कोरडच वढीन ह्मंगत्यात जवां तवां! तवां ह्योरं कोन जानार धनीसाब!

धनाजी०—कार्टा लागला आहे एका हाडळीच्या मागें! कळलें आहे तें मला सगळें!! त्याची धिंडका निघाली असेल बहुतेक त्या सटवीच्या शोधार्थ!! मरूं दे त्या गाढवाला तसाच! (पडद्यांत वाजंत्री वाजतात ते ऐकून) सटव्या, ही कोणा कडली सुपारी आली आहे तें पहा बरें बाहेर जाऊन! (सटव्या निघून जातो.) आज गांवांत तर लग्नांचा अगदीं कडाका उडाला आहे! एकदां याच गर्दीत पोरीचें लग्न उरकून घेतलें ह्मणजे माझ्या छातीवरची एक मोठी थोरली धोंड खालीं उतरल्या सारखें होईल !! (सटव्या धांवत धांवत प्रवेश करतो)

सटव्या—धनीसाब! मानाजीराव फांकड आल्याती वाजत गाजत !!

धनाजी०—कोण मानाजीराव फांकडे!! आपले जांवई बुवा!!!

सटव्या—हंग त्येच! त्येच!!

धनाजी०—आणि ते वाजत गाजत!

सटव्या—व्हय–व्हय धनीसाब–व्हय! मानाजीरावासनी हाळद लागलीया हाळद!! डोकश्याला बाशिंग बी बांधलया!! आन् मुंडाळी घालूनशान् नवरी बी आलीया त्येंच्या संग!!

धनाजी०—काय! मानाजीरावाला हाळद लागली आहे! आणि त्याच्या बरोबर नवरीहि आहे ह्मणतोस!! अरे मान्या, लेका मला विचारल्या शिवाय हाळद लावलीस काय!!! छेः–पण ही रागावण्याची वेळ नव्हे! या बद्दल त्याचा गोडीगुलाबीनेंच कान पिळला पाहिजे! सटव्या, जा–त्या मामाजीरावांना इकडे घेऊन ये! तूं कांहीं त्यांना कमजास्त बोलूं नकोस आं! (सटव्या जातो) मान्या बेटा फार अधीर! आणि मोठा धांदल्या!! पण इतकी घाई कशा करितां!!! (बाशींग बांधलेला मानाजीराव व सटव्या प्रवेश करतात) यावें यावें–यावें–जांवई बुवा! आणि एकटेच कीं काय!! पोर कोठें आहे?

मानाजी०—बरोबर आणली आहे तिला! पण बाहेरच उभी केली आहे! घरांत चल ह्मटलें माझ्या बरोबर! पण ती आपल्या पुढें यायला भिते आहे!!

धनाजी०—सटव्या, धांव–धांव–आणि आण

तिला इकडे !! (सटव्या जातो) गरीब बिचारी अश्राप पोर ! घाबरली असेल आणि दुसरें काय !! (तारेचें सोंग घेतलेली व तोंडावर बुरखा आणि डोक्याला मुंडावळी बांधलेली चिमणी हुंदके देत प्रवेश करते)

मानाजी०—नको–आतां रडायला नको कांहीं ! अशा मंगलकार्यांत डोळ्याला पाणी आणूं नये ! मामासाहेब, अहो किती कांपते आहे हो ही ! ये–पुढें ये–आणि मामांच्या पायांवर डोकें ठेव ! ह्मणजे त्यांचा सारा राग जाऊन ते तुला प्रेमानें पोटाशीं धरतील ! (चिमणी धनाजीरावाच्या पायांवर डोकें ठेवते.)

धनाजी०—(चिमणीस उठवून) ऊठ–ऊठ–बाळे ऊठ ! आणि मला एकदां कडकडून भेट !! (चिमणी धनाजीरावास भेटते, तिचीं हाडें धनाजीरावास खुपल्यामुळें) मानाजीराव, एका दिवसांत पोरीचीं हाडें कीं हो बाहेर पडलीं ! (चिमणीच्या तोंडावरचा बुरखा दूर करीत) आणि बाळे, असा वेडाविद्रा हट्ट धरून मानाजीरावांना असा कां शीण द्यायचा !! अगदीं खुळी ग खुळी !! (तोंडावरचा बुरखा काढल्यावर ती ‘ चिमणी ’ आहे असें ओळखून व तिला रागानें दूर लोटून) अरे मान्या ! ही रे लेका कोण ! तुझी आई कीं काय !

मानाजी०—काय आई ! अहो मामा–तुमच्या जाचानें मीं तुह्मांला दुपारींच सांगितलें नाहीं ! अहो सोन्यासारखी तुमची ही पोर ! पण कशी अगदीं सुकून वाळून

गेली हो!! आणि शिवाय, आज साऱ्या सकाळपासून तिच्या तोंडांत घोंळाभर अन्न कां घोटभर पाणी–कांहीं कांहीं–गेलें नाहीं! आणि ह्मणून कीं नाहीं ती आतां फारच ओढल्या सारखी दिसायला लागली आहे!! पित्तानें पाहिल्यात कां मामा, तिच्या झोंकाड्या देखील जात आहेत!! लाडके, काय तुझी अवस्था झाली आहे ही!!!

धनाजी॰—अरे मान्या! अरे गाढवा! ही तर चिमणी!! माझ्या पोरीचें बटकूर!! आणि माझ्या पोरीचें काय केलेंस मांगा!!

मानाजी॰—काय बटकूर! मामा, तुह्मांला खास चळ भरला! (चिमणीस पुढें ओढून) अहो, तुमच्या पुढें ही तुमची पोर प्रत्यक्ष उभी असून, तुह्मीं माझी पोर कोठें आहे ह्मणून विचारतां तेव्हां मोठेंच आश्चर्य!! अग तूं लाजूं नकोस! पुढें हो! धनाजीरावांना तुझी ओळख पटेना!! ह्मणून ह्मणतों त्यांची खात्री कर!!

धनाजी॰—मान्या! माझा असा सूड साधलास काय!! अरे पोरीला गळा दाबून मारलीस! कां केलेंस तरी काय तिचें!!

चिमणी—बाबा, मी तुमची लेक! तुह्मांला नाहीं कां ओळखूं येत!! अगबाई! तुह्मीं माझे बाबा नाहींत, असं कां तुह्मीं आतां ह्मणणार!!

धनाजी॰—काय बाबा!! अग हाडळी! आणि ए मान्या! तुह्मीं पोरीला मारलीत तर नाहीं ना!!

कायग ए कवटाळणी ! माझ्या तारीला विहीरींत ढकलून दिलीस कीं काय !! मला बाबा ह्मणायला लाज नाहीं वाटत तुला !!!

मानाजी०—(चिमणीला आर्जवानें) अग, मामासाहेबांना अशी भिऊं नकोस ! तरी मी सकाळपासून एकसारखा पाटीस लागलों होतों कीं, थोडें खा ह्मणजे तुला पित्त होणार नाहीं आणि अंगांत तकवा आणि तोंडावर टवटवी राहील ह्मणून !! ही मुंडावळ तरी नीट बाजूला सार ! मामासाहेबांना तुझें तोंड नीट पाहूं दे ! या तुझ्या हाळदीनें तर मामांच्या डोळ्यांवर झांपड आली नाहीं ना !! नाहीं तर ती तरी पुसून टाक ! काय आश्चर्य आहे हो ! पोटच्या पोरीची ही स्थिती ! मग हे असले खुळे आमच्यासारख्यांची ओळख तर आह्मीं पाठमोरे होतांच विसरून जायचे !!!

चिमणी—बाबा ! असे कां बरं माझ्यावर निष्ठूर होता आणि माझ्यावर रागावून मला अशी दूर लोटता ! माझं पूर्वीचं रूप राहिलं नाहीं ! त्यांत माझा काय बरं दोष !! आणि माझं स्वरूप बदललं ह्मणून लगेच मी तुमची मुलगी नाहीं असं कां ठरवायला तुह्मीं तयार झालांत !!! तें कांहीं नाहीं, तुह्मीं मला क्षमा केलीच पाहिजे ! तुमच्या पोटीं जन्म घेतला आहे ! तेव्हां तुह्मीं जरी मला सहस्रवेळां दूर लोटलीत तरी मला लोचटपणानं तुह्मांला बाबा

ह्मणून प्रेमानं कडकडून भेटलंच पाहिजे !!! (धनाजी-रावाच्या गळ्यास मिठी मारण्याकरितां पुढें जाते.)

धनाजी०—अरे, धांवा! धांवा! ! अरे ह्मशा, अरे सटव्या, अरे धांवा ! ! आणि धरा–धरा या रांडेला ! या हाडळीचे डोळे फिरलेले दिसतात ! न जाणो या वेळेस ही माझा खून करायलासुद्धां मागेंपुढें पाहणार नाहीं ! ! ! (सटव्या धांवत धांवत प्रवेश करतो.)

सटव्या—(ती चिमणी आहे हें त्यास ठाऊक असून खोटेंच अवसान आणून) काय ! काय गोंदुळ है धनीसाब ! ! दावा–दावा बिगी–बिगी कुठ हाडळ है ती ! ह्मंजी घेतो ठेवूनशान् तिच्या टक्कुऱ्यामंदी योक टोला !! आं ! कोन आलया धनीसाबाचं नरडं धराया ! !

धनाजी०—अरे ही हाडळ ! या मान्यानें माझ्या बोकांडी बसवायला आणिली आहे माझ्या घरांत ! !

सटव्या—(एकाबाजूस तोंड करून हांसतो.)

मानाजी०—केवढें आश्चर्य ! या ह्मातार्‍याला याची पोटची पोर ओळखेना ! आणि हिला हा हाडळ ह्मणतो आं ! ! (सटव्यास उद्देशून) अरे लेका,तुला तरी ओळखते आहे कीं नाहीं तुझी ही घरधनीन ! कां आज या ह्मातार्‍याबोवाबरोबर तूंही दिली आहेस बेसुमार ठासून ! !

सटव्या—(पोट धरधरून हांसतो.)

धनाजी०—सटव्या, अरे गाढवाच्या लेका ! हांस-

तोस काय ? आणि मान्या, लेका ह्या हाडळीला माझी पोर समजून आपल्या अंगाला लग्नाची हाळद चोपडून आणि डोक्याला बाशिंग बांधून बसलास तेव्हां काय ह्मणावें तुझ्या अक्कलेला ! !

मानाजी०–मामासाहेब, मी नुसती अंगाला हाळद चोपडून आणि डोक्याला बाशिंग बांधूनच बसलों नाहीं ! हिच्याशीं लग्न लावूनही मोकळा झालों आहें समजलांत!!(दौलतराव व तारा येत आहेत असें पाहून त्यांच्याकडे बोट करून)आणि ते पाहिलेत कां आमचे जिवश्चकंठश्च दोस्त दौलतराव ! आणि त्यांच्या मागून येत असलेलें त्यांचें तें कुटुंब ! ! (धनाजीरावाच्या कानाशीं लागल्यासारखें करून हळूच) मामासाहेब, मीं आज दुपारीं तुह्मांला सांगितली ती–ती–उदाजीरावाजी पोर ! गजरा ! या उभयतांनींही मीं त्यांचेवर केलेल्या उपकारांची फेड ह्मणून आमच्यावर अक्षता टाकल्या आहेत समजलांत ! ! !

धनाजी०—मानाजीराव, आज तुह्मांला खास वेड लागलें ! यांत बिलकूल शंका नाहीं ! ! (दौलतराव व तोंडावर बुरखा घेतलेली तारा प्रवेश करतात.)

मानाजी०—(दौलतरावाकडे हात करून) विचारा, या दौलतरावांनाच विचारा ! ह्मणजे फिटेल तुमच्या मनाचा संशय ! आणि यांचेंही लग्न उद्याच्याच मुहूर्तावर उरकून द्यायचें ठरलें आहे आमचें ! ! बचंभटानें तर असें

सांगितलें आहे कीं, यांचा हा संबंध लाखांत एक होईल ह्मणून ! आणि शिवाय एका मयताची जिंदगीही लवकरच उतरणार आहे यांच्या घशाखालीं असेंही त्यानें भाकीत केलें आहे समजलांत ! !

धनाजी०—मान्या–अरे हरामखोरा ! अरे बेरडा ! कां खैसा ! कां मांगा ! अरे तुला आतां हांक तरी कोणत्या नांवानें मारायची ! ! (रागानें दांतओठ करकरा चावतो)

दौलत०—लाडके, वडील माणसांना नमस्कार करून त्यांचा आशिर्वाद घे ! हो पुढें हो ! ! आणि धनाजीरावांच्या पायावर डोकें ठेव ! ! (तारा तोंडावरचा बुरखा दूर करून धनाजीरावांच्या पायां पडते. धनाजीराव तिला ओळखतो, ती प्रेमानें धनाजीरावास मिठी मारते व धनाजीराव तिला पोटाशीं धरतो.)

धनाजी०—(तारेच्या तोंडावरून हात फिरवून व तिला कुरवाळून) माझी बाई ! कोठें गेली होतीस मला टाकून ! ! माझे पंचप्राण व्याकूळ होऊन अगदीं निघून जायची वेळ आली होती ! ! या वेळीं तूं मला भेटल्यानें, परमेश्वरानें माझ्या या कुडींत या घटकेस नव्यानेंच प्राण घातला असें मला वाटतें आहे ! ! !

मानाजी०—(दौलतरावाकडे वळून) मामासाहेबांना आज खास वेड लागलें यांत शंका नाहीं ! दौलतराव येथें क्षणभर देखील उभे राहण्याची आतां सोय रा-

हिली नाहीं !! ह्मणून ह्मणतों, चला कसे आतां येथून चटकन् ! नाहीं तर हा वेडा आतां धोंडे मारायला लागेल !! आणि ए सटव्या कां फटव्या—लेका तूं देखील या तुझ्या धन्याला वेड्यांच्या कोंडवाड्यांत नेऊन टाकलेंस तरच लेका तुझें टाळकें शाबूत राहणार आहे समजलास ! नाहीं तर लेका तुझी तिरडीच बांधायची वेळ येईल !!

धनाजी०—अरे मान्या, अरे बेरडा, अंगाची कशी आग होते आहे रे ! अरे सटव्या—लेका या चोराच्या मुसक्या बांधायच्या तें सोडून आं वासून याच्याकडे पहात काय उभा राहिला आहेस !!

मानाजी०—मामासाहेब, या उदाजीरावाच्या पोरीला तुह्मीं आपली पोर ह्मणून जवळ घेतां ! आणि या तुमच्या पोटच्या पोरीला तुह्मीं माझी नाहीं ह्मणून दूर लोटतां !! याहून मोठा खुळेपणा तो कोणता !! अहो यालाच ह्मणतात चळ !!! ह्मातारचळ तो हाच !

धनाजी०—अग हाडळी ! ए बटके ! कबूल होतेस कीं दाखवूं चौदावें रत्न ! सटव्या आं वासून उभा काय राहिला आहेस तिला पाहत ! धर तिच्या झिंज्या आणि ओढ तिच्या पाठीवर फडाफड कोरडे !! (सटव्या तिला धरण्या करितां पुढें झाल्याचा अविर्भाव दाखवितो)

मानाजी०—(सटव्याच्या अंगावर धांवून) हां खबरदार ! तिच्या अंगाला हात लावशील तर! दौलत-

राव, तुमचें तोंड शिवलें आहे कीं काय! (चिमणीला हातीं धरून) ही धनाजीरावाची पोर! आणि तिच्याशीं लग्न लावलेला मी धनाजीरावाचा जावई.! असें तुह्मी हजार लोकांसमोर बोलाल कीं नाहीं शपथेवर? बस आहे इतकें! मामासाहेब, ही उडवाउडवी या मानाजीरावा समोर चालायची नाहीं बरें कां!! आतां अगोदर साड्याची तयारी करतां कीं जाऊं कोतवालाकडे!! (मानाजीराव कोतवालाकडे जाण्यास निघतो)

चिमणी—(मानाजीरावास आडवून) कोतवालाकडे कशाला जायचं! ही बाई त्यांची मुलगी असो! कीं मी त्यांची मुलगी असो! माझा अंगिकार करणं झालं आहे ना? मग काय करायचं आहे आतां आपल्याला यांच्याशीं!! मला इकडले पाय लाभले आहेत! तेव्हां आतां मला या बाबांच्या रागाचं कांहीं वाटत नाहीं!! ह्मणेनात हे यांना वाटेल तें!

धनाजी०—बाबा! कोण लोचट बायको आहे हो ही! तारे तूं या मान्याला भितेस कीं काय! कां यानें जादू करून तुझें तोंड खिळवून टाकलें आहे!! अग पोरी, तुझें हें बटकूर तूं अजून नाहीं कां ओळखलेंस!! आणि सटव्या, या हाडळीच्या दंडाला धरून हिला घराबाहेर काढतां येतें आहे कीं नाहीं तुला!!

चिमणी—मेल्यांनों! (मानाजीराव तिच्या तोंडावर हात ठेवतो)

मानाजी०—लाडके, नको! नको! तूं आपल्या अंगाचा विनाकारण संताप करून घेऊं नको! हें पाहिलेंस कां या संतापानें तुझें अंग कसें थर थर कापतें आहे तें! घाम तरी किती सुटला आहे हा दरदरून! अगदीं न्हाली आहेस जशी कांहीं!! तूं अगदीं स्वस्थ रहा कशी! तुला उभें कां राहावत नाहीं? माझ्या खांद्यावर मान टाकून अंमळ स्वस्थ हो बरें! काय दम लागला आहे हा तुला!!

सटव्या—(हांसत हांसत) अग ए बटकी! लै–लै आनलं आंहेस वढूनशान्!! आतां हथून निघते आहेस कां हानूं रट्टा याचा योक कंबर मंदी!!

चिमणी—(सटव्याचा अंगावर चवताळून जाऊन) मेल्या बटकी रे कोणाला ह्मणतोस! मी बटकूर आहे कां रे!! (मानाजीरावाकडे वळून) पण मी ह्मणतें–मला यांनीं बटकूर नाहीं त्याच्या पलीकडलं कांही ह्मटलं तरी इकडचा लौकीक कमी कां होणार आहे त्यांत! ह्मणेनात बिचारे हे यांना वाटेल तें! पण तसं कशाला! मीच कबूल करतें, कीं मी या धनाजीरावाचं बटकूर आहें ह्मणून! आणि ही बाई त्यांची मुलगी आहे ह्मणून! (कडकडा बोटें मोडून) मग तर झालं ना मेल्यांनों तुमच्या जिवाचं समाधान!!

मानाजी०—लाडके, असें भलतेंच काय बोलावें हें!

आणि मग मी या धनाजीरावाचा जांवई नाहीं होय !!

धनाजी॰—मान्या ! अरे गाढवा ! यांत काय शंका! तूं एका बटकुराशीं झोतूर लावणारा फक्कड ! असें ह्मणून हें सारें जग तुझ्या तोंडावर पचापच थुंकेल समजलास !!

मानाजी॰—मामासाहेब, तोंड संभाळा आं ! हा असा अपमान आणि हे असे उणे शब्द मी कधीं सोसून घेणार नाहीं बरें !! गळ्यांत नगारा बांधून साऱ्या विचित्रपुरींत धनाजीरावाच्या पोरीनें माझ्याशीं लग्न लावलें! आणि मी धनाजीरावाचा जांवई अशी दवंडी पिटीत फिरेन !! तुह्मीं काय समजलांत !!

चिमणी—पण मी ह्मणतें मेला आपल्या जिवाला इतका शीण कां करून घ्यायचा ! माझा अंगिकार करणं झालं आहे ते आतां यांनीं कांही ह्मटलं तरी फिरणार आहे कां !!

मानाजी॰—(चिमणीस प्रेमानें जवळ घेऊन) लाडके, तें कधीं तरी फिरेल कां ! पण गजराबाई तुमचा देखील मला मोठा चमत्कार वाटतो ! आणि दौलतराव तुमची दांतखिळी कां बसली आहे आतां ! तुह्मी दोन शब्द बोलून कराल कीं नाहीं मामासाहेबांची खात्री !

दौलत॰—मामासाहेब, ह्या मानाजीरावांच्या खटपटीनें (तारेस हातीं धरून) ही मला मिळाली हें खरें ! पण—

मानाजी॰—पण काय ! (चिमणीस हातीं धरून) ही या धनाजीरावाची पोर नाहीं होय ?

चिमणी—नाहीं हो नाहीं! कोण मेला हा खुळेपणा? अहो धनाजीराव, तीच आपली पोर बरं! तुह्मीं तुमच्या या सोन्य सारख्या पोटच्या गोळ्याला (मानाजीरावाकडे पाहून) यांच्या पदरीं बळजबरीनं बांधायला तयार झाला होता! तेंव्हां या मुक्या गाईची तुमच्या हांतून सोडवणूक करण्याकरितां मींच हा व्यूह रचला होता बरं! माणसं मेलीं किती जरी निष्ठूर झालीं तरी परमेश्वर दूर कां आहे! त्या परमेश्वरानंच बरं आज सकाळीं तुह्मांला माझ्यावर आग पाखडायची आणि मला घराबाहेर काढून देण्याची बुद्धि दिली! आणि त्याच्याच कृपेनं माझ्याबद्दल ताईसाहेबांना घरांतून बाहेर काढून देण्याची अक्कल मला सुचली! माझं नशीब थोर आणि ह्मणून देवानं मला (मानाजीरावास मिठी मारून) इकडले पाय दाखविले! आणि मींही हें रूप, हे गूण, ही अक्कल आणि हा थाट पाहून यांच्या गळ्यांत मोठ्या प्रेमानें माळ घातली! आणि माझा देखील किर्नई इकडून तशाच प्रेमानं अंगिकार करणं झालं आहे हो!!

सटव्या—भल मानाजीराव फांकड! ह्माताऱ्या आवाच दादल!! पांखरूं पन पांखरूं पटकावलं है इचिभन!!!

(मानाजी चिमणीस दूर लोटून तिच्याकडे रागानें डोळे वटारून पाहतो)

चिमणी—मला दूर कां लोटायची पण! आणि माझ्या-

कडे हें असं टवकारून कां पहायचं !! माझं नांव चिमणी हो ! मी या ताराबाईचं बटकूर ! अजून नाहीं कां खात्री पटली आपली ! अहो मी ह्मातारी नाहीं कां दिसत तुह्मांला ! आणि हें पाहिलेंत कां दळण कांडण करतां करतां आणि मेलीं लोकांचीं भांडीं घांसतां घांसतं या हाताला हे इथे कसे घट्टे पडल आहेत ते !! मेलं माणसानं जीव तोडून सांगावं तरी किती !!

मानाजी०–(चिमणीला जवळ घेऊन) लाडके, काय ही भलतीच थट्टा आरंभिली आहेस तूं या वेळेला ! ही विनोद करण्याची कां वेळ आहे !! या बोलण्याच्या श्रमानें पाहिलेंस कां (तिचा घाम पुसून) तूं घामानें कशी न्हाली आहेस ती !!

चिमणी—खरेंच हो खरेंच ! ही थट्टा नव्हे ! त्या ताराबाई ! आणि मी त्यांचं बटकूर चिमी !!!

मानाजी०—काय ! तूं बटकूर ! आणि तुझें नांव चिमी !! तर मग मी एका बटकुराचा दादला झालों ह्मणायचा ! मी नाहीं जा हें कबूल करणार कधीं ! जर तूं खरोखर चिमी असलीस तर मीं तुझ्याशीं मुळीं लग्नच लावलं नाहीं ! बोल तर मग काय खरें आहे तें ! ह्मणजे मी ही हाळद धुवून याच पाऊलीं परत जातों आपल्या देशाला !!!

दौलत०–मानाजीराव, आतां कां वरें फिरतां आणि

या बटकीनें तुह्मांला फसविलें ह्मणून मनगटें चावतां ! या धनाजीरावांना सफै बुडवायचा आणि त्यांच्या (तारेस हातीं धरून) या मुलीच्या सौख्यांत माती कालवायचा नव्हता तुमचा विचार !! आणि मलाही फसवायची नव्हती तुह्मीं युक्ति काढलीत ! आपल्याच हातानें हा प्रसंग तुह्मीं आपल्यावर ओढून घेतलात ! आणि मग आतां संतापून आणि त्रागा करून काय होतें !!!

धनाजी०—मान्या ! मला बुडवायचा विचार केला होतास काय चोरा !!

तारा—आणि बाबा हें अगदीं खरं आहे बरं कां ! तसाच आहे मेला हा बेरड ! मेल्याचं तोंड पहा कसं दिसतं आहे तें ! इश्श ! थूः मेल्या तुझ्या तोंडावर !!

दौलत०—ह्मणे मी अट्टल सोदा ! मानाजीराव, बसा आतां असेच जन्मभर ओरडत !!

तारा—मेला बोकड आहे बोकड !

दौलत०—मांग आहे मांग !

मानाजी०—दौलतराव ! हा मानाजीराव असा अपमान सहन करून घेणार नाहीं आं ! पाण्यांत जाऊन जीव देईन ! नाहीं तर मोठ्यानें गळा काढून रडेन तुमच्या सर्वांच्या नांवानें समजलांत !! तुमचें सर्वांचें परमेश्वर कध्धीं कध्धीं बरें करणार नाहीं !!

दौलत०—मानाजीराव ! काय ह्मणावें तुह्मांला !

इच्छेप्रमाणें, दौलतराव, तुह्मांला अत्यंत प्रेमानें अर्पण करतों ! ! दौलतराव, मानाजीराव, तुमच्या मुलांबाळांना, आणि बाळे, चिमणे, तुह्मीं आपल्या लेकीसुनांना या द्रव्यलोभी, निर्दय आणि दुष्ट आजोबाची आजची ही गोष्ट सांगून आपल्या कुटुंबांत तरी या प्रसंगाची पुनरावृत्ति न होऊं देण्याविषयीं त्यांना सदुपदेश करा ! ह्मणजे कालांतरानें ज्या ज्या कुटुंबांशीं तुमचा आप्त संबंध जडेल त्या त्या कुटुंबांत तरी प्रीतिविवाह लग्नपद्धती सुरू होईल ! (सर्जेराव व त्याचे मागून तोंडावर बुरखा घेतलेली गजरा प्रवेश करतात, त्यांस पाहून) मुला, तूंही फार वेळेवर आलास ! अरे पण तुझ्यामागें ही कोण ! !

सर्जे०—(खालीं मान घालून) बाबांनीं हिला ओळखली नाहीं वाटतें ! ही उदाजीरावाची कन्या आणि— (गजरा तोंडावरचा बुरखा दूर करून धनाजीरावाच्या पायां पडते.)

धनाजी०—हां समजलों ! मुली, परमेश्वर तुझें कल्याण करो ! तुमच्या या कपटनाटकांतील रंगभूमीवर सजून आलेलें प्रत्येक पात्र आह्मां संसारिकांना जबरदस्त मार्गदर्शक आहे यांत बिलकुल शंका नाहीं ! कडू गोड जात आणि श्रीमंती गरीबी यांचा भेदाभेद एकीकडे ठेवून तुह्मीं सर्वांनीं तुमच्या गुणांस, तुमच्या रूपास, तुमच्या वयास आणि तुमच्या शीलास साजेशीच निवड

केली आहे! याबद्दल आज तुह्मां सर्वांची पाठच थोपटली पाहिजे!! मानाजीराव, द्या तें आंबट तोंड टाकून! आणि परमेश्वरानें जी ही तुह्मांला धूर्त, पोक्त आणि अनुरूप अशी वधू दिली आहे! त्यांतच संतोष मानून राहिलेले आयुष्याचे दिवस तिच्याबरोबर सुखांत घालविण्याचा करा संकल्प!! (मानाजीराव चिमणीस प्रेमानें आलिंगन देतो.) शाबास! मानाजीराव शाबास!! चिमणीनें आज जे हे आह्मां सर्वांवर उपकार केले आहेत त्यांची उलटफेड ह्मणून मी तिला आजपासून आपली दुसरी कन्या समजेन! आणि मानाजीराव, या दौलतरावाप्रमाणें तुह्मीं माझे जामात आहांत असें मी मानीन!! अरे सटव्या, उदाजीरावाकडे साखर घेऊन जा! आणि त्यांच्या कानावर हा सारा प्रकार घालून, त्यांच्या आमच्यामधील स्नेहसंबंध ह्या सोयरिकीच्या नात्यानें आह्मीं येत्या मुहूर्तावरच दृढ करणार आहोंत असें त्यांना कळीव!! मुलांनों, तुमचें सर्वांचें कल्याण होवो, एवढेंच माझें परमेश्वरापाशीं पदर पसरून मागणें आहे!!! (पडदा पडतो.)

समाप्त.